Citigroup Global Markets India Private Limited 1202, 12th Floor, First International Financial Center, G Block Bandra Kurla Complex, Bandra (East), Mumbai - 400 098 Maharashtra, India **Tel:** +91 22 6175 9999 **E-mail:** jio.ipo@citi.com **Investor Grievance E-mail:** investors.cgmib@citi.com **Website:** www.citigroup.com/global/about-us/global-presence/india/regulatory-disclosures-investment-banking **Contact Person:** Naman Kulshreshtha **SEBI Registration No.:** INM000010718	**CLSA India Private Limited** 8/F Dalamal House Nariman Point, Mumbai - 400 021, Maharashtra, India **Tel:** +91 22 6650 5050 **E-mail:** jio.ipo@clsa.com **Investor Grievance E-mail:** investor.helpdesk@clsa.com **Website:** www.india.clsa.com **Contact Person:** Prachi Chandgothia **SEBI Registration No.:** INM000010619	**DAM Capital Advisors Limited** Altimus 2202, Level 22 Pandurang Budhkar Marg, Worli, Mumbai - 400 018 Maharashtra, India **Tel:** +91 22 4202 2500 **E-mail:** jio.ipo@damcapital.in **Investor Grievance E-mail:** complaint@damcapital.in **Website:** www.damcapital.in **Contact Person:** Aanchal Wagle/ Jay Shah **SEBI Registration No.:** MB/INM000011336	**Goldman Sachs (India) Securities Private Limited** 9th and 10th Floor, Ascent-Worli Sudam Kalu Ahire Marg, Worli, Mumbai - 400 025 Maharashtra, India **Tel:** +91 22 6616 9000 **E-mail:** jioipo@gs.com **Investor Grievance E-mail:** india-client-support@gs.com **Website:** www.goldmansachs.com **Contact Person:** Saurav S **SEBI Registration No.:** INM000011054	**HDFC Bank Limited** **Investment Banking Group** Unit no. 701, 702 and 702-A, 7th Floor, Tower 2 and 3 One International Centre, Senapati Bapat Marg, Prabhadevi Mumbai - 400 013, Maharashtra, India **Tel:** +91 22 3395 8233 **E-mail:** jioplatforms.ipo@hdfc.bank.in **Investor Grievance E-mail:** investor.redressal@hdfcbank.com **Website:** www.hdfc.bank.in **Contact Person:** Bharti Ranga/ Souradeep Ghosh **SEBI Registration No.:** INM000011252
HSBC Securities and Capital Markets (India) Private Limited 52/60, Mahatma Gandhi Road, Fort, Mumbai - 400 001 Maharashtra, India **Tel:** +91 22 6864 1289 **E-mail:** jplipo@hsbc.co.in **Investor Grievance E-mail:** investorgrievance@hsbc.co.in **Website:** www.business.hsbc.co.in **Contact Person:** Harsh Thakkar/ Harshit Tayal **SEBI Registration No.:** INM000010353	**ICICI Securities Limited** Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai - 400 025 Maharashtra, India **Tel:** +91 22 6807 7100 **E-mail:** jioplatforms.ipo@icicisecurities.com **Investor Grievance E-mail:** customercare@icicisecurities.com **Website:** www.icicisecurities.com **Contact Person:** Ramesh Vaswana / Soumavo Sarkar **SEBI Registration No.:** INM000011179	**IIFL Capital Services Limited** **(formerly known as IIFL Securities Limited)** 24th Floor, One Lodha Place Senapati Bapat Marg, Lower Parel (West), Mumbai - 400 013 Maharashtra, India **Tel:** +91 22 4646 4728 **E-mail:** jio.ipo@iiflcap.com **Investor Grievance E-mail:** ig.ib@iiflcap.com **Website:** www.iiflcapital.com **Contact Person:** Gaurav Mittal/ Pawan Kumar Jain **SEBI Registration No.:** INM000010940	**Jefferies India Private Limited** Level 16, Express Towers Nariman Point, Mumbai - 400 021, Maharashtra, India **Tel:** +91 22 4356 6000 **E-mail:** Jio.Platforms.IPO@jefferies.com **Investor Grievance E-mail:** jipl.grievance@jefferies.com **Website:** www.jefferies.com **Contact Person:** Akshat Shah/ Meghna Biju **SEBI Registration No.:** INM000011443	**JM Financial Limited** 7th Floor, Cnergy, Appasaheb Marathe Marg Prabhadevi, Mumbai - 400 025, Maharashtra, India **Tel:** +91 22 6630 3030 **E-mail:** jpl.ipo@jmfl.com **Investor Grievance E-mail:** grievance.ibd@jmfl.com **Website:** www.jmfl.com **Contact Person:** Prachee Dhuri **SEBI Registration No.:** INM000010361
J.P. Morgan India Private Limited J.P. Morgan Towers Off C.S.T Road, Kalina, Santacruz (East), Mumbai - 400 098 Maharashtra, India **Tel:** +91 22 6157 3000 **E-mail:** JIO_IPO@jpmorgan.com **Investor Grievance E-mail:** investorsmb.jpmipl@jpmorgan.com **Website:** www.jpmipl.com **Contact Person:** Shivam Goel/ Rishank Chheda **SEBI Registration No.:** INM000002970	**SBI Capital Markets Limited** 1501, 15th Floor, A & B Wing, G Block, Parinee Crescenzo, Bandra Kurla Complex, Bandra (East), Mumbai - 400 051 Maharashtra, India **Tel:** +91 22 4006 9807 **E-mail:** jio.ipo@sbicaps.com **Website:** www.sbicaps.com **Investor Grievance E-mail:** investor.relations@sbicaps.com **Contact Person:** Krithika Shetty/ Prashant Patankar **SEBI Registration No.:** INM000003531	**UBS Securities India Private Limited** Unit 2901, Level 29, Altimus, Dr. GM Gokhale Marg / Pandurang Budhkar Road, Worli, Mumbai - 400 018, Maharashtra, India **Tel:** +91 22 6155 6000 **E-mail:** OL-jioipo@ubs.com **Website:** www.ubs.com/indiaoffers **Investor Grievance E-mail:** igbmindia@ubs.com **Contact Person:** Vidhit Patni **SEBI Registration No.:** INM000013101	**360 ONE WAM Limited** 360 ONE Centre, Kamala City Senapati Bapat Marg, Lower Parel (West), Mumbai - 400 013 Maharashtra, India **Tel:** +91 22 4031 7000 **Email:** jioplatforms.ipo@360.one **Investor Grievance E-mail:** mbinvestorcomplaints@360.one **Website:** www.360.one **Contact Person:** Devesh Patkar **SEBI Registration No.:** INM000012801	**REGISTRAR TO THE ISSUE** **KFin Technologies Limited** Selenium Tower-B, Plot No. 31 & 32, Gachibowli, Financial District, Nanakramguda, Serilingampally Hyderabad - 500 032, Telangana, India **Tel:** + 91 40 6716 2222/ 1800 309 4001 **E-mail:** jioplatforms.ipo@kfintech.com **Investor Grievance E-mail:** einward.ris@kfintech.com **Website:** www.kfintech.com **Contact Person:** Williams R **SEBI Registration No.:** INR000000221

Company Secretary
Ms. Savithri Parekh

Compliance Officer
Mr. Venkataraman Ramachandran

TC-22, 5th Floor, A Wing, Reliance Corporate Park,
Thane Belapur Road, Ghansoli,
Navi Mumbai 400 701Maharashtra, India
Tel: +91 22 7967 0000
E-mail: jpl.investorrelations@jio.com

Investors may contact the Company Secretary or Compliance Officer or the Registrar to the Issue in case of any pre-Issue or post-Issue related grievances including non-receipt of letters of Allotment, non-credit of Allotted Equity Shares in the respective beneficiary account, non-receipt of refund orders or non-receipt of funds by electronic mode, etc. For all Issue related queries and for redressal of complaints, investors may also write to the BRLMs.

Continued on next page...

...continued from previous page.

AVAILABILITY OF THE RHP:

Investors are advised to refer to the RHP and the section titled **"Risk Factors"** on page 30 of the RHP, before applying in the Issue. A copy of the RHP is made available on website of SEBI at **www.sebi.gov.in**, websites of the Stock Exchanges i.e. BSE Limited and National Stock Exchange of India Limited at **www.bseindia.com** and **www.nseindia.com**, respectively, and on the website of the Company at **https://www.jio.com**; and on the websites of the BRLMs, i.e. **Kotak Mahindra Capital Company Limited** – https://investmentbank.kotak.com; **Morgan Stanley India Company Private Limited** – https://www.morganstanley.com/india; **BofA Securities India Limited** – https://business.bofa.com/bofasindia; **Axis Capital Limited** – www.axiscapital.co.in; **BNP Paribas** – www.bnpparibas.co.in; **Citigroup Global Markets India Private Limited** – www.citigroup.com/global/about-us/global-presence/india/regulatory-disclosures-investment-banking; **CLSA India Private Limited** – www.india.clsa.com; **DAM Capital Advisors Limited** – www.damcapital.in; **Goldman Sachs (India) Securities Private Limited** – www.goldmansachs.com; **HDFC Bank Limited** – www.hdfc.bank.in; **HSBC Securities and Capital Markets (India) Private Limited** – www.business.hsbc.co.in; **ICICI Securities Limited** – www.icicisecurities.com; **IIFL Capital Services Limited** – www.iiflcapital.com; **Jefferies India Private Limited** – www.jefferies.com; **JM Financial Limited** – www.jmfl.com; **J.P. Morgan India Private Limited** – www.jpmipl.com; **SBI Capital Markets Limited** – www.sbicaps.com; **UBS Securities India Private Limited** – www.ubs.com/indiaoffers; **360 ONE WAM Limited** – www.360.one;.

AVAILABILITY OF THE ABRIDGED PROSPECTUS:

A copy of the abridged prospectus is made available on the website of the Company, the BRLMs and the Registrar to the Issue at **https://www.jio.com/platforms/** ; **Kotak Mahindra Capital Company Limited** – https://investmentbank.kotak.com; **Morgan Stanley India Company Private Limited** – https://www.morganstanley.com/india; **BofA Securities India Limited** – https://business.bofa.com/bofasindia; **Axis Capital Limited** – www.axiscapital.co.in; **BNP Paribas** – www.bnpparibas.co.in; **Citigroup Global Markets India Private Limited** – www.citigroup.com/global/about-us/global-presence/india/regulatory-disclosures-investment-banking; **CLSA India Private Limited** – www.india.clsa.com; **DAM Capital Advisors Limited** – www.damcapital.in; **Goldman Sachs (India) Securities Private Limited** – www.goldmansachs.com; **HDFC Bank Limited** – www.hdfc.bank.in; **HSBC Securities and Capital Markets (India) Private Limited** – www.business.hsbc.co.in; **ICICI Securities Limited** – www.icicisecurities.com; **IIFL Capital Services Limited** – www.iiflcapital.com; **Jefferies India Private Limited** – www.jefferies.com; **JM Financial Limited** – www.jmfl.com; **J.P. Morgan India Private Limited** – www.jpmipl.com; **SBI Capital Markets Limited** – www.sbicaps.com; **UBS Securities India Private Limited** – www.ubs.com/indiaoffers; **360 ONE WAM Limited** – www.360.one; Registrar to the Issue, **KFin Technologies Limited** – www.kfintech.com., respectively.

AVAILABILITY OF BID CUM APPLICATION FORMS:

Bid cum Application Forms can be obtained from the Registered and Corporate Office of **JIO PLATFORMS LIMITED**, **Tel**: +91 22 7967 0000; BRLMs: **Kotak Mahindra Capital Company Limited,** Telephone: +91 22 4336 0000**; Morgan Stanley India Company Private Limited,** Telephone: +91 22 6118 1000**; BofA Securities India Limited,** Telephone: +91 22 6632 8000**; Axis Capital Limited,** Telephone: +91 22 4325 2183**; BNP Paribas,** Telephone: +91 22 3370 4000**; Citigroup Global Markets India Private Limited,** Telephone: +91 22 6175 9999**; CLSA India Private Limited,** Telephone: +91 22 6650 5050**; DAM Capital Advisors Limited,** Telephone: +91 22 4202 2500**; Goldman Sachs (India) Securities Private Limited,** Telephone: +91 22 6616 9000**; HDFC Bank Limited,** Telephone: +91 22 3395 8233**; HSBC Securities and Capital Markets (India) Private Limited,** Telephone: +91 22 6864 1289**; ICICI Securities Limited,** Telephone: +91 22 6807 7100**; IIFL Capital Services Limited,** Telephone: +91 22 4646 4728**; Jefferies India Private Limited,** Telephone: +91 22 4356 6000**; JM Financial Limited,** Telephone: +91 22 6630 3030**; J.P. Morgan India Private Limited,** Telephone: +91 22 6157 3000**; SBI Capital Markets Limited,** Telephone: +91 22 4006 9807**; UBS Securities India Private Limited,** Telephone: +91 22 6155 6000**; and 360 ONE WAM Limited,** Telephone: +91 22 4031 7000**; Syndicate Members: HDFC Securities Limited** Tel: +91 2230753400**, Investec Capital Services (India) Private Limited** Tel: + 91 2268497400, **JM Financial Services Limited** Tel: +91 22 6136 3400, **Kotak Securities Limited** Tel: +91 2242858484, **SBICAP Securities Limited** Tel: +91 22 6943 2521, **Sharekhan Limited** Tel: +91 22 6750 2000, **360 ONE Capital Market Private Limited** ***(Formerly known as Batlivala & Karani Securities India Private Limited)*** Tel: + 91 022 40317000 / +91 022 40076000 **and 360 ONE Distribution Services Limited** Tel: 9321332882 and at the select locations of the Sub-syndicate Members (as given below), SCSBs, Registered Brokers, RTAs and CDPs participating in the Issue. Bid cum Application Forms will also be available on the websites of BSE and NSE and the Designated Branches of SCSBs, the list of which is available at websites of the Stock Exchanges and SEBI.

Sub-Syndicate Members:

Almondz Global Securities Ltd, Ambit Capital Limited, Ambit Private Limited, Amrapali Capital & Finance Services Limited, Anand Rathi Share & Stock Brokers Limited, Anand Share Consultancy, ANS Pvt Limited, Asit C Mehta Financial Services Limited, Asit C Mehta Investment Intermediates Limited, Axis Securities Limited, Bajaj Financial Securities Limited, Bob Capital Markets Limited, Centrum Broking Limited, Centrum Capital Advisors Limited, Centrum Finverse limited, Centrum Wealth Management Ltd, Choice Equity Broking Private Limited, Dalal & Broacha Stock Broking Pvt Limited, DB(International) Stock Brokers Ltd, Eureka Stock & Share Broking Services Ltd, G Raj & Co. (Consultants) Limited, Globe Capital Market Limited, IDBI Capital Market Services Limited, Inga Ventures Pvt Ltd, Innovate Securities Pvt Limited, Intensive Fiscal Services Private Limited, Jhaveri Securities, Jobanputra Fiscal Services Private Limited, Kalpataru Multiplier Limited, Kantilal Chhaganlal Securities Pvt.Ltd, Keynote Capitals Limited, KJMC Capital Market Services Limited, Lakshmishree Investment & Securities Pvt Limited, LKP Securities Limited, Marwadi Shares & Finance Ltd, Mehta Equities Limited, Monarch Networth Capital Limited, Motilal Oswal Financial Services Limited, Motilal Oswal Securities Limited, Nextbillion Technology Private Limited, Nirmal Bang Securities Pvt Limited, Nuvama Wealth and Investment Limited (Edelweiss Broking Limited), Nuvama Wealth Management Limited, Pantomath Financial Services Limited, Patel Wealth Advisors Pvt Limited, Paytm, Prabhudas Lilladher Pvt Limited, Pravin Ratilal Share & Stock Brokers Limited, Religare Broking Limited, Religare Securities Limited, Rikhav Securities Ltd, RR Equity Brokers Private Limited, SMC Global Securities Limited, Standard Chartered Securities, Sundae Capital, Sunidhi Securities & Finance Ltd, Sushil Financial Services Pvt. Ltd., Systematix Shares & Stocks (India) Limited, Tanna Financial Services, Tradebulls Securities Private Limited, Trust Securities Limited, Viren M Shah, YES Securities (India) Limited, Zerodha

Escrow Collection Banks: Axis Bank Limited and ICICI Bank Limited

Refund Banks: Axis Bank Limited and ICICI Bank Limited

Public Issue Account Banks: Kotak Mahindra Bank Limited and State Bank of India

Sponsor Banks: Axis Bank Limited, ICICI Bank Limited, Kotak Mahindra Bank Limited and State Bank of India

UPI: UPI Bidders can also bid through UPI mechanism

Jio Platforms Limited has provided a toll free number to address any queries related to the Issue.

Toll free number: 1800 309 4001

You may also address your queries related to the Issue by typing **'Hi'** or **'Hello'** on

WhatsApp to 7977222222

For JIO PLATFORMS LIMITED
On behalf of the Board of Directors

Sd/-
Ms. Savithri Parekh
Company Secretary

Place : Mumbai, Maharashtra
Date : October 22, 2026

All capitalised terms used herein and not specifically defined shall have the same meaning as ascribed to them in the RHP.

Jio Platforms Limited is proposing, subject to receipt of requisite approvals, market conditions and other considerations, to make an initial public offering of its Equity Shares and has filed the RHP with RoC on October 14, 2026. The RHP is made available on the website of SEBI at www.sebi.gov.in, on the websites of the Stock Exchanges, i.e. BSE at www.bseindia.com and NSE at www.nseindia.com, on the website of the Company at www.jio.com and on the respective websites of the BRLMs. Any potential investors should note that investment in equity shares involves a high degree of risk, and for details relating to such risk, please see the section titled "**Risk Factors**" on page 30 of the RHP. Potential investors should not rely on the DRHP filed with SEBI and the Stock Exchanges for making any investment decision and should instead rely on the RHP, as filed with the RoC, for making investment decisions.

This announcement is not an offer of securities for sale in the United States or elsewhere. This announcement has been prepared for publication in India only and is not for publication or distribution, directly or indirectly, in or into the United States. The Equity Shares offered in the Issue have not been and will not be registered under the U.S. Securities Act of 1933, as amended (**"U.S. Securities Act"**) or any state securities laws in the United States, and unless so registered, may not be offered or sold within the United States, except pursuant to an exemption from, or in a transaction not subject to, the registration requirements of the U.S. Securities Act and applicable state securities laws in the United States. Accordingly, the Equity Shares are being offered and sold (i) in the United States solely to "qualified institutional buyers" (as defined in Rule 144A under the U.S. Securities Act) in transactions exempt from, or not subject to, the registration requirements of the U.S. Securities Act, or (ii) outside the United States in "offshore transactions," as defined in, and in reliance on Regulation S under the U.S. Securities Act and the applicable laws of the jurisdictions where such offers and sales occur. There will be no public offering of Equity Shares in the United States.

महत्त्वाचे...



नवरात्री स्काय रनमध्ये वैशाली व श्रध्दा गुंटूक मायलेकीचे विक्रम

सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-

स्काय स्पोर्ट्स ग्रुप यांच्या तर्फे आयोजित नवरात्री रन मॅरेथॉन स्पर्धेत राष्ट्रीय धावपटू श्रद्धा केशव गुंटूक व वैशाली केशव गुंटूक मायलेकीनी रनिंग करून ९ दिवसात वैशाली यांनी एकूण २०७ किमी तर श्रद्धा हिने २१८ किमी अंतर पूर्ण केले आहे. वैशाली व श्रद्धा यांनी नवरात्रीत ९ दिवस दररोज १ देवी याप्रमाणे रुपाभवानी देवी, गणेश पेठ येथील हिंगुलांबीका देवी मंदिर, कालिका मंदिर, सरस्वती मंदिर, सीना नदी येथील देवीचे मंदिर, गांधी नगर येथील लक्ष्मी मंदिर, जुळे सोलापूर येथील संतोषी माता मंदिर, सोरेगाव येथील अंबाबाई, वैभवलक्ष्मी मंदिर देवीचे दर्शन घेतले. तसेच विजयादशमीच्या दिवशी या स्पर्धेची सांगता म्हणून डब्ल्यू आय टी येथील अटमॉसफिअर टर्फ येथे ५ किमी स्पर्धेत या मायलेकींनी केलेल्या विक्रमाची नोंद लवकरच वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड व एशिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये होणार आहे. या विजेत्यांचे धाराशिव क्रीडा अधिकारी गणेश पवार, अंतरराष्ट्रीय स्विमिंग कोच श्रीकांत शेटे, मिशन ऑलिंपिक्सचे फाऊंडर केशव गुंटूक, गिर्यारोहक आनंद बनसोडे, आंतरराष्ट्रीय धावपटू अरुण राठोड यांच्या हस्ते ट्रॉफी, मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. स्पर्धेचे संस्थापक व संयोजक श्रीनिवास सब्बन, सॅम परकीपंडला, अंबिका प्लास्टिकचे रमेश नल्ला, राजेश आरकाल व स्काय रनिंग ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

पुणे विभागीय मैदानी स्पर्धेसाठी 'दयानंद'च्या सोहम गुरवची निवड

सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-

शालेय शहर मैदानी स्पर्धेत १९ वर्षांखालील गटात डी.बी.एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालयाच्या सोहम सुरेश गुरव याने १५०० मी धावणेमध्ये प्रथम व ८०० मी धावणे मध्ये द्वितीय स्थान पटकाविले. या कामगिरीवर त्यांची पुणे येथे होणाऱ्या विभागीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली. सोहम यास शारीरिक शिक्षण शिक्षक डॉ. शैलेश बंडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. श्री. महेशजी चोप्रा, प्रशासक डॉ. व्ही. बी. उबाळे, प्राचार्य बी. एच. दामजी, उपप्राचार्य एस. एम. जगताप तसेच पर्यवेक्षक शहाजी मादळे यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



क्रॉस कंट्री स्पर्धेत पंढरपूरच्या 'केबीपी'ची सानिका ऐवळे अव्वल, सुमीत माने तृतीय

पंढरपूर, दि.२२ ऑक्टोबर-

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अंतर्गत आंतरमहाविद्यालयीन क्रॉस कंट्री (१० किलोमीटर धावणे) स्पर्धेत येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या सानिका ऐवळे हिने अव्वल स्थान पटकाविले. सुमित माने याने तृतीय स्थान संपादिले. या कामगिरीच्या जोरावर दोघांची मेंगलोर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रॉस कंट्री स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांना जिमखाना विभागाचे प्रमुख व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. अनिल परमार, प्रा. उमेश साळुंखे, प्रा. विठ्ठल फुले व प्रा. मनोज खपाले यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.





पुणे विभागीय व्हॉलिबॉल स्पर्धेत खामगावला दुहेरी मुकुट

१७ व १९ वर्षांखालील संघाची राज्य स्पर्धेसाठी निवड

तभा वृत्तसेवा
बार्शी दि. २२ ऑक्टोबर

पुणे विभागीय शालेय व्हॉलिबॉल स्पर्धेत खामगावच्या माध्यमिक आश्रम शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाने १७ आणि १९ वर्षांखालील गटात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला. या कामगिरीवर दोन्ही संघांची राज्य स्पर्धेसाठी निवड झाली.

आश्रम शाळा शैक्षणिक संकुल, खामगाव येथे झालेल्या स्पर्धेत त्यांनी ही कामगिरी केली. १७ वर्षांखालील वयोगटाच्या अंतिम सामन्यात माध्यमिक आश्रम शाळा, खामगावच्या संघाने पुण्यातील सिम्बायोसिस कॉलेजच्या संघावर ३-० असा सरळ सेटमध्ये विजय मिळवला. सुरुवातीपासून सामन्यावर पकड राखणाऱ्या खामगावच्या संघाकडून अर्श रोकडे, सफवान शेख आणि लिबेरो सुशांत पालकर यांनी उत्कृष्ट



कामगिरी केली.

१९ वर्षांखालील वयोगटात कनिष्ठ महाविद्यालय, खामगावच्या संघाने पुण्यातील एस. पी. कॉलेजचा ३१ असा पराभव करत विजेतेपदावर नाव कोरले. रंगतदार झालेल्या या अंतिम लढतीत रोहित बोकारे, सेटर सुजल दुर्वे, ओंकार गुदगे आणि लिबेरो आलोक तोडकर यांनी विजयात मोलाचे योगदान दिले. दरम्यान, १४ वर्षांखालील वयोगटात पुणे ग्रामीण संघाने पुणे शहर संघाचा ३० असा सरळ सेटमध्ये पराभव करून विजेतेपद मिळवले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. सुरेश लांडगे, चेतन डमरे, सौरभ मांजरे, पवन मिसाळ, चंदन लांडगे, चाणक्य लोखंडे, क्रीडा प्रशिक्षक सूरज पवार आणि बिपीन जाधव यांनी परिश्रम घेतले.

या यशाबद्दल संस्थेचे मार्गदर्शक आमदार राजेंद्र राऊत आणि अध्यक्ष प्रभाकरदादा डमरे यांनी विजेत्या संघांचे, खेळाडूंचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.



शालेय हँडबॉल स्पर्धेत इंडियन मॉडेल स्कूलला विजेतेपद

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-

शालेय शहर हँडबॉल स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलींच्या गटात इंडियन मॉडेल स्कूल (स्टेट बोर्ड) संघाने विजेतेपद पटकाविले. उपांत्य सामन्यात त्यांनी पोलिस पब्लिक स्कुलचा ४-२ ने तर अंतिम सामन्यात सुयश विद्यालयाच ७-१ गोलने पराभव केला.

त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए. डी.जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका सुजाता बुट्टे, ममता बसवंती यांनी अभिनंदन केले. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक अक्षय माने, वैष्णवी गडदे, प्रशिक्षक ऋषिकेश मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

विजयी संघ : सार्थकी कोळेकर, वैष्णवी मात्रे, दर्शिका दुलंगे, अन्नपुर्णा माड्याळ, सुप्रिया मोरे, अनुजा बहाळस्कर, श्रुती काळे, अनन्या वाळुजकर, अनुष्का जाधव, तेजश्री फुलारी.

पंढरपुरच्या चव्हाण व वाघमारे यांची विद्यापीठ बॉक्सिंग संघात निवड



तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. २२ ऑक्टोबर -

येथील उमा महाविद्यालयाच्या रोहित चव्हाण व आनंद वाघमारे यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या बॉक्सिंग संघात निवड झाली. या स्पर्धा ३० ऑक्टोबर ते ६ नोहेंबर या कालावधीत गलगोटीया युनिवर्सिटी, नोइडा उत्तर प्रदेश येथे होणार आहेत. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद ढवण याचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष प्रशांतराव परिचारक, उपाध्यक्ष मुकुंद परिचारक, सचिव राजगोपालजी भट्टड, खजिनदार रमेश लाड, विश्वस्त प्रणवजी परिचारक, कार्यवाह डॉ. मिलिंद परिचारक, प्राचार्य डॉ. धिरजकुमार बाड कार्यालयीन अधीक्षक सज्जन लोंढे आदींनी अभिनंदन केले.

राज्य खो-खो चाचणीसाठी सोलापूरच्या खेळाडूंची निवड जाहीर

बीड येथे होणाऱ्या राज्य निवड चाचणीत भाग घेणार

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-

खो-खो सोलापूरच्या वतीने झालेल्या निवड चाचणीतून सोलापूर जिल्ह्यातून प्रत्येकी ५ खेळाडूंची निवड जिल्हा समन्वयक सत्येन जाधव यांनी जाहीर केले.

नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर झालेल्या जिल्हा पुरुष व महिला खो-खो निवड चाचणीतून हे खेळाडू निवडले. हे खेळाडू २६ ऑक्टोबर रोजी बीड येथे होणाऱ्या राज्य पुरुष व महिला खो-खो निवड चाचणीत भाग घेतील.

या जिल्हा निवड चाचणीचे उद्घाटन सोलापूर शहर भाजपचे सचिव अमोल बापू कारंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी



प्रा. संजय बनसोडे, विनोद ढेरे (करमाळा) आदी उपस्थित होते. सदानंद गुजले, आनंद जगताप, श्रीकांत चव्हाण या निवड समिती सदस्यांनी हे खेळाडू निवडले.

जिल्हा चाचणीतून निवडलेले खेळाडू
: पुरुष : पवन रजपूत, गणेश राठोड, रोहन रजपूत (विजय क्लब, सोलापूर), अभिषेक कोळी (ए. एम. स्पोर्ट्स, डोणज). प्रतिक ढेरे (करमाळा).

महिला : अर्चना व्हनमाने, सादिया मुल्ला, आरती खरात, सृष्टी रूपनवर, गौरी कासवीद (सर्व विजय क्लब, सोलापूर).

कोंडी आरोग्य केंद्रातील नवजात शिशू कक्ष पुन्हा सुरु

सुरक्षेसाठी निधी देणार : डॉ.माने

विद्युत यंत्रणेतील बिघाड दुरुस्त

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड यांची माहिती

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२३ ऑक्टोबर-

कोंडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील नवजात शिशू कक्षात विद्युत यंत्रणेतील बिघाडामुळे आग लागल्याच्या घटनेनंतर आरोग्य विभागाने तातडीने दुरुस्तीची कार्यवाही केली आहे. विद्युत यंत्रणेतील बिघाड दूर करून नवजात शिशू कक्ष पूर्ववत सुरू करण्यात आला असून, आरोग्य केंद्रातील आवश्यक सोयी-सुविधा आणि सुरक्षाव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही केली जाणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य



अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड यांनी दिली.

कोंडी प्राथमिक आरोग्य केंद्रातील नवजात शिशू कक्षात शॉर्टसर्किटमुळे आग लागली होती. या घटनेची माहिती मिळताच जिल्हा परिषद सदस्य डॉ. पृथ्वीराज माने यांनी आरोग्य केंद्राला भेट देऊन पाहणी केली. तसेच दूरध्वनीवरून जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कोपुरवाड यांच्याशी चर्चा करून विद्युत यंत्रणेची तातडीने दुरुस्ती करण्याची आणि रुग्णांच्या सेवेसाठी संबंधित विभाग लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी केली.

शासकीय आरोग्य इमारतींच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर

दरम्यान, जिल्हा परिषद अंतर्गत सर्व शासकीय इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रांमधील रुग्णोपयोगी सुविधा व सुरक्षाव्यवस्थेसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी जिल्हा परिषद सदस्य डॉ. पृथ्वीराज माने यांनी केली आहे. कोंडी प्राथमिक आरोग्य केंद्रातील आवश्यक दुरुस्ती आणि सुविधांसाठीही निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे त्यांनी सांगितले.

यानंतर सोमवारी दुपारी डॉ. कोपुरवाड यांनी कोंडी प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट देऊन घटनेची पाहणी केली. विद्युत यंत्रणेतील बिघाडामुळे ही दुर्घटना घडल्याचे स्पष्ट करत त्यांनी दुरुस्ती पूर्ण झाल्यानंतर नवजात शिशू कक्ष पुन्हा सुरू करण्यात आल्याचे सांगितले. याशिवाय आरोग्य केंद्रातील आवश्यक सोयी-सुविधांसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या घटनेमुळे ग्रामीण भागातील आरोग्य संस्थांमधील विद्युत यंत्रणा, इमारतींची सुरक्षितता आणि आपत्कालीन व्यवस्थेच्या नियमित तपासणीचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे. विशेषतः नवजात बालकांसारख्या संवेदनशील रुग्णांना सेवा देणाऱ्या कक्षांमध्ये सुरक्षिततेच्या उपाय योजनांना प्राधान्य देण्याची गरज व्यक्त होत आहे. यावेळी कोंडी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुभाष कांबळे यांच्यासह वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सोलापूर

तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

डायरेक्ट मिलच्या दरात खरेदी करा.

लोकमत व धूत सिल्क सारीज् प्रस्तुत

दसरा दिवाळी खरेदी महोत्सव २०२३

N.R. DHOOT GROUP Since 1975

धूत सिल्क सारीज्

९१२, चाटी गल्ली, सोलापूर. | कावळे मेडिकलच्या बोळात, चाटी गल्ली, बाळीवेस, सोलापूर.

खरेदी करा कुपन मिळवा जिंका लाखोंची बक्षिसे

योजनेचा कालावधी १२ ऑक्टो. ते ११ नोव्हे. २०२३



5, औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक 2026 | राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना महायुतीचे अधिकृत उमेदवार

अ.क्र. 2

चव्हाण सतीश भानुदासराव
बी.ई. (मेकॅ.)

पसंती क्र. 1

यांनाच प्रथम पसंतीचे मत देऊन विजयी करा !



मतदान - शुक्रवार , दि. 23 ऑक्टोबर 2026 वेळ - सकाळी 8:00 ते दुपारी 4:00 पर्यंत

मतदार यादीत आपले नाव पाहण्यासाठी 0794 344 9512 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

प्रकाशक : नितीन बागवे

काही लोक परदेशात भारताची बदनामी करत आहेत

पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विरोधकांवर हल्लाबोल



नवी दिल्ली : जग जिथे नव्या क्रमाच्या शोधात आहे, तिथे काही लोक भारतात अराजकतेची स्वप्ने पाहत आहेत. काही लोक जगभरात जाऊन भारताची बदनामी करत असल्याचा टोला लगावत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला.

एनडीटीव्ही वर्ल्ड समिट २०२६ ला संबोधित करताना देशातील सध्याच्या परिस्थितीवर ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या थीमनुसार त्यांनी जगातील सध्याचे राजकारण, अर्थव्यवस्था, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि जगभरातील भारताच्या भूमिकेबाबत आपले विचार मांडले. पंतप्रधानांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला म्हटले की, आपल्याला दोन गोष्टी समजून घ्याव्या लागतील. जुना जागतिक क्रम आजच्या आव्हानांवर उपाय का देऊ शकत नाही आणि या बदलत्या जगात भारताची भूमि का काय आहे. आजकाल नव्या वर्ल्ड ऑर्डरची चर्चाही प्रत्येकजण करत आहे, कारण त्याचा परिणाम सामान्य लोकांच्या जीवनावर होत आहे. जगाचा वर्ल्ड ऑर्डर का बदलत आहे, हे आपल्याला समजून घ्यावे लागेल. आणि या बदलत्या जगात भारताची भूमिका काय आहे, हेही पाहावे लागेल. दुसऱ्या महायुद्धाने जगाला एक मोठा धडा दिला होता. सन्मान, सहकार्य आणि वादांचे निराकरणही आवश्यक आहे, हे जगाला समजले होते. याच विचारातून संयुक्त राष्ट्रसंघाची पायाभरणी झाली. संयुक्त राष्ट्रसंघाने आपली भूमिका पार पाडली, पण आज जगासमोर नवे आव्हान आहे. तंत्रज्ञानाने जग पूर्णपणे बदलून टाकले आहे. पूर्वी जे देश त्या काळच्या ग्लोबल ऑर्डरचा भाग नव्हते, ते आता त्यात सहभागी झाले आहेत. पण संयुक्त राष्ट्रसंघासमोरील आजची आव्हाने स्पष्टपणे दिसून येतात. जगाच्या समस्या बदलल्या, पण त्यावरील उपाययोजनांची पद्धत बदलली नाही, तर दुरावा निर्माण होतो. आणि आज नेमके तेच घडत आहे. आज व्यापार हे शस्त्रीकरणाचे म ाध्यम बनत आहे, सागरी मार्ग आज भूराजकीय तणावाचे केंद्र बनत आहेत. त्यामुळे आव्हान हे आहे की नव्या वास्तवांना स्थान कसे दिले जाईल. इथून भारताची भूमिकाही समोर येते. २०२० मध्ये मी म्हटले होते की, जगासाठी एका नव्या जागतिक व्यवस्थेची गरज आहे.

मोदींचा काँग्रेसवर निशाणा

पंतप्रधान मोदी म्हणाले की, जग नव्या ऑर्डर्सच्या शोधात आहे, तर काही लोक भारतात अव्यवस्थेची स्वप्ने पाहत आहेत. काही लोक जगभर जाऊन भारताची बदनामी करत आहेत. हे लोक परदेशात जाऊन भारताविरोधात बंडाची याचिका दाखल करतात. काँग्रेस आपल्या नेत्याला आणखी किती काळ लॉन्च करत राहणार, हे कळत नाही. वर्षभरात श्रीहरिकोटाहून जितके प्रक्षेपण होत नाहीत, तितकी काँग्रेसच्या नेत्याची होतात. आज कुटुंब काँग्रेसवर ओझे बनले आहे. काँग्रेसचे लोक एकांतात हे सांगतात. आज यामुळे देशातील प्रामाणिक टीकाकारांनाही नुकसान होत आहे. काँग्रेस परजीवी बनली आहे. जी कोणालाही पुढे जाऊ देत नाही. वैचारिक नक्षलवाद्यांनी काँग्रेसच्या विचारसरणीवर असा कब्जा केला आहे की आज ते काँग्रेसचा नाश करत आहेत. अशा आव्हानांसमोर आपल्यासमोर विकसित भारताचे ध्येय आहे. त्यामुळे आपल्यासमोर एकच स्वप्न आहे-वी विल डू इट. वी विल डू इट, आपण नव्या उंचीला स्पर्श करू. आणि संपूर्ण जगासमोर स्वतःला भक्कमपणे सादर करू.

मनोज जरांगेनी ऐकविली ५०० कोटींच्या दाव्याची स्फोटक ऑडिओ क्लिप

छत्रपती संभाजीनगर

गेल्या ३ वर्षांपासून मराठा आरक्षण आंदोलन मोडून काढण्यासाठी आणि गरीब मराठ्यांच्या लेकरांचे हक्क संपवण्यासाठी सत्ताधाऱ्यांकडून अत्यंत भयंकर व गलिच्छ षड्यंत्र रचले जात आहे. म ाझ्याच समाजातील काही पोरांना हाताशी धरून, त्यांना पैसा, मोर्चे आणि गाड्यांचा खर्च पुरवून माझ्याविरोधात रान उठवले गेले. 'बाप दाखवा नाहीतर श्राद्ध घाला' म्हणणाऱ्या सत्ताधाऱ्यांचे वस्त्रहरण करणारा ३२ मिनिटांचा पुरावा आज मी अखंड महाराष्ट्रासमोर ठेवला आहे. सत्ताधाऱ्यांनी हे षड्यंत्र तत्काळ थांबवले नाही, तर १ ते २ महिन्यांत असा बॉम्ब टाकेन की या राज्यात २०२९ ला एकालाही तोंड दाखवायला किंवा पाय ठेवायला जागा उरणार नाही, असा इशारा मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.



प्रदीर्घ पत्रकार परिषदेत जरांगे पाटील यांनी सत्ताधारी महायुतीतील अंतर्गत रणनीतीकारांची एक गुप्त ऑडिओ क्लिप ऐकवली. (या ऑडिओ क्लिपच्या सत्यतेची पुष्टी तरुण भारत करत नाही.) यामध्ये ५०० कोटींचा दावा, दरेकर-डावखरे यांचे कनेक्शन, सोशल मीडिया नॅरेटिव्ह आणि जरांगे यांच्याविरोधात मराठा नेत्यांना रसद पुरवण्याचा कट उघडकीस आणल्याचा दावा जरांगे यांनी केला. या क्लिपमध्ये स्पष्ट दिसते की पक्षाचा फंड नसेल तर वैयक्तिक फंड वापरा, गाड्यांचा आणि मोर्चांचा खर्च द्या, पण जरांगेंना डॅमेज करा. जरांगेंच्या विरोधात बोलणाऱ्या मराठा अभ्यासक, प्रवक्ते आणि समन्वयकांना मुंबई-पुण्यात पत्रकार परिषदांसाठी जागा आणि रसद कोण पुरवते, हे आता सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ झाले आहे. दरम्यान, शिंदे सेनेच्या नेत्यांनीही मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन याप्रकाराची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली.

बैद्यनाथ प्रस्तुत

PainQuit
OIL + TABLET

दुखण्यावर
मिळवा त्वरित आराम



परिणाम दिसतो फक्त 7 दिवसांत

विलनिकली प्रूव्हन

आता वेदना सहन करण्याची गरज नाही

गुडघे दुखणे | पाठ आणि मांसपेशिंमध्ये वेदना | खांदे दुखणे

सिध्दायु- बैद्यनाथ चा विश्वास

मोफत वैद्यकीय सल्ल्यासाठी संपर्क साधा : 844 844 4935

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०२६



शिक्षकांच्या आकांक्षापूर्तीसाठीचा आश्वासक चेहरा, तरुण उमेदवार



कौस्तुभ मुरलीधर गावडे

यांच्या नावासमोर पसंतीक्रम | लिहून प्रचंड बहुमताने विजयी करा!

पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०२६

अ. क्र.	उमेदवाराचे नाव, पक्ष	उमेदवाराचे छायाचित्र	पसंतीक्रम
२	कौस्तुभ मुरलीधर गावडे भारतीय जनता पार्टी			

मतदान : शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर, २०२६ | सकाळी ८ ते दुपारी ४ पर्यंत

प्रकाशक : श्री. राजेश पांडे । दिनांक : २२ ऑक्टोबर २०२६

पुणे पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६



निर्धार पदवीधरांचा, विकसित महाराष्ट्राचा!



भारतीय जनता पार्टी - महायुतीच्या पुणे पदवीधर मतदारसंघातील अधिकृत उमेदवार

डॉ. स्मिता योगेश जाधव

यांच्या नावासमोर पसंतीक्रम | लिहून प्रचंड बहुमताने विजयी करा!

पुणे पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६

अ. क्र.	उमेदवाराचे नाव, पक्ष	उमेदवाराचे छायाचित्र	पसंतीक्रम
२	डॉ. स्मिता योगेश जाधव भारतीय जनता पार्टी			

मतदान : शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ | सकाळी ८ ते दुपारी ४ पर्यंत

प्रकाशक : श्री. राजेश पांडे । दिनांक : २२ ऑक्टोबर २०२६

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

अग्रलेख

आवईमधून उगवले आशेचे अंकुर!

आभासी मंचावर केवळ गंमत म्हणून उदयास आलेल्या झुरळ पक्षाने देशात काही काळ माजविलेल्या गदारोळानंतर ज्यांना सत्तापरिवर्तनाची स्वप्ने पडू लागली आहेत, त्यामध्ये महाराष्ट्राच्या जनतेने पुरते नाकारल्याने केवळ बोलघेवडेपणा करीत आपले अस्तित्व टिकविण्याचा प्रयत्न करणाऱ्या राज ठाकरे यांचादेखील आता समावेश झाला, हे बरे झाले! झुरळ पार्टीच्या आंदोलनानंतर देशातील विरोधकांना सत्तापरिवर्तनाची स्वप्ने पडू लागली आहेत आणि कायम शेळीसारखे जगणाऱ्यांना एक दिवस तरी वाघासारखे जगावे, असे वाटू लागले आहे. गेल्या चार-पाच वर्षांत उद्धव ठाकरे यांच्या पक्षाची अवस्था शेळीसारखीच झाली होती. पक्षाची पडझड आणि अवकळा थांबविण्यासाठी महाविकास आघाडीत सामील होऊन काँग्रेसचे बोट धरून आणि जो कोणी हात पुढे करेल त्याच्यासमोर मतांच्या बेरजेसाठी लोटांगण घालून वाटणीस येणाऱ्या सत्तेची लाचारपणे रवंथ करण्यातच सारा काळ संपला. आम्ही 'रिजीम चेंज' घडविणारच, अशी आरोळी विजयादशमीला उद्धव ठाकरे यांनी ठोकली, तेव्हा तमाम विरोधकांचे स्वघोषित प्रवक्ते म्हणून काम करणारे त्यांच्या पक्षाचे नेते संजय राऊत यांचे लक्ष मात्र, राहुल गांधी यांच्या व्हिएतनाम दौऱ्याच्या परतवारीकडे लागले होते. विरोधी पक्षांतील जनाधार नसलेल्या काही नेत्यांनी उठविलेल्या सत्तापरिवर्तनाच्या आवईमध्ये भविष्यातील अस्तित्वाच्या आशा दिसू लागल्याने ठाकरे परिवाराच्या आनंदाला पारावार राहिलेला नाही. त्याच आनंदातून, भाकितांचा भडिमार सुरू करण्यासाठी राज ठाकरे यांनीही दंड थोपटले आहेत. पण सत्तापालटासाठी निवडणुका हाच लोकशाहीचा एकमेव वैध मार्ग असतो आणि निवडणुकांतील जनतेचा कौल महत्त्वाचा असतो. अशा निवडणुकांत ज्यांना सातत्याने जनतेने नाकारले आहे, अशा परिवारास आता एक दिवसापुरते तरी वाघ व्हावेसे वाटू लागले असले, तरी त्यामुळे लगेचच परिवर्तनाची संधी हात जोडून समोर उभी राहील, हा त्यांचा तद्दन हतबल आशावाद आहे. लोकशाहीमध्ये विरोधी पक्ष बलवान असलाच पाहिजे. अशा विरोधी पक्षाने सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवण्यात व जनतेच्या हितासाठी काम करण्याकरिता सरकारला भाग पाडण्यात महत्त्वाची भूमिका निभावलीच पाहिजे. पण सध्या विरोधी पक्षांकडे संख्याबळ असले, तरी त्यांचे नैतिक बळ मात्र खंगत चाललेले दिसते. एका आभासी पक्षाच्या कचकड्याच्या आंदोलनातून मिळालेल्या तात्पुरत्या शक्तीचा वापर करून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या शिल्लक मनसेसह अन्य पक्षांना बळ मिळाल्यासारखे वाटत असेल, तर आपल्या वर्तमानाचा आणि भविष्याचा नेमका अंदाज घेण्यात ते अजूनही चाचपडतच आहेत, असे म्हणावे लागेल.

सरकारच्या भविष्याची भाकड भाकिते वर्तविण्यात संजय राऊत यांच्यासारख्या 'थोर' भविष्यवेत्त्याचा हात कोणीच धरू शकणार नाही. गेल्या बारा वर्षांतच नव्हे, तर त्याही आधीपासून ते केवळ बिनबुडाची भाकिते वर्तवत राहिले असून काही मोजक्या माध्यमांना त्यामुळे आयता मसाला मिळत असल्याने त्यास बऱ्यापैकी प्रसिद्धीही मिळत राहिली आहे. तथापि, त्यांनी वर्तविलेले एकही भाकीत आजपावेतो खरे झालेले नाहीच; उलट अन्य पक्षांच्या भविष्याची भाकिते वर्तविण्यात व्यग्र राहिल्यामुळे स्वपक्षाची होत गेलेली वाताहत त्यांना जाणवलीच नाही आणि राऊत यांच्या भाकितावर अंधविश्वास ठेवून त्यांच्या शब्दांची री ओढणाऱ्या उद्धव ठाकरेंचेही हसे होत गेले. आता त्यांच्या कंपूमध्ये सामील झालेले राज ठाकरे यांनाही त्याच मार्गाने चालणे गरजेचे वाटू लागल्याने, राऊत यांनी पेरलेल्या पोकळ बियाणातून उगवणाऱ्या अफवांचे पीक पसरविण्यात त्यांना मजा वाटू लागली असावी. हाच प्रयत्न राष्ट्रीय पातळीवर सुरू झाला आणि त्याचा धागा पकडून आता राज ठाकरे यांनी नवे भाकीत मांडले. येत्या तीन-चार महिन्यांत देशात मोठी गडबड होणार, संपूर्ण जनता रस्त्यावर उतरणार आणि काही काळ तर पंतप्रधानाविनाच पाहावा लागणार अशी मुक्ताफळे उधळून राज ठाकरे यांनी पुन्हा माध्यमांच्या रकान्यांमधील जागा व्यापली आहे. झुरळ पार्टीने मुख्य निवडणूक आयुक्तांच्या विरोधात सुरू केलेल्या आंदोलनानंतर आता विरोधकांना ज्या काही नव्या युक्ती सुचू लागल्या आहेत, त्यामध्ये मतपत्रिकांद्वारे मतदान हा जुना आवाज पुन्हा बुलंद करण्याचा प्रयत्न स्पष्ट दिसतो. मतपत्रिकांद्वारे होणाऱ्या मतदानात राजकारणातील बाहुबलींनी घातलेल्या धुमाकुळाची असंख्य उदाहरणे अजूनही इतिहासात कायमची बासनबंद झालेली नाहीत. पेट्यांची पळवापळव, बोगस मतपत्रिकांची अदलाबदल आणि मतदान केंद्रांचा ताबा घेऊन सत्तेची संधी साधण्याचे हरतऱ्हेचे प्रयत्न वेगवेगळ्या काळात उघडकीस आले होते. गेल्या काही वर्षांत मतदान यंत्रांचा वापर सुरू झाला आणि अशा प्रयत्नांना आळा बसला. पण त्यामुळे सातत्याने पराभव पत्करावा लागलेल्या पक्षांना जनतेच्या समाधानाचीच सल बोचत असल्याने, आता निवडणुका हा परिवर्तनाचा प्रामाणिक मार्गच अमान्य करून रस्त्यावर उतरण्याचा अविवेकी प्रयत्न सुरू झाला आहे. राज ठाकरे यांच्या परिवर्तनाच्या भाकिताला याच अविवेकाचा वास येतो. झुरळ पार्टीच्या आंदोलनाचे खंदे समर्थक म्हणविणाऱ्या प्रशांत भूषण यांनी सत्तापरिवर्तनाच्या या मार्गास मान्यता देऊन लोकशाहीच्या संकेतांना पहिली तिलांजली दिली. त्यांचे अन्य साथीदारही त्याचीच री ओढू लागले. त्यामध्ये आघाडीवर असलेले योगेंद्र यादव हे स्वतःस निवडणूकशास्त्राचे तज्ज्ञ म्हणवितात. निवडणुकीच्या राजकारणाचे विश्लेषण करताना त्यांच्या चेहऱ्यावर तज्ज्ञपणाचे तेज उफाळून येत असते. त्याचा आधार घेऊन अशी भाकिते वर्तविण्यात तेदेखील आघाडीवर असतात. राज ठाकरे यांनाही स्वपक्षाची भक्कम बांधणी करता आलेली नाही. राज ठाकरे यांनी शिवसेना सोडून महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्थापन केल्यानंतर या पक्षात मनोरंजनाची काहीशी पोकळी निर्माण झाली होती. ती भरून काढण्याचा बराच प्रयत्न उद्धव ठाकरे यांनी सातत्याने केला, पण या जनतेला प्रयत्नांतही मनोरंजन दिसू लागले. आदित्य ठाकरे यांनीही उद्धव ठाकरे यांचा वारसा पुढे चालविण्याचा प्रयत्न केला. त्याकडे जनतेने फारसे लक्ष दिले नाही. राज ठाकरे यांनी अस्तित्व टिकविण्याचा अखेरचा प्रयत्न म्हणून उद्धव ठाकरे यांच्या पक्षांसोबत हातमिळवणी करण्याचा निर्णय घेतल्याने मनोरंजनाच्या राजकारणातील एक मोठी पोकळी भरून निघाल्याची या परिवाराची समजूत झाली असावी. सत्तापरिवर्तनाचे स्वप्न हा त्याच समजुतीचा परिणाम असावा. गेल्या अनेक वर्षांपासून उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला नाईलाजास्तव शेळीचे कातडे पांघरून राहावे लागले आहे. सत्तापरिवर्तनाचे स्वप्न पाहताना, हे कातडे भिरकावून देऊन वाघाचे कातडे पांघरल्याचा भास आता त्यांना होऊ लागला असावा. मागे एकदा, भाजपसोबतच्या युतीचा कटोरा अशाच आवेशांत भिरकावून दिल्यानंतर काँग्रेस, शरद पवार गट आणि जे जे सोबत येऊ शकतात त्या सर्वांसोबत युती करण्यासाठी कटोरा फिरवला आणि सत्ता बळकावण्याचे स्वप्न साकार झाले. त्या योगायोगाची पुनरावृत्ती होईल, येत्या तीन-चार महिन्यांत देशात मोठी गडबड होईल, जनता रस्त्यावर उतरून आपला राग व्यक्त करेल आणि आपोआप 'रिजीम चेंज' होऊन सत्तेचे स्वप्न साकार होईल या अपेक्षेने येत्या दोन-चार महिन्यांच्या भविष्याकडे डोळे लावून बसलेल्या ठाकरे परिवाराच्या स्वप्नरंजनातून जनतेचे मनोरंजन होत असेल, तर ते तसे होणे चांगलेच आहे. पण केवळ स्वप्ने पाहून 'रिजीम चेंज' किंवा सत्तापरिवर्तन होत नाही, तर जनतेने निवडणुकीतून ते घडवावे लागते आणि अशा परिवर्तनासाठी जनतेचा विश्वास संपादन करावा लागतो. केवळ विनोदी आणि भाकड भाकिते वर्तवून ते साध्य होत नसते. ■

अर्थ विशेष

...तर कर कोणाला भरावा लागतो?

ॲड. हितेश पारसे

आजच्या काळात अनेक पालक आपल्या मुलांना घर खरेदी करण्यासाठी पैसे देतात, फ्लॅट घेण्यासाठी आर्थिक मदत करतात, बँक खात्यात मोठी रक्कम हस्तांतरित करतात किंवा स्वतःच्या मालकीची मालमत्ता मुलांच्या नावावर करतात. काही वेळा परदेशात राहणारी मुले भारतातील आई-वडिलांना घरखर्चासाठी किंवा वैद्यकीय गरजांसाठी पैसे पाठवतात. अशा व्यवहारांबाबत एक प्रश्न वारंवार विचारला जातो- पालकांनी मुलांना पैसे दिले तर कर कोणाला भरावा लागतो? या प्रश्नांच्या उत्तरासाठी या सर्व बाबी विचारात घ्याव्या लागतात.

१. आई-वडिलांनी आपल्या मुलाला किंवा मुलीला कोणताही मोबदला न घेता पैसे भेट म्हणून दिल्यास, सामान्यतः प्राप्तकर्त्या मुलाच्या किंवा मुलीच्या हातात त्या रकमेवर उत्पन्नकर लागत नाही. आयकर कायद्यात नातेवाईकांकडून मिळालेल्या भेटींसाठी विशेष सवलत आहे. उदाहरणार्थ, वडिलांनी आपल्या मुलाला घर खरेदी करण्यासाठी २५ लाख रुपये दिले किंवा आईने मुलीच्या बँक खात्यात १० लाख रुपये हस्तांतरित केले, तर केवळ ही रक्कम भेट म्हणून मिळाल्यामुळे मुलाला किंवा मुलीला त्या रकमेवर उत्पन्नकर भरावा लागत नाही. महत्त्वाची बाब म्हणजे, इतर व्यक्तींकडून मिळालेल्या काही भेटींवर वार्षिक एकूण रक्कम ५०,००० रुपयांपेक्षा जास्त झाल्यास कर लागू होऊ शकतो; मात्र पात्र नातेवाईकांकडून मिळालेल्या भेटींना ही सवलत लागू होते. तथापि, व्यवहार खरोखर भेट आहे की कर्ज, गुंतवणूक किंवा अन्य प्रकारचे हस्तांतरण आहे, हे स्पष्ट असणे आवश्यक आहे.

२. मोठी रक्कम बँक खात्यात जमा झाली म्हणजे ती आपोआप करपात्र उत्पन्न ठरत नाही. मात्र, व्यवहाराचे स्वरूप आणि पैशांचा स्रोत स्पष्ट नसल्यास बँक किंवा आयकर विभागाकडून स्पष्टीकरण मागितले जाऊ शकते. उदाहरणार्थ, एखाद्या वडिलांनी स्वतःच्या बचतीतून मुलाच्या खात्यात ३० लाख रुपये हस्तांतरित केले. वडिलांच्या उत्पन्नाचे आणि बचतीचे स्रोत स्पष्ट असतील, बँक व्यवहाराची नोंद उपलब्ध असेल आणि पैसे भेट म्हणून दिल्याचे पुरावे असतील, तर व्यवहाराचे स्पष्टीकरण देणे सोपे होते. याउलट, मुलाच्या खात्यात अचानक मोठी रक्कम जमा झाली, परंतु ती कुठून आली, कोणी दिली आणि कशासाठी दिली याची माहिती उपलब्ध नसेल, तर अडचण निर्माण होऊ शकते. अशा व्यवहारांसाठी पुढील कागदपत्रे जतन करावीत : - • पैसे देणाऱ्या पालकांचे बँक स्टेटमेंट. • पैसे हस्तांतरित केल्याचा पुरावा. • देणारा आणि घेणारा यांच्यातील नात्याचा पुरावा. • आवश्यकतेनुसार गिफ्ट डीड किंवा भेटीचे लेखी घोषणापत्र. • पैशांचा स्रोत स्पष्ट करणारी उत्पन्नाची किंवा बचतीची कागदपत्रे.



३. मुलांना पैसे दिल्यानंतर त्या पैशांवर मिळणाऱ्या व्याजाचा कर कोण भरेल? हा महत्त्वाचा मुद्दा आहे. समजा, वडिलांनी मुलाला २० लाख रुपये भेट म्हणून दिले. मुलाने त्या पैशांची बँकेत मुदत ठेव केली आणि त्यावर वर्षभरात १.४० लाख रुपये व्याज मिळाले. अशा परिस्थितीत मुलगा सज्ञान असेल आणि रक्कम त्याला वैधरीत्या भेट म्हणून दिलेली असेल, तर सामान्यतः त्या ठेवीवरील व्याज मुलाच्या उत्पन्नात समाविष्ट होईल आणि लागू नियमानुसार त्याच्या कराची गणना होईल. म्हणजेच, मूळ भेटीच्या रकमेवर कर नसला, तरी त्या रकमेतून मिळणारे पुढील उत्पन्न करपात्र असू शकते. मात्र, मुलगा किंवा मुलगी अल्पवयीन असल्यास वेगळे नियम लागू होऊ शकतात. अल्पवयीन मुलाच्या उत्पन्नाचे पालकांच्या उत्पन्नात एकत्रीकरण करण्याची तरतूद लागू होऊ शकते, काही अपवादांच्या अधीन राहून.

४. मुलांना घर खरेदीसाठी पैसे दिले... अनेक पालक मुलांना स्वतःचे घर घेण्यासाठी मोठी आर्थिक मदत करतात. उदाहरणार्थ, मुलाने ८० लाख रुपयांचा फ्लॅट खरेदी केला आणि त्यासाठी पालकांनी २० लाख रुपये दिले. ही रक्कम खरोखर भेट म्हणून दिली असल्यास, सामान्यतः मुलाच्या हातात भेटीच्या रकमेवर आयकर लागत नाही. मात्र, घराच्या खरेदीसाठी लागणारे मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, गृहकर्ज आणि इतर खर्च यांचा स्वतंत्र विचार करावा लागतो. याशिवाय, मुलाने पुढे घर विकल्यास भांडवली नफा कराचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. पालकांकडून मिळालेल्या पैशातून खरेदी केलेल्या घराच्या बाबतीत, घराची खरेदी किंमत, मालकीचा कालावधी आणि विक्रीच्या वेळी लागू असलेल्या करनियमांनुसार गणना केली जाते. पालकांनी पैसे भेट म्हणून दिले आहेत की कर्ज म्हणून, हेही स्पष्ट असावे. पैसे परत घेण्याचा उद्देश असल्यास व्यवहाराला भेट म्हणण्याऐवजी योग्य कर्जकरार व परतफेडीच्या अटी नोंदविणे अधिक योग्य ठरू शकते.

५. पालकांनी आपल्या मुलाला किंवा मुलीला घर, फ्लॅट, प्लॉट किंवा अन्य स्थावर मालमत्ता भेट म्हणून दिल्यास, पात्र नातेवाईकाकडून मिळालेल्या मालमत्तेसाठी असलेल्या आयकर सवलतीचा लाभ सामान्यतः मिळतो. मात्र, येथे दोन बाबी स्वतंत्रपणे तपासाव्या लागतात. पहिली म्हणजे आयकर. पात्र भेट व्यवहारात केवळ मालमत्ता मिळाल्यामुळे मुलाच्या हातात सामान्यतः कर लागत नाही. दुसरी म्हणजे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी. महाराष्ट्रात काही विशिष्ट कौटुंबिक भेटींना मुद्रांक शुल्काची सवलत उपलब्ध असू शकते. मात्र, मालमत्तेचा प्रकार, नातेसंबंध आणि लागू कायदेशीर अटी तपासणे आवश्यक आहे. याशिवाय, मुलाने पुढे मालमत्ता विकल्यास भांडवली नफा कर लागू होऊ शकतो. त्यामुळे मालमत्तेचे हस्तांतरण करण्यापूर्वी गिफ्ट डीड, मुद्रांक शुल्क, नोंदणी आणि भविष्यातील करपरिणाम यांचा एकत्रित विचार करावा.

६. मुलांना पैसे दिले आणि त्यांनी ते व्यवसायात गुंतवले तर? समजा, पालकांनी मुलाला १५ लाख रुपये भेट म्हणून दिले आणि मुलाने ती रक्कम स्वतःच्या व्यवसायात गुंतवली. अशा परिस्थितीत, पात्र भेटीच्या मूळ रकमेवर सामान्यतः कर लागत नाही; मात्र व्यवसायातून मिळणारा नफा मुलाच्या लागू करनियमांनुसार करपात्र होऊ शकतो. त्याचप्रमाणे, मुलाने ती रक्कम शेअर्स, म्युच्युअल फंड किंवा बँक ठेवींमध्ये गुंतवली, तर त्यातून मिळणाऱ्या लाभांश, व्याज किंवा भांडवली नफ्याचे करपरिणाम स्वतंत्र असतील.

७. अनेक मुले नोकरी किंवा व्यवसायासाठी परदेशात राहतात आणि भारतातील आई-वडिलांना घरखर्च, वैद्यकीय खर्च किंवा इतर गरजांसाठी पैसे पाठवतात. पात्र नातेवाईकाकडून मिळालेल्या भेटीला सामान्यतः आयकर सवलत उपलब्ध असते. त्यामुळे परदेशात राहणाऱ्या मुलाने भारतातील पालकांना पैसे पाठवले म्हणून केवळ त्या भेटीच्या रकमेवर आपोआप आयकर लागत नाही. मात्र, रक्कम कोणत्या स्रोतामधून आली, व्यवहार बँकिंग माध्यमातून झाला आहे का आणि परकीय चलनविषयक नियमांचे पालन झाले आहे का, हे तपासणे आवश्यक असते. मोठ्या रकमेच्या व्यवहारात पाठवणाऱ्या व्यक्तीचा तपशील, बँक व्यवहाराचा पुरावा आणि भेटीचे स्वरूप स्पष्ट करणारी कागदपत्रे जतन करावीत. जर पालकांना परदेशातून मोठी रक्कम मिळाली आणि त्याच काळात त्यांनी मोठी गुंतवणूक किंवा मालमत्ता खरेदी केली, तर त्या व्यवहारामागील पैशांचा स्रोत स्पष्ट असणे विशेष महत्त्वाचे ठरते.

८. पालकांनी मुलांना पैसे देताना कोणती काळजी घ्यावी? पैसे भेट म्हणून दिले असतील, तर व्यवहाराची तारीख, रक्कम, देणारा आणि घेणारा यांचे तपशील स्पष्ट ठेवावेत. शक्यतो बँक हस्तांतरणाचा वापर करावा आणि व्यवहाराशी संबंधित कागदपत्रे जतन करावीत. मालमत्ता भेट देताना योग्य गिफ्ट डीड, आवश्यक मुद्रांक शुल्क आणि नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी. मुलांना दिलेल्या रकमेवर मिळणारे व्याज, भाडे किंवा गुंतवणुकीतून निर्माण होणारे उत्पन्न कोणाच्या हातात करपात्र होईल, याचा स्वतंत्र विचार करावा. तसेच, पालकांनी स्वतःच्या निवृत्तीनंतरच्या गरजा, वैद्यकीय खर्च आणि आर्थिक सुरक्षितता लक्षात घेऊनच मोठ्या रकमेचे हस्तांतरण करावे.

निष्कर्ष : मुलांना पैसे देणे, त्यांच्या खात्यात मोठी रक्कम जमा करणे किंवा घर-मालमत्ता भेट देणे हे सामान्य कौटुंबिक व्यवहार आहेत. मात्र, या व्यवहारांमध्ये कराचे नियम समजून घेणे आणि आवश्यक पुरावे जतन करणे महत्त्वाचे आहे. ■

९०९६३३२३५३
(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत)

वेध

प्रफुल्ल व्यास

कंत्राटदारांच्या आत्महत्या

शेतकऱ्यांनंतर आता शासकीय कंत्राटदारांच्या आत्महत्या डोकं वर काढत आहेत. राज्य सरकारकडे जवळपास ९७ हजार कोटी रुपये थकित असल्याने कंत्राटदार कर्जबाजारी झाले. परिणामी ते आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. पैशांचं सोंग करता येत नाही. त्यामुळे हा निर्णय घेतला जाऊ शकतो, यात दुमत असण्याचे कारण नाही. पण, मनुष्य जन्मही एकदाच मिळतो. आपल्या हातात ताकद आहे. त्या भरवशावर अजून कमवा, पण आत्महत्या करू नका. तुम्ही मरता, मोकळे होता. पण, आई-वडील, मायबापाचे घर सोडून आलेली बायको आणि तुम्हीच जन्माला घातलेली मुलं यांचा विचार कोण करणार? एकदा का तुमचा श्वास थंडावला की जास्तीत जास्त १५ दिवस घरचे, महिनाभर नातेवाईक आठवण काढतील आणि वर्षश्राद्ध झाले की सर्वच समाप्त झालेले असते! अडचण होते ती त्या घरात असलेल्या बायकोची आणि वयाने लहान असलेल्या मुलांची! आत्महत्या हे औषध नाही. आलेल्या संकटांना तोंड देऊन पुन्हा उभे राहणाऱ्यांचे कौतुक होते, हे ध्यानात घेतलेच पाहिजे. त्यासाठी थोडी बेशरमकी घेतली तरी चालते. पण, कोणाला फसवू नका! पैसे उद्या दिले जाऊ शकतात. आयुष्य परत मिळत नाही.

शेतकऱ्यांच्या आत्महत्यानंतर शासकीय कंत्राटदारांच्या आत्महत्या होणे हे महाराष्ट्रासारख्या राज्याला अशोभनीयच! कंत्राटदार हा विकासातील सर्वात महत्त्वाचा भाग आहे. लाचखोरी ही सर्वत्र फोफावते आहे. हिस्सेवाटे कसे होतात हे सर्वश्रुत आहे. निविदा निघण्यापासून ते शेवटचे बिल निघेपर्यंत पैसे वाटावेच लागतात. राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग तर सर्वात आघाडीवर आहे. सरकारी यंत्रणा काम करू शकत नाही म्हणून कंत्राटदारांच्या माध्यमातून कामं करून घेतली जातात. मात्र, गेल्या दोन-अडीच वर्षांत हेच ठेकेदार कामाचे पैसे मिळावे म्हणून फिरत आहेत. सर्वच कंत्राटदार स्वच्छ आहेत किंवा सर्वच भ्रष्टाचारी आहेत, असे अजिबात म्हणता येणार नाही. दारिद्र्यरेषेखालील किंवा सामान्य नागरिकांना देण्यात येणाऱ्या सवलतींना आमचा विरोध नाही आणि असण्याचे कारणही नाही. पण, विकास कामं करणाऱ्यांची बिलं असे वर्षोनवर्षे अडकत तर मग... विकासाचं कामच ठप्प पडले तर ती कामं करणार तरी कोण? पैसे दिल्याशिवाय कामं होत नाहीत हे माहिती आहे. मग, वाटता वाटता जे शिल्लक राहतं त्यात तो स्वतःचा नफा काढण्याचा प्रयत्न करतो आणि उरलेल्या निधीतून 'विकास' होतो. त्या विकासाचे आयुष्य किती हे उघड्या डोळ्यांनी दिसतेच आहे. सार्वजनिक बांधकाम विभागात 'बीडीएस' प्रणाली काम करते. जो जास्तीचे पैसे मोजेल त्याच्यासाठी ती प्रणाली रात्री उघडली जाते. जो पैसे देत नाही त्याला मग साहेबांच्या कॅबिनचे उंबरठे झिजवावे लागतात. राज्यात रस्ते, इमारती बांधकामाचा विकास करणाऱ्या ठेकेदारांचे ९७ हजार कोटी थकित आहेत. आजपर्यंत १० कंत्राटदारांनी आत्महत्या केली.

१५ दिवसांपूर्वी दोन-अडीच कोटी कर्ज असलेल्या जरुड जि. अमरावती येथील सुनील वागद्रे या युवा कंत्राटदाराने आत्महत्या केली. ते होत नाही तोच वर्धेतही एका कंत्राटदाराचा आर्थिक विवंचनेत मृत्यू झाला. एकंदरीत हे आत्महत्येचे लोण वाढत गेले तर शेतकऱ्यांनंतर ठेकेदरांच्या आत्महत्यांचे राज्य म्हणून या पुरोगामी राज्याची काळी ओळख होता कामा नये. कामं करून घेणं जितकं महत्त्वाचं, तितकंच कामाचे पैसे वेळेत देणंही महत्त्वाचं आहे. कंत्राटदारांनीही जरा खर्चाच्या मर्यादा ठरवून घेतल्या पाहिजेत. कामाचा पैसा देत नाही ही सरकारची, सरकारी यंत्रणांची चूकच आहे. परंतु, आपणही जरा आलेल्या पैशांच्या विनियोगाचे नियोजन केले पाहिजे. 'व्हाईट कॉलर'ची सवय बरेचदा जुने दिवस विसरायला भाग पाडते; मग बरेचदा अनाठायी कर्जाचा बोजा होतो आणि सरकारी पैसा मिळाला नाही म्हणून आपणच बोंब ठोकतो आणि गळास जवळ करतो. त्यामुळे फक्त आपलं कुटुंबच उघडं पडतं. कोणाचं काहीही बिघडत नाही! म्हणून आमचा एक शायर मित्र प्रदीप सातपुते म्हणतो...

मालूम है कि ख्वाब झूठे है और ख्वाहिश अधूरी है...
पर जिंदा रहने के लिये कुछ, गलतफहमियां भी जरूरी हैं!

काही गोष्टींना समजून घेतले पाहिजे. टोकाचा निर्णय घेऊन आपलं घर उघड्यावर आणण्यात पुरुषार्थ नाही... येऊ दे संकटं कितीही.. परतून लाव त्या मजबूत हातांनी! तुम्हीच रस्ते बांधता आणि आयुष्याचा रस्ता अर्धवट सोडून जग सोडून जाता... पळकुटे कुठले! सरकारी यंत्रणेनेही कंत्राटदारांच्या आत्महत्यांची वाट पाहू नये. गोडीगुलाबीने राहतच हे गाडं हाकायचं आहे बरं... ■

९८८१९०३७६५

डिजिटल जनजागृती

कन्सेंट मॅनेजर्स आणि कन्सेंट व्यवस्थापनाचे भविष्य

सीए अभय सगदेव

कल्पना करा की, तुमची खाती एका हॉस्पिटल अॅपमध्ये, इन्शुरन्स अॅपमध्ये, बँकमध्ये, ऑनलाईन लर्निंग प्लॅटफॉर्ममध्ये, शॉपिंग अॅपमध्ये आणि गव्हर्न्मेंट सर्व्हिस पोर्टलमध्ये आहेत. वेगवेगळ्या वेळी यापैकी प्रत्येक संस्था तुमची पर्सनल डेटा वापरण्यासाठी कन्सेंट मागते. आपण घाईत होकार देतो, नेमके कशाला कन्सेंट दिली हे विसरतो आणि नंतर ती कन्सेंट कशी पाहायची किंवा मागे घ्यायची, असा प्रश्न पडतो. डीपीडीपी अॅक्ट या व्यावहारिक अडचणीची दखल घेतो. या कायद्यात कन्सेंट मॅनेजर ही नवी संकल्पना दिली आहे. कन्सेंट मॅनेजरचा उद्देश असा आहे की, डेटा प्रिंसिपलला अॅक्सेसिबल, ट्रान्सपरंट आणि इंटरऑपरेबल प्लॅटफॉर्मद्वारे कन्सेंट देणे, व्यवस्थापित करणे, पाहणे आणि मागे घेणे सोपे व्हावे.

सोप्या भाषेत सांगायचे तर कन्सेंट मॅनेजर हा नागरिकासाठी एक विश्वासार्ह डिजिटल विंडो ठरू शकतो, ज्याद्वारे वेगवेगळ्या डेटा फिड्युशिअरीला दिलेली कन्सेंट नागरिक पाहू आणि नियंत्रित करू शकतो. अनेक स्वतंत्र वेबसाईट्स आणि अॅप्सची सेटिंग लक्षात ठेवण्याऐवजी डेटा प्रिंसिपलला एकाच कन्सेंट मॅनेजमेंट प्लॅटफॉर्मचा वापर करता येऊ शकतो, अर्थात कायदा आणि नियमामध्ये दिलेल्या चौकटीच्या अधीन राहून. ही कल्पना महत्त्वाची आहे. कारण डीपीडीपी कायद्यांतर्गत कन्सेंट ही एकदाच घेतली जाणारी औपचारिकता नाही. कन्सेंट फ्री, विशिष्ट, माहितीपूर्ण, विनाअट आणि स्पष्ट असली पाहिजे. त्यात स्पष्ट सकारात्मक कृती असणे आवश्यक आहे. डेटा प्रिंसिपलला कन्सेंट मागे घेण्याचाही हक्क आहे आणि कन्सेंट मागे घेणे हे कन्सेंट देण्याइतकेच सोपे असले पाहिजे. कन्सेंट मॅनेजरमुळे डेटा फिड्युशिअरीची जबाबदारी संपत नाही. डेटा फिड्युशिअरीने योग्य सूचना देणे, पर्सनल डेटाची कायदेशीर प्रक्रिया करणे, सुरक्षा राखणे, विनंतीला प्रतिसाद देणे आणि कायद्याचे कम्प्लायन्स करणे आवश्यकच राहते. कन्सेंट मॅनेजर फक्त डेटा प्रिंसिपलच्या वतीने कन्सेंट मॅनेज करण्यासाठी एक मान्यताप्राप्त मॅकेनिझम उपलब्ध करून देतो.

कायद्यानुसार कन्सेंट मॅनेजरची नोंदणी डेटा प्रोटेक्शन बोर्ड ऑफ इंडियाकडे असणे आवश्यक आहे. नियमामध्ये रजिस्ट्रेशनसाठी अटी आणि त्यानंतरच्या जबाबदाऱ्या दिल्या आहेत. त्यामुळे कोणतेही सामान्य अॅप किंवा वेबसाईट स्वतःला डीपीडीपी फ्रेमवर्क अंतर्गत कन्सेंट मॅनेजर म्हणू शकत नाही. रजिस्टर्ड कन्सेंट मॅनेजरने डेटा प्रिंसिपलप्रति फिड्युशिअरी कॅपॅसिटीमध्ये काम करणे अपेक्षित आहे. याचा अर्थ असा की, ज्याची कन्सेंट तो मॅनेज करतो त्या व्यक्तीच्या हिताला प्राधान्य दिले पाहिजे. डेटा फिड्युशिअरीसोबत कन्फफ्लिक्ट ऑफ इंटरेस्ट टाळला पाहिजे आणि एखाद्या व्यवसायाला दुसऱ्यावर अनुचित फायदा करून देण्यासाठी किंवा नागरिकावर अन्याय्य प्रभाव टाकण्यासाठी आपली भूमिका वापरू नये.

कन्सेंट मॅनेजरच्या भूमिकेत सुरक्षा हाही मध्यवर्ती मुद्दा आहे. कन्सेंट रेकॉर्ड्स आणि संबंधित डिजिटल इंटरॅक्शन्स यांच्याशी तो व्यवहार करणार असल्यामुळे पर्सनल डेटा ब्रीच टाळण्यासाठी वाजवी सुरक्षा उपाय ठेवणे आवश्यक आहे. नागरिकांना कन्सेंट मॅनेज करण्यास मदत करणाराच प्लॅटफॉर्म जर डेटाबाबत बेफिकीर असेल, तर कायद्याचा उद्देशच निष्फळ ठरेल. नियमानुसार कन्सेंट मॅनेजरने वेबसाईट किंवा अॅप किंवा दोन्ही, हे डेटा प्रिंसिपल्सना सेवा उपलब्ध करून देण्याचे मुख्य माध्यम म्हणून ठेवणे अपेक्षित आहे. काळानुसार यामुळे कन्सेंट मॅनेजमेंट अधिक व्यावहारिक होऊ शकते; विशेषतः जे लोक अनेक डिजिटल सर्व्हिस वापरतात आणि परवानगी पाहण्यासाठी किंवा मागे घेण्यासाठी एकच जागा इच्छितात त्यांच्यासाठी.

नागरिकांसाठी याचा प्रत्यक्ष फायदा म्हणजे स्पष्टता. तुमची कन्सेंट कोणी मागितली, कोणत्या उद्देशासाठी मागितली आणि तुम्हाला ती प्रक्रिया पुढे चालू ठेवायची आहे का, हे कळणे आवश्यक आहे. व्यवसायांसाठी याचा फायदा म्हणजे चांगले कन्सेंट रेकॉर्ड्स, अधिक सुव्यवस्थित कम्प्लायन्स आणि कन्सेंट खरोखर घेतली किंवा मागे घेतली गेली का याबद्दल कमी वाद. तरीही नागरिकांनी सावध राहणे आवश्यक आहे. कन्सेंट मॅनेजरला जादूची ढाल समजू नये. कन्सेंट मॅनेज करण्याचा दावा करणारा कोणताही प्लॅटफॉर्म वापरण्यापूर्वी तो योग्यरीत्या नोंदणी आहे का, त्याची भूमिका, कॉन्टॅक्ट डिटेल्स, ग्रीव्हन्स प्रोसेस आणि सिक्युरिटी अप्रोच स्पष्टपणे सांगितला आहे का, हे तपासले पाहिजे. कन्सेंट मॅनेजर्स विशेषतः हेल्थकेअर, आर्थिक, शैक्षणिक, विमा, ई-कॉमर्स आणि डिजिटल पब्लिक सर्व्हिसेस अशा क्षेत्रांत महत्त्वाचे ठरू शकतात. मोठा संदेश असा आहे की, डीपीडीपी अॅक्ट कन्सेंटकडे एक जिवंत आणि मॅनेज करता येणारा हक्क म्हणून पाहतो, विसरलेली खूण म्हणून नाही. नागरिकाला हो म्हणता आले पाहिजे, त्या 'हो' चे पुनरावलोकन करता आले पाहिजे आणि नंतर नाही म्हणता आले पाहिजे, अर्थात इतर कायद्यांनुसार किंवा वैध आवश्यकतांनुसार कायदेशीर धारणा आणि प्रक्रिया आवश्यक असल्यास त्याच्या अधीन राहून.

समजा एखादा रुग्ण अपॉइंटमेंट बुक करण्यासाठी, तपासणी अहवाल मिळविण्यासाठी आणि इन्शुअर सोबत रेकॉर्ड्स शेअर करण्यासाठी हेल्थ अॅप वापरतो. नंतर त्या रुग्णाला कोणती कन्सेंट दिली होती हे पाहायचे आहे आणि एका पर्यायी सेवेसाठी कन्सेंट मागे घ्यायची आहे. भविष्यात कन्सेंट मॅनेजर अशा कन्सेंटचे पुनरावलोकन आणि व्यवस्थापन अधिक सोप्या व सुव्यवस्थित पद्धतीने करण्यास मदत करू शकतो. ■

sagdev1@gmail.com

पदवीधरांनो, मत अवैध ठरू देऊ नका!

आज होत असलेल्या पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत लाखो पदवीधारक मतदान करतील. प्रत्येक मत अमूल्य असते. प्रत्येक मत वैधच ठरायला हवे, याचा सारासार विचार करून जर प्रत्येक मतदाराने मतदान केले तर एकही मत अवैध होणार नाही व खऱ्या अर्थाने ही शिक्षितांची निवडणूक ठरेल. अनेकदा पसंतीक्रम मतदानात केलेले मतदान अवैध होण्याचा धोका मोठा असतो. २०२० मध्ये नागपूर विभागात झालेल्या पदवीधर निवडणूक मतदानामध्ये जवळपास ११,५६० मते अवैध झाली होती. त्यामुळे अत्यंत काळजीपूर्वक, आयोगाने ठरवलेल्या नियमानुसारच मतदान करणे अत्यंत आवश्यक आहे. या निवडणुकीत मतपत्रिकेवर उमेदवारांच्या नावासमोर पसंतीक्रम नोंदवावा लागतो. त्यामुळे मतदानाची योग्य पद्धत समजून घेणे आणि निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मतदारांनी मतदान करण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याने पुरविलेले जांभळ्या रंगाचे स्केच पेनच वापरावे. उमेदवाराच्या नावाच्या स्तंभासमोर पसंतीक्रम म्हणून असलेल्या स्तंभात प्रथम पसंतीचा उमेदवार म्हणून निवडलेल्या उमेदवाराच्या नावासमोर १ असा आकडा लिहून मतदान करावे. हा १ आकडा फक्त एकाच उमेदवाराच्या नावासमोर असावा. उर्वरित उमेदवारांबाबतचा पसंतीक्रम २, ३, ४ असे आकडे घालून दर्शवावेत. जेवढे उमेदवार निवडणूक लढवत असतील, तेवढे पसंतीक्रम देता येतात. कोणत्याही उमेदवाराच्या नावासमोर फक्त एकच आकडा घातलेला आहे, याची आणि तोच आकडा इतर उमेदवारांच्या नावासमोर घातलेला नाही, याची खात्री करणे गरजेचे आहे. मतपत्रिकेवर स्वतःचे नाव, स्वाक्षरी वा काहीही लिहू नये. अंगठ्याचा ठसा देखील उमटवू नये. तसे केल्यास मतपत्रिका अवैध ठरेल.

२०२६ च्या निवडणुकीसाठी पदवीधर मतदारांची संख्या वाढून २ लाख ५५ हजार ८२३ झाली आहे. २०२० च्या तुलनेत ४९ हजार ३६९ मतदारांची वाढ झाली आहे. वाढलेल्या मतदारसंख्येच्या पृष्ठभूमीवर प्रत्येक मतदाराने मतदानाची पद्धत समजून घेऊन आपले मत वैध राहील, याची काळजी घेणे आवश्यक आहे. प्रत्येक पदवीधर मतदाराने जबाबदारीने मतदान करावे. कारण प्रत्येक मत महत्त्वाचे आहे आणि प्रत्येक वैध मत लोकशाही प्रक्रियेला बळकटी देते.

वैभव बावनकर/नागपूर। ९५४५७४५५८०

■■■

वाचक पत्रे

दसरा झाला; जनता सगळं विसरेल?

दसरा झाला, रावणदहन झालं, पण सामान्य माणसाच्या आयुष्यातील संकटांचा रावण अजूनही जिवंत आहे. महागाईने सर्वसामान्यांचं कंबरडं मोडलंय. पेट्रोल, डिझेल, गॅस, किराणा, भाजीपाला आणि औषधांचा खर्च भागवताना सामान्य माणसाच्या नाकीनऊ येत आहेत. सण आले की मोठमोठी भाषणं होतात, सण संपल्यानंतर जनतेच्या प्रश्नांचं काय? जनता सगळं विसरून पुन्हा त्याच परिस्थितीत जगेल, असं सरकारला वाटतं का? दुसरीकडे शेतकऱ्यांची अवस्था बिकट आहे. कुठे दुष्काळ, कुठे पिकांचं नुकसान तर कुठे पाण्याची टंचाई! शेतकऱ्याच्या घामाला योग्य भाव मिळणार कधी? तरुणांनी अभ्यास करायचा, स्पर्धा परीक्षांसाठी मेहनत घ्यायची आणि शेवटी पेपरफुटीच्या बातम्यांनी निराश व्हायचं, ही परिस्थिती बदलणार कधी? तरुणांच्या हाताला काम नाही, शेतकऱ्याला आधार नाही आणि सामान्य माणसाला महागाईतून दिलासा नाही, मग विकासाच्या घोषणांचा उपयोग काय? सरकार कोणत्याही पक्षाचं असो, जनतेच्या प्रश्नांची उत्तरं देणं ही त्यांची जबाबदारी आहे. दसरा हा वाईटावर चांगल्याच्या विजयाचा सण आहे, पण आज सामान्य माणसाच्या आयुष्यातील महागाई, बेरोजगारी आणि अन्यायाचा रावण जिवंत असेल, तर खऱ्या विजयाचा अर्थ काय? सरकारने लक्षात ठेवावं, जनता केवळ सण साजरे करत नाही, तर आपल्या प्रश्नांची उत्तरंही शोधत असते. दसरा झाला म्हणून जनता सगळं विसरेल, असा समज कुणी करून घेऊ नये. कारण जनतेचे प्रश्न संपलेले नाहीत आणि जनतेचा आवाजही थांबलेला नाही!

सचिन नागरे/किनगाव जटु। ९६०४३२१४३२

■■■

ट्रम्प तात्यांचा दुटप्पीपणा

भारताने रशियाकडून कच्चं तेल खरेदी केल्यामुळे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर अतिरिक्त आयात शुल्क लादले. युक्रेन युद्धाच्या पृष्ठभूमीवर रशियावर दबाव आणण्यासाठी हे पाऊल उचलल्याचा दावा अमेरिकेने केला. दुसरीकडे ट्रम्प तात्यांनी तः रशियाचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमिर पुतिन यांच्याशी चर्चा करून रशियन डिझेलवरील बंदी उठवली आणि अमेरिका रशियाकडून डिझेल घेणार असल्याचे जाहीर केले. भारतावर मोठ्या प्रमाणावर आयात शुल्क लावत असताना रशियाकडून मोठ्या प्रमाणात तेल खरेदी करणाऱ्या युरोपीय देशांना मात्र कमी शुल्काची सवलत दिली गेली आहे. तात्या जे करतील ते चांगलं आणि इतरांनी केलं तर वाईट असं म्हणून कसं चालेल? हा तात्यांचा निव्वळ दुटप्पीपणा आहे. जागतिक व्यासपीठावर अमेरिकेच्या धोरणांतील दुटप्पीपणावर टीका झाल्यावर सारवासारव करीत तात्यांनी भारतीय वस्तूंवर लादलेले परस्पर शुल्क कमी केले आणि अतिरिक्त शुल्क मागे घेतले. ■

डॉ. मदन काकडे/९३७३११२४८७

मरिआई चौक, दमानी नगर भागातील अतिक्रमणावर कारवाई

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-

सोलापूर महापालिकेच्या अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने मरीआई चौक ते शुभम मंगल कार्यालयादरम्यान दमानी नगर परिसरात अतिक्रमणविरोधी मोहीम राबविली. या कारवाईत चार लोखंडी खोके, दोन बोर्ड, एक लोखंडी टेबल आणि एक लोखंडी अँगल असे साहित्य जप्त करण्यात आले.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपअभियंता अविनाश वाघमारे यांच्या नियंत्रणाखाली आणि अतिक्रमण प्रतिबंधक विभागप्रमुख सोपान कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. कनिष्ठ अभियंता गणेश काकडे, राजकुमार कावळे यांच्यासह विभागाच्या पथकाने मोहिमेत सहभाग घेतला. पोलीस बंदोबस्तात ही कारवाई केली.

शहरातील सार्वजनिक रस्ते, पदपथ आणि महापालिकेच्या जागांवर अनधिकृतपणे हातगाड्या, खोके किंवा अन्य साहित्य ठेवून अतिक्रमण करू नये, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की,मी श्रीमती विठाबाई सुनिल गावडे असे जाहीर करते की माझे पती कै. सुनिल राम गावडे यांचे दि.१७/११/२०२५ रोजी मयत झाले आहे तसेच माझ्या पतीचे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय यांनी वाहन परवाना दिलेला आहे.सदर परवाना क्रमांक MH13/581/SHR/1994 असे असून सदरचा परवाना हा वाहन क्र. MH13CT-7859 या वाहनावर असून सदरचा परवाना श्रीमती विठाबाई सुनिल गावडे पत्नी या नात्याने माझ्या नावे करून घ्यावयाचा आहे.

तरी सदरचा परवाना माझे नावाने करण्यास कोणाची काही तक्रार अगर हरकत असल्यास त्यांनी सात (०७) दिवसाच्या आत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय येथे कागदोपत्रानिशी भेटावे.

सही /-
श्रीमती विठाबाई सुनिल गावडे

वसंतराव डमरे यांचे निधन

तभा वृत्तसेवा,
बार्शी दि. २२ ऑक्टोबर -



गगनगिरी निवास ढगे प्लॉट येथील वसंतराव लिंबाजी डमरे (वय ८५) यांचे गुरुवारी सकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. ते अखिल भारतीय मराठा महासंघाचे माजी उपाध्यक्ष होते. मराठा सेवा संघाचे बाळासाहेब डमरे आणि महिला दक्षता समितीच्या ॲड. राजश्रीताई डमरे तलवाड यांचे वडील होत. त्यांच्या पार्थिवावर मंगळवार पेठेतील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

मध्य रेल्वे

सोलापुर मंडळ

शुद्धिपत्रक

टेंडर बंद करण्याची तारीख आणि वेळ वाढवण्यासाठी खालील कामाचे शुद्धीपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे: टेंडर नोटीस क्र. SUR-N-T-2026-27-33 दिनांक:- 21.10.2026. कामाचे नाव व ठिकाण: मध्य रेल्वेच्या सोलापूर, मुंबई आणि नागपूर विभागातील विविध स्थानकांमधील विद्यमान मेधा मेक इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग सिस्टीममध्ये NDKR1/RDKR1 आणि KAVACH-रेडी इंटरफेस प्रदान करणे. टेंडर क्र.: SUR-N-T-2026-27-33, कामाचा अंदाजित खर्च: 28,71,99,181.24/-. टेंडर फॉर्मची किंमत: काही नाही. जमा करावयाची अनामत रक्कम : 57,44,000/-. कामाचा पूर्ण होण्याचा कालावधी: 12 महिने. टेंडर बंद होण्याची मूळ तारीख आणि वेळ: 05.11.2026 रोजी 15:30 वाजंतर, टेंडर बंद होण्याची सुधारित तारीख आणि वेळ: 16.11.2026 रोजी 15:30 वाजंतर. तपशील वेबसाइटवर उपलब्ध आहे. कोणतेही शुद्धीपत्रक/सुधारणा फक्त उपरोक्त ई-प्रोक्युरमेंट वेबसाइटवर अपलोड केली जाईल. केवळ ऑनलाइन टेंडर स्वीकारले जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्स, प्रत्यक्ष टेंडर स्वीकारले जाणार नाहीत. कंत्राटदारांना कंपनीच्या नावास क्लास डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि www.ireps.gov.in वर नोंदणी करण्याचे आवाहनण्यात येत आहे. अनामत रकमेची पेमेंट नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक हमी च्या स्वरूपात स्वीकारली जाईल आणि मूळ बँक हमी कागदपत्रे सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी टेंडर दस्तऐवजात दर्शवलेल्या नामनिर्देशित अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष, पोहोचती करावी लागेल. अधिक तपशीलांसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

मं.रे.प्र.सि. एवं दू.वि.

अनधिकृतपणे रेल्वे रूळ ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे . 43

श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२

फोन नं-०२१७-२६२२९४४/२६२२९३३

ज्या अर्थी खाली सही करणार श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर प्राधिकृत अधिकारी यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (१२) आणि नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून खालील कर्जदार व जामीनदार यांना कलम १३ (२) अन्वये खालील नमूद तारखेस मागणी नोटीस बजावली होती कि, त्यांनी सदरची नोटीसतील नमूद केलेली बँकेला येणे असलेली रक्कम नोटीसच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत परत करण्याबाबत कळवूनही सदर रक्कम परतफेड करण्यास आपण असमर्थ ठरल्याने, विशेषतः कर्जदार व जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते कि, खाली सही करणार यांनी सदर कायद्याचे सेक्शन १३ (४) व नियम ८/१ व ३/९ अंतर्गत प्राप्त अधिकाराचा वापर करून खाली नमूद मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे.

ताबा सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ या कायद्यातील कलम १३ (४) व नियम ८/१

परिशिष्ठ IV प्रमाणे

अ. क्र.	तपशील	वर्णन
१	कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता	१) श्रीकांत दशरथ सुरा (कर्जदार) रा : फ्लॅट नं. ३०१ व ३०२, जयलक्ष्मी रेसिडेन्सी, बोल्ली मंगल कार्यालय जवळ, न्यू पाच्छा पेठ, सोलापूर ४१३००५ २) अल्पना श्रीकांत सुरा (सहकर्जदार) रा : फ्लॅट नं. ३०१ व ३०२, जयलक्ष्मी रेसिडेन्सी, बोल्ली मंगल कार्यालय जवळ, न्यू पाच्छा पेठ, सोलापूर ४१३००५ ३) पुरुषोत्तम शरणप्पा चलवादी (जामीनदार) रा : २७, निखिल नगर, नेहरू नगर, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४ ४) अविनाश मधुकर पंडित (जामीनदार) रा : २४१, माशाळ वस्ती, नेहरू नगर, विजापूर रोड, सोलापूर ४१३००४
	कर्ज खाते क्र.	००२००३२१५०००००८६
	थकीत कर्ज रक्कम	एकूण रक्कम रुपये ४,६१,८१५/- (रु. चार लाख एकसष्ठ हजार आठशे पंधरा फक्त) अधिक दि. ०१/०७/२०२६ पासून १३% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च
	मागणी नोटीस दिनांक	१०/०७/२०२६
	प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक	१९/१०/२०२६
	तारण मालमत्ता तपशील	डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर येथील सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील न्यू पाच्छा येथील टी पी नं. १, सिटी सर्व्हे नं. १०३८९-अ, फा. प्लॉट नं. ३५, सब प्लॉट नं. १३४ याचे एकूण क्षेत्र २७७.६ चौ. मी. इतके असून त्यापैकी उत्तरेकडील १३९.४१ चौ. मी. क्षेत्राची मिळकत यास विभागणी नकाशाप्रमाणे फा. प्लॉट नं. ३५/१३४ अ आहे. सदर मिळकतीवर महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप ॲक्ट १९७० च्या तरतुदीनुसार बांधण्यात आलेल्या "जयलक्ष्मी रेसिडेन्सी ४" या अपार्टमेंटमधील तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. ३०१ याचे क्षेत्र ५०.०५ चौ. मी. व तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. ३०२ याचे क्षेत्र ४७.४२ चौ. मी. असुन यापैकी फ्लॅट नं. ३०१ याचे चतुःसिमा:- पूर्वेस - रस्ता, पश्चिमेस - फ्लॅट नं. ३०२, उत्तरेस - रस्ता, दक्षिणेस - फा. प्लॉट नं. ३५/१३४ ची राहिलेली जागा, तसेच फ्लॅट नं. ३०२ याचे चतुःसिमा:- पूर्वेस - फ्लॅट नं. ३०१, पश्चिमेस - फा. प्लॉट नं. ३५/१२७, उत्तरेस - रस्ता, दक्षिणेस - फा. प्लॉट नं. ३५/१३४ ची राहिलेली जागा.
२	कर्जदार व जामीनदार यांचे नाव व पत्ता	१) बसवराज शिवशंकर उंबरजे प्रोपः बसवराज शिवशंकर उंबरजे (कर्जदार) रा : शॉप नं. E-९३, सिद्धेश्वर मार्केट यार्ड, हैदराबाद रोड, सोलापूर ४१३००६ २) इरेश विश्वनाथ गादेकर (जामीनदार) रा : २५, मित्र नगर, शेळगी, सोलापूर ४१३००६ ३) महेश भगवंत बिराजदार (जामीनदार) रा : ७४/२, भवानी पेठ, सोलापूर ४१३००२
	कर्ज खाते क्र.	००४००३२०२०००००९३
	थकीत कर्ज रक्कम	एकूण रक्कम रुपये २५,८२,३६१/- (रु. पंचवीस लाख ब्याऐंशी हजार तीनशे एकसष्ठ फक्त) अधिक दि. ०१/०७/२०२६ पासून १४% प्रमाणे होणारे व्याज + दंड व्याज + इतर खर्च
	मागणी नोटीस दिनांक	दि. ३०/०७/२०२६ व दि. ०७/०८/२०२६ रोजी दैनिक तरुण भारत
	प्रतीकात्मक ताबा घेतलेली दिनांक	१९/१०/२०२६
	तारण मालमत्ता तपशील	डी. व सब डी. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका नवीन हद्दवाढमधील मौजे शेळगी येथील भूमापन क्र. ७९/१ब/२ (खरेदीखवता प्रमाणे गट नं. ७९/अ/२) पैकी प्लॉट नं. १०३ व १०४ याचे पूर्वपश्चिम दक्षिण अंगास १५० फुट, उत्तर अंगास ६० फुट, दक्षिणोत्तर अंगास १०० फुट असे खरेदी खताप्रमाणे प्रत्येक प्लॉटचे क्षेत्र ७८७५ चौ. फु. व ७६२५ चौ. फु. किंवा ७३१.६० चौ. मी व ७०८.४० चौ. मी यांसी ऑनलाइन उताराप्रमाणे क्षेत्र ०.१४४ हे. आर. किंवा ०.१४.४० हे. आर. चौ. मी असून या मिळकतीचे चतुःसिमा :- पूर्वेस - ले आउट मधील रस्ता, पश्चिमेस - सोलापूर तुळजापूर रस्ता, उत्तरेस - प्लॉट नं. ९, दक्षिणेस - प्लॉट नं. १३३.

विशेषतः कर्जदार, जामीनदार आणि सर्वसाधारण जनता यांना सुचित करण्यात येते कि, त्यांनी सदर स्थावर मालमत्ता संदर्भात कोणताही व्यवहार करू नये असा व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना येणे असलेली रक्कम कर्जदार यांचे कर्ज व मालमत्ता तारण कर्ज खाते यांचे अधीन राहील. कृपया लक्षात घ्या कि श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर यांना उपलब्ध असलेल्या अश्या अधिकार आणि उपायांवर पृवग्रह न ठेवता हे प्रकाशन केले गेले आहे. श्री महावीर अर्बन को ऑप बँक लि., सोलापूर कायद्याच्या अधीन असलेल्या आधार आर्थिक आणि कर्जदाराच्या विरुद्ध आपणास पुढील अधिनियमाच्या कलम १३ (१३) नुसार नोंद घेण्याची विनंती केली आहे. आमच्या बँकेच्या पूर्व लेखी संमतीशिवाय वरील तारण मिळकत विल्हेवाट लावण्यापासून किंवा व्यवहार करण्यास किंव्हा विक्रीच्या मार्गाने, भाडेपट्याने किंवा अन्यथा सुरक्षित मालमत्ताद्वारे हस्तांतरित करण्यास आपल्याला प्रतिबंधित आहे.

दिनांक : १९/१०/२०२६
स्थळ : सोलापूर

सील

सही/-
प्राधिकृत अधिकारी
श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर

PUBLIC NOTICE

Under instructions from and on behalf of my client, Mr. Shivaling Muralidhar Gajare aged- 24 years, residing at Pankaj Nagar, Barshi Tal- Barshi Dist- Solapur, hereby give this Public Notice as under:

That my client is known by the name Mr. Shivaling Muralidhar Gajare, and the said name appears in his various identity documents and official records.

That my client hereby declares that the name as mentioned in Adharcard Mr. Shivaling Muralidhar Gajare and the name mentioned in Living Certificate Mark list Gajare Shivling Murlidhar refer to one and the same person, i.e., my client. In accordance with same my client has made affidavit before Notary Public Government of India at Sr. No. 223/26

My client has made this declaration for the purpose of submitting the same before the Passport Authority, Government of India, and for any other official and legal purposes, as may be required."

Sign/-
Advocate .P. P. Waghmare
Bsc. LL.B
Add-Barshi Dist and Session Court
Mob No-9975120774

जाहीर प्रसिद्धीकरण

दि. कि. अर्ज नं. ७१/२०२६
निषाण नं. ५

बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि. साहेब यांचे कोर्टात

१) **विश्वास जगन्नाथ देशमुख,** वय- ६३ वर्षे,
धंदा- पेन्शनर, रा. डॉ. जगदाळेमामा हॉस्पीटल पाठीमागे, पाटील प्लॉट, शिवाजीनगर बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **विशाखा विश्वास देशमुख,** वय- ३४ वर्षे,
धंदा- शिक्षण, रा. सदर **-- अर्जदार**
३) **सायली सूरज पाटील,** वय- ३२ वर्षे,
धंदा- घरकाम, रा. मु.पो. अकुलगाव, ता. माढा, जि. सोलापूर
४) **विक्रांत विश्वास देशमुख,** वय- ३० वर्षे,
धंदा- शिक्षण, रा. ७३९/४/३४, पाटील प्लॉट, शिवाजीनगर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

विरुद्ध

कोणी नाही -- सामनेवाला

बॉम्बे रेग्युलेशन VIII प्रमाणे-

ज्याअर्थी, अर्जदार नं. १ यांची पत्नी व अर्जदार नं. २ ते ४ यांची आई श्रीमती संगिता विश्वास देशमुख या दि. ३०/०४/२०२५ रोजी सुश्रुत हॉस्पिटल, बार्शी, ता. बार्शी येथे मयत झालेल्या आहेत. मयत श्रीमती संगिता विश्वास देशमुख यांना यातील अर्जदार नं. १ ते ४ हेच जवळचे व कायदेशीर वारस आहेत म्हणून यातील अर्जदार नं. १ ते ४ यांना मे. कोर्टाकडून हेअरशिप सर्टिफिकेट मिळण्यासाठी यातील अर्जदार यांनी या मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, वर नमूद अर्जदार यांचे शिवाय मयत श्रीमती संगिता विश्वास देशमुख यांचेबाबत इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दि. २/११/२०२६ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहुन कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचीही काही म्हणणे / हरकत न आल्यास सदरील अर्जदार यांना मयत श्रीमती संगिता विश्वास देशमुख यांचे वारस असलेबाबतचे हेअरशिप सर्टिफिकेट देण्यात येईल. कळावे. हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले ता. १४/१०/२०२६

सही/-
क. लिपिक

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर बार्शी

जाहीर प्रसिद्धीकरण

पुढील नेमली तारीख ता. ०४/०१/२०२७
नि. नं. ५
दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३३/२०२६

बार्शी येथील मे. अति जिल्हा व सत्र न्यायाधिश सो यांचे कोर्टात

१. शिवराज दिलीप डुरे
वय- १६ वर्षे, धंदा शिक्षण,
अ.पा.क आई अर्जदार नं.२
२. कोमल दिलीप डुरे **-- अर्जदार**
वय- ३६ वर्षे, धंदा घरकाम,
रा. इर्लेवाडी, ता. माढा, जि. सोलापूर

विरुद्ध

महाराष्ट्र शासन तर्फे
मा. कलेक्टर साहेब सोलापूर -- सामनेवाला

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांनी मौजे इर्ले येथील शेतजमिन गट नं. १३१/२ याचे क्षेत्र ०१ हे. ७२ आर, आकार ०४ रु. ८५ पैसे असे क्षेत्र अज्ञान अर्जदार नं. १ यांचे असून सदर जमीनीपैकी कोल्हापूर पद्धतीचा बंधारा इर्ले, ता. बार्शी या योजनेसाठी संपादित झालेले क्षेत्र ०० हे. २९ आर क्षेत्र संपादीत केलेले असून त्या जमीनीपैकी अज्ञान अर्जदार नं. १ यांचे संपादित जमिनीचा ठरविण्यात आलेली रक्कम रु. १४,३९,८५०/- असून ती रक्कम अज्ञान अर्जदार नं. १ यांना मिळणार आहे. परंतु सदर अर्जदार नं. १ हे अज्ञान असल्यामुळे सदर रक्कमेचा धनादेश त्यांचे अ.पा. क. अर्जदार नं. २ आई यांना मिळणे जरुरीचे आहे. सदरची रक्कम मिळाल्यानंतर अज्ञान अर्जदार नं. २ आई ही अज्ञान अर्जदार नं. १ यांचे उच्च शिक्षणासाठी आर्थिक अडचणीचे निवारण करणेसाठी व शैक्षणिक फी भरण्यासाठी करणार आहेत. त्यामुळे अज्ञान अर्जदार नं. १ याचे नावे असलेल्या सरकारने संपादीत केलेले ०० हे. २९ आर क्षेत्राचे त्यांचे तर्फे अ.पा.क. म्हणून आई अर्जदार नं. २ यांना सरकारचे नावे खरेदीखत लिहून देणे जरुरीचे आहे. त्यासाठी अज्ञान अर्जदार नं. १ याचे तर्फे अ.पा. क. आई अर्जदार नं. २ यांना मे. कोर्टाची परवानगी मिळणे जरुरीचे आहे व त्यासाठी सदरचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, वर नमूद अज्ञान अर्जदार यांचे मालकीचे क्षेत्र सरकारचे नावे खरेदीखत लिहून देणेकामी कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असेल तर किंवा सदर मिळकतीसंबंधी कोणताही खरेदी, विक्री, गहाण, दान, बोजा, लिज, चोळी, बांगडी, पोटगी, अथवा इतर कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध व हरकत असेल तर सदर प्रकरणाची पुढील नेमलेली तारीख दि. ०४/०१/२०२७ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहुन कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी. कोणाचेही काही म्हणणे/हरकत न आल्यास सदरील अर्जदारांना सदर शेतजमिन विक्री करणेबाबत परवानगी देण्यात येईल. कळावे. हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले ता. ०९/१०/२०२६

सही/-
क. लिपिक

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा. अधिक्षक
जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी

सखी मल्टि स्टेट को ऑप क्रेडिट सोसायटी लि.

रजि.नं. :- एम.एस.सी.एस./सी.आर./६६७/२०१२
बी-७०३, सागर टेक प्लाझा, साकीनाका जंक्शन,
अंधेरी (पूर्व), मुंबई -४०० ०७२

जाहीर नोटीस

दिनांक :- २२.१०.२०२६

सखी मल्टि स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी च्या शाखांमधून खालील व्यक्तींनी त्यांचे मालकीचे सोन्याचे दागिने तारण ठेवून कर्ज घेतले आहे. सदर कर्जदारांनी कर्ज घेतल्या पासून त्यांच्या कर्ज खात्यात कोणताही व्यवहार केलेला नाही. त्यांच्या कर्जाची मुदत संपलेली आहे. त्यांच्या कर्जाचा तपशील खालीलप्रमाणे

अ. क्र.	शाखा	कर्जदाराचे नाव	कर्ज रक्कम	कर्ज परतफेड दिनांक	आजची कर्ज येणेबाकी रु.
१	सोलापूर	श्री निरंजन भरत गायकवाड	२१०००/-	२८.०६.२०२४	३५,९५०/-
२	नळदुर्ग	श्रीमती वंदना नरेंद्र भोसले	१९,०००/-	२४.०२.२०२६	२४,९५०/-

उपरोक्त दोन्ही कर्जदारांना टेलिफोन द्वारे, लेखी नोटीस पाठवून आपल्या कर्ज खात्यावर व्याज भरून कर्ज खाते नूतनीकरण करण्यास बऱ्याच वेळा सांगितले असून त्यांचे कडून कोणताही प्रतिसाद आलेला नाही. एक अंतिम संधी म्हणून या जाहीर नोटीस द्वारे वरील दोन्ही कर्जदारांना सूचित करण्यात येते कि हि नोटीस प्रसारित झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत आपले कर्ज खाते बंद अथवा नूतनीकरण झाले नाही तर आपण तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांची लिलावाद्वारे विक्री करून आपले कर्ज खाते बंद करण्यात येईल. सदर बाबीसाठी येणारा खर्च आपल्या कर्ज खाती नांवे टाकून वसूल करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सही/-
सखी मल्टि स्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि
संचालक मंडळाच्या आदेशा वरून
श्री रविंद्र ह.जाधव
(मुख्य कार्यकारी अधिकारी)

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे नागोबाचीवाडी ता. बार्शी व आसपासचे लोकांना खाली सही करणार आमचे आशिल यांचे तर्फे त्यांनी माहिती दिलेवरून व सांगितलेवरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे नागोबाचीवाडी हद्दीतील प्लॉट गट नं. १३२/१/१/१८ याचे क्षेत्र ०० हे.१.५६.७० आर आकार १५ रु.०० पैसे यासी चतुःसिमा पुर्वेस गट नं. १३२/१/१/१७, दक्षिणेस गट नं. १३०, पश्चिमेस गट नं. १३२/१/१/१९, उत्तरेस- १२ मी रुंदीचा रस्ता, याची पाणी व वागणुक उत्तर बाजुचे रस्त्याने आहे. येणेप्रमाणे वर्णनाचा प्लॉट आतील मालकीचे व वागणुकीचे व वहिवाटीचे अधिकारासह जाणेयेणेचे हक्कासह.

वर वर्णन केलेली मिळकत रुपेश सुमेरचंद कांकरिया व सुरज सुभाष राऊत यांचे मालकीची व वहिवाटीची आहे व त्याप्रमाणे त्यांची हक्कपत्रकी नोंद आहे. त्यांनी सदर मिळकत त्यांचे कायदेशीर गरजेपोटी आमचे अशिलास खरेदी देणेचे ठरविलेले आहे. तसेच उपरोक्त वर्णन केलेली मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व विश्वास आमचे अशिलास दिलेला आहे. आमचे अशिल हे ठरलेल्या कराराप्रमाणे मुदतीत खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही हक्कात पूर्व खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, लिज, बक्षिस, कर्ज, बोजा, कब्जा, अग्रहक्क इत्यादी कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसाचे आत कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर संपर्क करुन आमचेकडे लेखी हरकत द्यावी कोणाचीही हरकत तक्रार सदर मुदतीत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध निजोखमी आहे असे समजून आमचे आशिल हे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर मात्र कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत, तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे ही जाहीर नोटीस दिली. ता. २२/१०/२०२६.

सही/-
अशिल

सही/-
अशिलातर्फे ॲडव्होकेट
ॲड संदिप महादेव भोसले
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी
मो.नं. ८०८७११९१००

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे नागोबाचीवाडी ता. बार्शी व आसपासचे लोकांना खाली सही करणार आमचे आशिल यांचे तर्फे त्यांनी माहिती दिलेवरून व सांगितलेवरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे नागोबाचीवाडी हद्दीतील प्लॉट गट नं. १३२/१/१/१९ याचे क्षेत्र ०० हे.१.५०.३४ आर आकार १५ रु.०० पैसे यासी चतुःसिमा पुर्वेस गट नं. १३२/१/१/१८, दक्षिणेस गट नं. १३०, पश्चिमेस गट नं. १३२/१/१/२०, उत्तरेस- १२ मी रुंदीचा रस्ता, याची पाणी व वागणुक उत्तर बाजुचे रस्त्याने आहे. येणेप्रमाणे वर्णनाचा प्लॉट आतील मालकीचे व वागणुकीचे व वहिवाटीचे अधिकारासह जाणेयेणेचे हक्कासह.

वर वर्णन केलेली मिळकत रुपेश सुमेरचंद कांकरिया व सुरज सुभाष राऊत यांचे मालकीची व वहिवाटीची आहे व त्याप्रमाणे त्यांची हक्कपत्रकी नोंद आहे. त्यांनी सदर मिळकत त्यांचे कायदेशीर गरजेपोटी आमचे अशिलास खरेदी देणेचे ठरविलेले आहे. तसेच उपरोक्त वर्णन केलेली मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व विश्वास आमचे अशिलास दिलेला आहे. आमचे अशिल हे ठरलेल्या कराराप्रमाणे मुदतीत खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही हक्कात पूर्व खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, लिज, बक्षिस, कर्ज, बोजा, कब्जा, अग्रहक्क इत्यादी कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसाचे आत कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर संपर्क करुन आमचेकडे लेखी हरकत द्यावी कोणाचीही हरकत तक्रार सदर मुदतीत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध निजोखमी आहे असे समजून आमचे आशिल हे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर मात्र कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत, तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे ही जाहीर नोटीस दिली. ता. २२/१०/२०२०६.

सही/-
अशिल

सही/-
अशिलातर्फे ॲडव्होकेट
ॲड संदिप महादेव भोसले
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी
मो.नं. ८०८७११९१००

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे नागोबाचीवाडी ता. बार्शी व आसपासचे लोकांना खाली सही करणार आमचे आशिल यांचे तर्फे त्यांनी माहिती दिलेवरून व सांगितलेवरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे नागोबाचीवाडी हद्दीतील प्लॉट गट नं. १३२/१/१/२० याचे क्षेत्र ०० हे.१.५३ आर आकार १५ रु.०० पैसे यासी चतुःसिमा पुर्वेस गट नं. १३२/१/१/१९, दक्षिणेस गट नं. १३०, पश्चिमेस गट नं. १३२/१/१/२१, उत्तरेस- १२ मी रुंदीचा रस्ता, याची पाणी व वागणुक उत्तर बाजुचे रस्त्याने आहे. येणेप्रमाणे वर्णनाचा प्लॉट आतील मालकीचे व वागणुकीचे व वहिवाटीचे अधिकारासह जाणेयेणेचे हक्कासह.

वर वर्णन केलेली मिळकत रुपेश सुमेरचंद कांकरिया व सुरज सुभाष राऊत यांचे मालकीची व वहिवाटीची आहे व त्याप्रमाणे त्यांची हक्कपत्रकी नोंद आहे. त्यांनी सदर मिळकत त्यांचे कायदेशीर गरजेपोटी आमचे अशिलास खरेदी देणेचे ठरविलेले आहे. तसेच उपरोक्त वर्णन केलेली मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व विश्वास आमचे अशिलास दिलेला आहे. आमचे अशिल हे ठरलेल्या कराराप्रमाणे मुदतीत खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही हक्कात पूर्व खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, लिज, बक्षिस, कर्ज, बोजा, कब्जा, अग्रहक्क इत्यादी कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसाचे आत कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर संपर्क करुन आमचेकडे लेखी हरकत द्यावी कोणाचीही हरकत तक्रार सदर मुदतीत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध निजोखमी आहे असे समजून आमचे आशिल हे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर मात्र कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत, तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे ही जाहीर नोटीस दिली. ता. २२/१०/२०२६.

सही/-
अशिल

सही/-
अशिलातर्फे ॲडव्होकेट
ॲड संदिप महादेव भोसले
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी
मो.नं. ८०८७११९१००

खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे नागोबाचीवाडी ता. बार्शी व आसपासचे लोकांना खाली सही करणार आमचे आशिल यांच तर्फे त्यांनी माहिती दिलेवरून व सांगितलेवरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे नागोबाचीवाडी हद्दीतील प्लॉट गट नं. १३२/१/१/१७ याचे क्षेत्र ०० हे.१.५९.४६ आर आकार १५ रु.०० पैसे यासी चतुःसिमा पुर्वेस गट नं. १३२/१/१/१६, दक्षिणेस गट नं. १३०, पश्चिमेस गट नं. १३२/१/१/१८, उत्तरेस- १२ मी रुंदीचा रस्ता, याची पाणी व वागणुक उत्तर बाजुचे रस्त्याने आहे. देणेप्रमाणे वर्णनाचा प्लॉट आतील मालकीचे व वागणुकीचे व वहिवाटीचे अधिकारासह जाणेयेणेचे हक्कासह.

वर वर्णन केलेली मिळकत रुपेश सुमेरचंद कांकरिया व सुरज सुभाष राऊत यांचे मालकीची व वहिवाटीची आहे व त्याप्रमाणे त्यांची हक्कपत्रकी नोंद आहे. त्यांनी सदर मिळकत त्यांचे कायदेशीर गरजेपोटी आमचे अशिलास खरेदी देणेचे ठरविलेले आहे. तसेच उपरोक्त वर्णन केलेली मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व विश्वास आमचे अशिलास दिलेला आहे. आमचे अशिल हे ठरलेल्या कराराप्रमाणे मुदतीत खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहेत.

तरी वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही हक्कात पूर्व खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, लिज, बक्षिस, कर्ज, बोजा, कब्जा, अग्रहक्क इत्यादी कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसाचे आत कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर संपर्क करुन आमचेकडे लेखी हरकत द्यावी कोणाचीही हरकत तक्रार सदर मुदतीत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल हे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर मात्र कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत, तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. कळावे ही जाहीर नोटीस दिली. ता. २२/१०/२०२६.

सही/-
अशिल

सही/-
अशिलातर्फे ॲडव्होकेट
ॲड संदिप महादेव भोसले
जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी
मो.नं. ८०८७११९१००

श्रीराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (एसएआरपीएल)

SHRIRAM Asset Reconstruction

(विविध एसएआरपीएल ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम करत आहे)

नोंदणीकृत कार्यालय: श्रीराम हाऊस, क्रमांक ४, बुर्किट रोड, टी. नगर, चेन्नई – ६०००१७. **कॉर्पोरेट कार्यालय:** युनिट क्रमांक एफएफ-ए-०५, ए विंग, पहिला मजला, आर्टगिल्ड हाऊस, फिनिक्स मार्केट सिटी, एलबीएस मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई-४०००७०, **फोन क्रमांक-**१८०० १२० २३९; contact@truhomefinance.in

सार्वजनिक सूचना: स्थावर मालमत्तेची ई-लिलाव-सह-विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम, २००२ तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ मधील नियम ६, ८(६) व ९ तसेच परिशिष्ट–IV-A मधील तरतुदींनुसार स्थावर मालमत्तेच्या ई-लिलाव विक्रीची सूचना.

सर्व सामान्य जनतेस व विशेषत: कर्जदार, तारणकर्ता / कर्ते आणि जामीनदाराना येथे सूचना देण्यात येत आहे कि, खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता ज्या सुरक्षित कर्जदाराकडे गहाण ठेवल्या आहेत/ आकारल्या आहेत, आता **श्रीराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड**, विविध SARPL ट्रस्टच्या विश्वस्त म्हणून काम करत आहेत [नोंदणीकृत असाइनमेंट करारांद्वारे आर्थिक मालमत्तेच्या असाइनमेंटनुसार] SARFAEI कायद्याच्या कलम (5) अंतर्गत, खाली नमूद केलेल्या कर्जदारांसह विविध कर्जदारांशी संबंधित आर्थिक मालमत्ता, मूळ कर्जदाता/नियुक्तकर्ता टूहोम फायनान्स लिमिटेड **(पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)** कडून, त्याद्वारे निर्माण केलेल्या अंतर्निहित सुरक्षा हितासह, त्यावरील सर्व हक्क, मालकी आणि व्याजासह, मिळवले आहे. ज्याचा प्रत्यक्ष ताबा मूळ कर्जदाता/नियुक्तकर्ता/श्रीराम मालमत्ता पुनर्निर्माण प्रायव्हेट लिमिटेड (SARC) च्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, म्हणजेच **SARC-ट्रस्ट-५ च्या विश्वस्त** म्हणून सुरक्षित धनको, कर्ज मंजुरीचा अभिहस्तांकक आणि असाइनर टूहोम फायनान्स लिमिटेड [पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे] द्वारे वितरित केले आहे, नियम ६,८ आणि ९ सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ नुसार तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे, कर्जदार आणि जामीनदारांकडून SARPL म्हणजेच सुरक्षित कर्जदाराला, पुढील व्याज, शुल्क, खर्च इत्यादींसह थकबाकीची रक्कम वसूल करण्यासाठी खाली नमूद केलेल्या लिलाव वेळापत्रकानुसार **"जसे आहे तिथे आहे", "जसे आहे जे आहे" आणि "जे काही आहे ते"** या आधारावर विकले जाईल. कर्जदार आणि जामीनदारांचे तपशील, देय रक्कम, स्थावर मालमत्तेचे संक्षिप्त वर्णन आणि त्यावर ज्ञात असलेले बोजा, जर असतील तर, राखीव किंमत, बयाणा रक्कम ठेव वाढीव बोली, लिलावाची तारीख आणि तपासणीची तारीख देखील खालीलप्रमाणे दिली आहे:

कर्ज खाते क्रमांक, ट्रस्ट असाइनरचे नाव आणि नाव / मूळ कर्जदात्याचे नाव	कर्जदार/सहकर्जदार/जमानतदार/ तारण ठेवणाऱ्यांचे नाव	१३(२) मागणीची तारीख आणि रक्कमसूचना	राखीव किंमत (रु.) आणि वाढीव बोली	लिलावाची तारीख व वेळ	संपर्क व्यक्ती तपशील – (एओ व निवारण समूह)
कर्ज खाते क्रमांक: SHLHSOLR0000342 ट्रस्ट खाते क्र.: SARC – TRUST-5 (टूहोम फायनान्स लिमिटेड अंतर्गत)	**१. श्री. धनाजी हरी बनसोडे २. सौ. सविता धनाजी बनसोडे**	मागणी नोटीस तारीख: १०.०९.२०२४ दिनांक ०६-०९-२०२४ रोजी रु. १३,६३,५३३/- (अक्षरी रुपये तेरा लाख त्रेसठ हजार पाचशे तेहेतीस फक्त) या रकमेसाठी.	रु. १२,१६,४००/- **बोली वाढविणे :** रु. १०,०००/- **बयाणा ठेव रक्कम (ईएमडी) (रुपयात)** (राखीव किमतीच्या १०%) : रु. १,२१,६४०/-- **ईएमडी सादर करण्याची अंतिम दिनांक ११ नोव्हेंबर, २०२६ वेळ सकाळी १०.०० ते संध्याकाळी ०५.००**	**१२ नोव्हेंबर २०२६ लिलावाची वेळ: दुपारी १२.३० ते ०१.३०**	**श्री. सुमेश मित्तल मो. क्र. ९९९३५८७७९७ श्री. मयुरेश जाधव मो. क्र. ९८३३०१७२२१ श्री. गणपत कावठेकर मो. क्र. ९७६४३३८८२२ मालमत्ता पाहणीची तारीख : ०३.११.२०२६ वेळ : दु १२.०० ते ३.०० वा**
ताबा दिनांक व ताबा प्रकार	**ज्ञात अधिभार**				
दिनांक २१-०६-२०२५ आणि भौतिक ताबा	ज्ञात नाही				

संपत्तीचे विवरण

सर्व भाग आणि तुकडा असणारा भूखंड गट क्र. ८०/१/बी/१/ए, लेआउट प्लॅनमधील प्लॉट क्र. ०९, क्षेत्रफळ २७८.८१ चौ. मीटर, ज्यावर "शिवाजी अपार्टमेन्ट" नावाची इमारत बांधलेली असून, त्या इमारतीमधील चौथ्या मजल्यावर असलेला फ्लॅट क्र. ०७, क्षेत्रफळ ६०.३९ चौ. मीटर. सदर मालमत्ता इसबावी, तालुका पंढरपूर, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र - ४१३३०४ येथे स्थित आहे.
चतुःसीमा : पूर्व: बाजूची मोकळी जागा , पश्चिम: फ्लॅट क्र. ०८ दक्षिण: बाजूची मोकळी जागा उत्तर: बाजूची मोकळी जागा

(१) विक्रीच्या सविस्तर अटी व शर्ती, बोली अर्ज आणि इतर माहितीसाठी सुरक्षित धनको/हक्कप्राप्त संस्था (Assignee) मेसर्स श्रीराम असेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड यांच्या https://www.shriramarc.com या संकेतस्थळाला किंवा आमची लिलाव एजन्सी सी१ इंडिया प्रा. लि. (गुडगाव, हरियाणा) यांच्या https://www.bankeauctions.com या संकेतस्थळाला भेट देऊ शकता. कोणत्याही मदतीसाठी तुम्ही support@bankeauctions.com या ईमेल आयडीवर संपर्क साधू शकता किंवा वरील तक्त्यात दिलेल्या आमच्या बिझनेस पार्टनरच्या संपर्क क्रमांकावर संपर्क करू शकता. या अटींवर बोलीदाराने बोली अर्जासोबत स्वाक्षरी करणे अनिवार्य आहे. ही नोटीस अधिकृत अधिकारी/सुरक्षित धनको यांच्या अधिकृत संकेतस्थळावर देखील अपलोड करण्यात आली आहे.
(२) इच्छुक बोलीदारांनी त्यांची अनामत रक्कम (EMD) 'SARC-TRUST-5' च्या नावाचा डिमांड ड्राफ्ट (DD) किंवा RTGS/NEFT द्वारे खालील बँक खात्यात जमा करावी:खात्याचे नाव: SARC-TRUST 5बँकेचे नाव: आयसीआयसीआय बँक लिमिटेड (ICICI Bank Limited)शाखा: मुंबई - कमानी कुर्ला वेस्टखाते क्रमांक: 196205004628आयएफएससी कोड: ICIC0001962
सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ९(१) च्या तरतुदीनुसार] वैधानिक १५ दिवसांची विक्री नोटीसकर्जदार / गहाणखतदार (Mortgagors) / जामीनदार यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी ई-लिलावाच्या (e-Auction) तारखेपूर्वी वरील नमूद केलेली रक्कम, अद्ययावत व्याजासह आणि इतर अनुषंगिक खर्चासह भरून टाकावी. अन्यथा, मालमत्तेचा लिलाव / विक्री केली जाईल आणि काही थकबाकी उर्वरित राहिल्यास, ती व्याजासह व खर्चासह वसूल केली जाईल.

ठिकाण - सोलापूर
दिनांक - २३-१०-२०२६

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी (श्रीराम ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड)
(विविध एसएआरपीएल ट्रस्टचे विश्वस्त म्हणून काम करत आहे)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

शुक्रवार, २३ ऑक्टोबर २०२६

क्राईम वृत्त...

तरुणाच्या बँक खात्यातून तीन लाख रुपये काढून घेऊन फसवणूक

सोलापूर, दि.२२ ऑक्टोबर-

एका तरुणाच्या बँक खात्यातून २ लाख ९३ हजार रुपये काढून घेत ऑनलाइन आर्थिक फसवणूक करण्यात आल्याची घटना दाजी पेठ परिसरात उघडकीस आली. याप्रकरणी जेलरोड पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत योगेश अंबाजी कांबळे (वय ३५ वर्ष, रा. व्यंकटेश्वर नगर, दाजी पेठ, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. दि.१९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.१४ वाजण्याच्या सुमारास फिर्यादी घरी असताना त्यांच्या आयसीआयसीआय बँकेच्या महावीर चौक येथील खात्यातून २ लाख ९३ हजार रुपये काढल्याचा मेसेज फिर्यादीच्या मोबाईलवर आला. याबाबत फिर्यादीने बँकेत जाऊन चौकशी केली असता फिर्यादीच्या अकाउंट मधून कोणीतरी अज्ञात व्यक्तीने ऑनलाइन पद्धतीने रुपये काढून फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

मंद्रूप पोलिसांनी २८ लाखाचा गुटखा केला जप्त

मंद्रूप, दि.२२ ऑक्टोबर-

कंदलगाव येथील बसस्थानकावर प्रतिबंधित पानमसाला आणि सुगंधित तंबाखूची अवैध वाहतूक करणारा पिकअप मंद्रूप पोलिसांनी पकडला असून तब्बल २८ लाख ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.ही कारवाई गुरुवार, दि.२२ ऑक्टोबर २०२६ रोजी पहाटे ५ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली. अन्न व औषध प्रशासनाचे अन्न सुरक्षा अधिकारी अशोक यमनप्पा इलागेर (वय-४४) यांनी दिलेल्या माहितीवरून पिकअप वाहन क्र. २४ ८४५४ थांबवले.चालकाने आपले नाव राजाभाऊ बालाजी चव्हाण, (वय-२२, रा.रुपचंद नगर, ता.रेणापूर, जि.लातूर) असे सांगितले. यात विमल पानमसाला ३० पोती-किंमत १३ लाख ६ हजार ८०० रु. व्ही तंबाखू ०६ पोती-किंमत ४३ हजार ५६० रु. विमल पानम साला १९ पोती-किंमत ४ लाख ३० हजार ९२० रु. व्ही १ तंबाखू ३ पोती-किंमत ३५ हजार१०० रु.व्ही १ तंबाखू ५ पोती-किंमत ४६ हजार ८०० रुपयांचा समावेश आहे.

कुत्रा आडवा आल्याने महिला जखमी

सोलापूर, दि.२२ ऑक्टोबर-

दुचाकीवरुन जात असताना कुत्रा आडवा आल्याने दुचाकीवर मागे बसलेली महिला जखमी झाल्याची घटना बुधवार, दि.२१ ऑक्टोबर २०२६ रोजी आकाशवाणी केंद्राजवळ घडली. शबाना महमूद शेख (वय-५०, रा.बापूजी नगर, सोलापूर) असे यातील जखमी महिलेचे नाव आहे. शबाना शेख ह्या दुचाकीच्या पाठीमागे बसून घरकुलहून बापूजी नगरच्या दिशेने जात असताना आकाशवाणी केंद्राजवळ कुत्रा आडवा आल्याने त्या खाली कोसळून जखमी झाल्या. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

पूर्वीच्या भांडणावरुन रॉडने मारहाण

सोलापूर, दि.२२ ऑक्टोबर-

मोदी परिसरातील जयशंकर तालीम जवळ पूर्वीच्या भांडणावरुन लोखंडी रॉड आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत विष्णू श्रीनिवास विटेकर (वय-४०) हा जखमी झाला. कुरमय्या बंतेलोलू, दशरथ बंतेलोलू आणि इतर चौघांनी मिळून त्याला मारहाण केली. त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.



सखी संगम प्रदर्शनाला महिलांचा उत्तम प्रतिसाद

सोलापूर, दि.२२ ऑक्टोबर-

श्री सोलापूर गुजराती मित्र मंडळ संचलित महिला विभागाच्या वतीने 'सखी संगम प्रदर्शन २०२६' प्रदर्शनाचे उद्घाटन कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. हे प्रदर्शन शुक्रवार, दि.२३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत गुजरात भवन, मुरारजी पेठ, सोलापूर येथे सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत ग्राहकांसाठी खुले राहणार आहे. आकर्षक ज्वेलरी, आर्टिफिशियल ज्वेलरी, सोने-चांदीचे दागिने, ड्रेस, साड्या, ड्रेस मटेरियल, तोरण, रांगोळी साहित्य, विविध खाद्यपदार्थ, मुखवास तसेच इतर अनेक वस्तूंचा समावेश असणार आहे, असे प्रीती शहा, अर्पिता बक्षी यांनी सांगितले.

सोलापुरात जीर्ण इमारतीचा भाग कोसळला; जेसीबी ऑपरेटर जखमी

सोलापूर, दि.२२ ऑक्टोबर-

शहरातील टिळक चौक परिसरातील कुबेर गल्ली येथे शुद्धोहम शोरूमसमोरील जुन्या इमारतीचा काही भाग गुरुवारी अचानक कोसळला. इमारतीचा मलबा थेट रस्त्यावर पडल्याने परिसरात खळबळ उडाली. सुदैवाने या घटनेत जीवितहानी झाली नाही. दरम्यान, मलबा हटविण्याच्या कामादरम्यान महापालिकेचा जेसीबी ऑपरेटर किरकोळ जखमी झाला. गुरुवारी दुपारी इमारतीच्या दर्शनी भागाचा काही हिस्सा अचानक कोसळून रस्त्यावर पडला. सुदैवाने अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच सोलापूर महानगरपालिकेच्या आपत्कालीन नियंत्रण कक्षाने घटनास्थळी धाव घेतली. उपअभियंता संगमनाथ उप्पीन यांच्या मार्गदर्शनाखाली कनिष्ठ अभियंता आदर्श गायकवाड आणि पद्मराज तळभंडारे यांनी यंत्रसामग्री व मजूर पथकासह मलबा हटविण्याची कार्यवाही सुरु केली. यावेळी नगरसेवक अमर पुदाले, बांधकाम परवाना विभागाचे कनिष्ठ अभियंता आशिष घुले, भूमापक तौसिफ सय्यद उपस्थित होते.

ग्रामपंचायतींच्या कर वसुलीला ब्रेक!

- सप्टेंबरअखेर केवळ ४०.७५ टक्के वसुली
- ३५.५९ कोटींच्या मागणीपैकी १४.५० कोटी जमा
- उत्तर सोलापूर अव्वल, करमाळा तालुका पिछाडीवर

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२२ ऑक्टोबर-

ग्रामपंचायतींच्या आर्थिक उत्पन्नाचा प्रमुख आधार असलेल्या कर वसुलीचा वेग मंदावल्याचे जिल्ह्यातील सप्टेंबर २०२६ अखेरच्या आकडेवारीवरून समोर आले आहे. जिल्ह्यातील ग्राम पंचायतींकडून एकूण ३५ कोटी ५९ लाख रुपयांची कर वसुली अपेक्षित असताना प्रत्यक्षात केवळ १४ कोटी ५० लाख रुपयांची वसुली झाली आहे. त्यामुळे एकूण मागणीच्या अवघ्या ४०.७५ टक्के रक्कम जमा झाली असून, तब्बल ५९.२५ टक्के रक्कम अद्याप वसुलीच्या प्रतीक्षेत आहे. या आकडेवारीमुळे ग्रामपंचायतींच्या आर्थिक नियोजनासमोर आव्हान उभे राहिले आहे.

तालुकानिहाय आकडेवारीचा विचार करता उत्तर सोलापूर तालुक्याने ५०.६८ टक्के वसुलीसह जिल्ह्यात आघाडी घेतली आहे.

माढा तालुक्यात ४९.६२ टक्के वसुली झाली असून, हा तालुका दुसऱ्या क्रमांकावर आहे. दक्षिण सोलापूरमध्ये ४४.८२ टक्के, पंढरपूरमध्ये ४१.२६ टक्के, बार्शीत ४०.३९ टक्के, तर अक्कलकोट तालुक्यात ३९.४५ टक्के वसुली नोंदविण्यात आली आहे. या तालुक्यांम ध्येही अपेक्षित उद्दिष्टाच्या तुलनेत वसुली अपुरी असल्याचे दिसून येते.

दुसरीकडे करमाळा तालुक्याची वसुली केवळ ३४.४२ टक्क्यांवर राहिली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्वात कमी वसुली असलेल्या तालुक्यांमध्ये करमाळ्याचा समावेश झाला आहे. कुर्डुवाडी तालुक्यात ३५.३० टक्के, मंगळवेढ्यात ३७.१९ टक्के आणि सांगोल्यात ३७.७८ टक्के वसुली झाली आहे. या आकडेवारीवरून तालुकानिहाय कर वसुलीत मोठी तफावत असल्याचे स्पष्ट होते.

वसुली वाढविण्यासाठी विशेष मोहिमेची गरज

ग्रामपंचायतींच्या दैनंदिन कारभारासाठी, पाणीपुरवठा, स्वच्छता, दिवाबत्ती आणि स्थानिक विकासकामांसाठी स्वतःच्या उत्पन्नाचे महत्त्व मोठे आहे. कर वसुली अपेक्षित प्रमाणात न झाल्यास विकासकामांसाठी उपलब्ध होणाऱ्या निधीवर मर्यादा येऊ शकतात. त्यामुळे थकबाकीदारांना नोटिसा देणे, ग्रामपंचायतीनिहाय वसुलीचा नियमित आढावा घेणे आणि नागरिकांना वेळेत कर भरण्यासाठी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे.

थकबाकीदारांना दिलासा मिळण्याची अपेक्षा

ग्रामपंचायतींच्या कर वसुलीला गती देण्यासाठी समृद्ध अभियान २.० अंतर्गत विशेष सवलत देण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. या सवलतीमुळे थकबाकीदार नागरिकांना कर भरण्यास प्रोत्साहन मिळून ग्रामपंचायतींच्या उत्पन्नात वाढ होण्याची अपेक्षा आहे. सोलापूर जिल्ह्यात सप्टेंबरअखेर कर वसुलीचा आकडा ४०.७५ टक्क्यांवर असल्याने या अभियानाकडे विशेष लक्ष लागले आहे. सवलतीचा लाभ घेत नागरिक थकबाकी भरतात का आणि त्यामुळे वसुलीचा टक्का किती वाढतो, हे आगामी काळात स्पष्ट होईल.

व्हि.आर.पवार यांच्या धाराशिव येथील शोरुमचे थाटात उद्घाटन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२२ ऑक्टोबर-

महाराष्ट्रातील सर्वात मोठे फॅमिली शोरुम असलेल्या व्हि.आर. पवार यांच्या परिवारातील धाराशिव येथील तिसऱ्या शोरुमचे थाटात उद्घाटन करण्यात आले. प्रारंभी पारंपारिक पध्दतीने पूजा करण्यात आले. एमआयडीसी रोड, तेरणा कॉलेजसमोर असलेल्या मॉल चौक येथे सदर शोरुम उघडण्यात आले आहे, असे मुख्य व्यवस्थापक राजेश पवार यांनी सांगितले.

यावेळी धाराशिवचे पोलिस अधीक्षक रितू खोकर, अप्पर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, उपजिल्हाधिकारी स्वाती शेंडे, तहसीलदार धाराशिव डॉ.मृणाल जाधव, मुख्याधिकारी धाराशिव नगरपरिषदेच्या नीता अंधारे, रमेश पवार, सुलोचना पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रत्येकासाठी काही खास, संपूर्ण कुटुंबासाठी एकच विश्वास हे विचार घेऊन व्हि. आर. पवार यांनी धाराशिवम ध्ये भव्य फॅमिली फॅशन दालनाची सुरुवात करण्यात आली आहे. यामध्ये दैनंदिन वापरापासून ते सणासुदीला वापरणाऱ्या कपड्यापर्यंत तसेच लग्नबस्ता करिता साड्या, सूट शेरवानी, सुटिंग-शर्टिंग, किड्सकरिता सर्व प्रकारचे व्हरायटी उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. या भव्य फॅमिली फॅशन दालनाला धाराशिवकर आणि परिसरातील नागरिकांनी एकवेळ अवश्य भेट द्यावे, असे आवाहन अमर पवार, महेश पवार, गिरीश पवार यांनी केले आहे.



श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी पुडूर

व्हाईस चेअरमनपदी अजय रंगम

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२२ ऑक्टोबर-

येथील श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी अरविंद पुडूर तर व्हाईस चेअरम नपदी अजय रंगम यांची एकमताने निवड करण्यात आली. प्राधिकृत अधिकारी के.बी.जमादार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत ही निवड जाहीर करण्यात आली.



याप्रसंगी तोगटवीर क्षत्रिय समाजाचे अध्यक्ष नागनाथ कोंतम यांच्यासह अरुण चिंता, विठ्ठल बडगंची, लक्ष्मीकांत उदगिरी, नरेंद्र बत्तुल, मल्लिकार्जुन खंडे, विलास बडगंची, शंकर कोंतम, विष्णु म्याकल, चंद्रकांत रंगम, उमा पुडूर, अंबिका उदगिरी, विजयकुमार शिंपी, रुपसिंग राठोड, भगवंत फलमारे, ॲड. अंबादास कंदीकोंडा, श्रीकृष्ण डक्का आदी उपस्थित होते.

या पतसंस्थेत एकूण ३१३५५.९७ लाख रुपये इतके ठेवी, कर्जे २८९२०.११ लाख तर एकूण व्यवसाय ६०२७६.०८ लाख इतके आहे. स्थापनेपासून ऑडीट वर्ग 'अ' असून एनपीएचे प्रमाण ० टक्के आहे. एकूण कर्जापैकी ९९ टक्के सुरक्षित कर्जे आहेत. या पतसंस्थेला महाराष्ट्र शासनाच्या सहकारनिष्ठ पुरस्कारासह एकूण २१ पुरस्कार मिळाले आहेत.



१६०० बोगस शिक्षकांच्या नोंदणीचा आरोप

नगरसेवक अमोल शिंदेंचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.२२ ऑक्टोबर-

सोलापूर जिल्ह्यात शिक्षकांच्या नावनोंदणी प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार होत असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. पुणे विभाग शिक्षक विधानपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यात बोगस शिक्षकांची नावे नोंदविण्यात आल्याचा संशय व्यक्त करत या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन संबंधितांवर तात्काळ गुन्हे दाखल करण्याची मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी केली आहे. यासंदर्भात सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

मोहोळ तालुक्यातील काही शाळांसह जिल्ह्यातील विविध ठिकाणी अशा प्रकारच्या नोंदणीबाबत संशय व्यक्त करण्यात आला आहे. निवेदनात पंढरपूर तालुक्यातील एका शाळेचाही उल्लेख करण्यात आला असून, त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर बोगस नावे नोंदविण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या सर्व प्रकरणांमध्ये मुख्याध्यापकांच्या सह्यांची सत्यता, शाळांची कागदपत्रे आणि शिक्षकांच्या पात्रतेची पडताळणी करण्याची मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

अश्विनी रुग्णालय निवडणूक ५ नोव्हेंबर रोजी होणार फैसला

- ४८ टक्के मतदान, ४ उमेदवार बिनविरोध
- १२ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-

अश्विनी सहकारी रुग्णालयच्या सर्वसाधारण गटातील १० जागांसाठी महाराष्ट्रातील ५ तर कर्नाटकातील २ मतदारसंघात मतदान प्रक्रिया पार पडली. दि.५ नोव्हेंबर २०२६ रोजी याचा फैसला लागणार आहे. २ हजार ५६२ पैकी १ हजार २३१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. एकूण ४८ टक्के मतदान झाले.

धाराशिव-लातूर मतदारसंघ १, कर्नाटक मतदार संघ १, महिला राखीव २ आणि अनुसुचित जाती जमाती या मतदार संघातील उम ेदवार बिनविरोध निवडले गेले. याम ध्ये शाह शैलेश, तापडीया संपत, डागा यशोदाबाई, राठी किशोरी, व्हटकर रमेश यांचा समावेश आहे.

सर्वसाधारण गटातील १० जागांसाठी १२ जण निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. त्यांची नावे याप्रमाणे; करवा कौस्तुभ विश्वनाथ, कोठारी भैरुलाल म ोहनलाल, कुचन अरविंद गंगाधर, पटेल बिपीनभाई महीजीभाई, पटेल जयेशभाई रमेशभाई, पटेल मेहुल बिपीनभाई, पाटील संजीव जयकुम ार, डॉ.पाटील विजय काकासाहेब, डॉ.प्रधान राजीव मधुकर, गोसकी राजाराम बसवय्या, रांभिया म निष केशवजी, स्वामी चंद्रशेखर सिध्दलिंगय्या.

तीन अल्पवयीन मुलींना फुस लावून पळवले

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. २२ ऑक्टोबर-

तीन अल्पवयीन मुलींना फूस लावून पळवून नेल्याची धक्कादायक घटना सलगर वस्ती येथील रामवाडी, न्यू धोंडीबा वस्ती परिसरात १९ ऑक्टोबर रोजी सकाळी घडली.

याबाबत राधा श्रावण फुलारी (वय ४०, रा. न्यू धोंडीबा वस्ती, रामवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. याप्रकरणी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

रेणुका श्रावण फुलारी (वय १४ वर्षे २ महिने), महादेवी नागेश बनसोडे (वय १४) श्रेया रमेश गायकवाड (वय १५ वर्षे ५ महिने) अशी तीन मुलींची नावे आहेत. वरील तीनही मुलींना अज्ञात व्यक्तीने सोमवारी सकाळी काहीतरी आमिष दाखवून पळवून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक स्वरांजली खामकर करत आहेत. या मुलींविषयी काही माहिती मि ळाल्यास नागरिकांनी सलगर वस्ती पोलीस ठाणे (दुरध्वनी : ०२१७-२७४४६६१) येथे त्वरित संपर्क साधावा असे आवाहन पोलिस निरीक्षक श्रीशैल गजा यांनी केले आहे.

PUBLIC NOTICE

Under instructions from and on behalf of my client, Mr. Prathamesh Ravasaheb Gavasane aged- 24 years, residing at Pankaj Nagar, Barshi Tal- Barshi Dist- Solapur, hereby give this Public Notice as under:

That my client is known by the name Mr. Prathamesh Ravasaheb Gavasane, and the said name appears in his various identity documents and official records.

That my client hereby declares that the name as mentioned in Adharcard Mr. Prathamesh Ravasaheb Gavasane and the name mentioned in 10th Mark list Gavasane Prathmesh Raosaheb refer to one and the same person, i.e., my client. In accordance with same my client has made affidavit before Notary Public Government of India at Sr. No. 224/26

My client has made this declaration for the purpose of submitting the same before the Passport Authority, Government of India, and for any other official and legal purposes, as may be required."

Sign/-
Advocate .P. P. Waghmare
Bsc. LL.B
Add-Barshi Dist and Session Court
Mob No-9975120774

उपविभागीय अधिकारी, पंढरपूर विभाग पंढरपूर, यांचे कार्यालय,
पद्मावती तळे (M.T.D.C) च्या पाठीमागे पंढरपूर
(अपिल - संकलन)
फोन. ०२१८६-२२३२२९ Email id.sdopandharpur@gmail.gov.com

आरटीएस अपिल क्र.१९८/२०२६ दिनांक : १९/१०/२०२६

जाहीर नोटीस

वादीचे नाव व पत्ता	प्रतिवादीचे नाव व पत्ता
१. रंजना राजेंद्र राऊत रा. नरखेड, ता. मोहोळ, जि. सोलापूर	१. बायडाबाई परशुराम वाघमारे २. सविता धनाजी बंड ३. उज्वला संतोष वाघमारे ४. वैष्णवी संतोष वाघमारे ५. ज्ञानेश्वरी संतोष वाघमारे सर्व रा. यवत, ता. दौंड, जि. पुणे

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये

मौजे बोपले, ता. मोहोळ येथील जमीन गट नं.२४ फेरफार ३४४७ संदर्भात मंडल अधिकारी अनगर यांनी दिनांक- १८/०२/२०२६ रोजी नोंद नामंजुर करणेच्या आदेशाविरुद्ध अपिलार्थी यांनी सदरचे अपिल या न्यायालयात दाखल केले आहे.

प्रस्तुतचे अपिलामध्ये वादी व प्रतिवादी यांना रितसर नोटीसा काढून त्यांची बजावणी करणेत आली आहे. परंतु प्रतिवादी यांचा पत्ता अपूर्ण असलेने ते अनुपस्थित राहिले आहेत.

त्याअर्थी प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर कामातील चौकशीसाठी तहसिल कार्यालय मोहोळ,जि.सोलापूर येथे पुढील तारीख- १२/११/२०२६ रोजी दुपारी १.०० वा.नेमली आहे. त्या तारखेस तुम्ही व्यक्तीशः अथवा तुमचे विधिज्ञांमार्फत सदर कामी हजर रहावे अन्यथा तुम्हास या कामी काहीही सांगावयाचे नाही असे समजुन तुमचे गैरहजेरीत अपिल चौकशीचे काम पुर्ण केले जाईल. सदरची नोटीस वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणेत यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे. ता. १९/१०/२०२६

सही/-
(सचिन इथापे)
उपविभागीय अधिकारी
पंढरपूर विभाग पंढरपूर

Paper Public Notice/Summons नि. ७

IN THE COURT OF MOTOR ACCIDENT CLAIM TRIBUNAL, BARSHI AT BARSHI
MACP No. 29/2023

Rajashri W/o. Vilas Mundhe, others, -- Applicants
VS
Prasad s/o. Shirish Laddha, others, -- Opponents

To,

1. **Prasad S/o. Shirish Laddha, age Major,** Occu- Business, R/o. 3895 Bhavni Peth, Barshi, Tal. Barshi
2. **Sudhakar S/o. Ranganath Kade,** Age-Major, Occup- Driver, R/o. Waluj Tq. Mohol, Dist. Solapur At present- Near Market Yard, Barshi, Dist, Solapur

WHEREAS, **Rajashri W/o Vilas Mundhe,** and others Applicants residing at Devlali, Tal. Bhoom, Dist. Osmanabad state Maharashtra has instituted Motor Accident Claim in this Court against you. You are hereby noticed to appear in this court in person or by a pleader duly instructed and able to answer all material questions relating to the claim or who shall be accompanied by some person able to answer all such questions. **On 21 day of 11 2026 at 11.00 O'clock** in the before noon to answer the claim and as the day fixed for your appearance is appointed for the final disposal of the claim, you must be prepared to produce on that day all the witnesses upon whose evidence and all the documents upon which you intend to rely in support of your defense.

Take notice that in default of your appearance on the day mentioned above, the claim will be heard and determined in your absence.

Also take notice that in default of your filling an address for service on or before the date mentioned you are liable to have your defence struck out.

This paper publication of Summons/Notice published in Daily Newspaper Dainik Tarun Bharat, at Solapur on this date 22/10/2026

Sign/-
Clerk

Sign/-
Superintendent
District Court Barshi, Dist
Solapur Maharashtra

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com. ● Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

शहरातील पाणी पुरवठ्याचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २२ ऑक्टोबर : शहरातील पाणी पुरवठ्यासाठी लातूर शहर महानगरपालिकेमार्फत तयार करण्यात आलेले वेळापत्रक आणि पाण्याच्या वापराबाबतच्या नियोजनाचा जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे अध्यक्ष डॉ. भारत बास्टेवाड यांनी आज आढावा घेतला. तसेच पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या.

या बैठकीला लातूर शहर महानगरपालिका आयुक्त राहुल कुलकर्णी यांच्यासह अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, अविनाश कोरडे, लातूर शहर महानगरपालिका उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे, तहसीलदार वर्षा मनाळे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी साकेब उस्मानी यांच्यासह जलसंपदा विभाग, महावितरणचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. धाराशिव, बीड जिल्ह्यातील अधिकारीही या बैठकीला दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

विविध वृत्त.....

१७३ गावांसाठी २५६ विहीरींचे अधिग्रहण

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ ऑक्टोबर : जिल्ह्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये यासाठी प्रशासनामार्फत विविध तालुक्यांमध्ये खाजगी विहिरी व विंधन विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. जिल्ह्यातील १० तालुक्यांपैकी निरनिराळ्या गावांमध्ये व वाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी एकूण २५६ विहिरींचे आणि विंधन विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे.

यामध्ये लातूर तालुक्यात १३ गावांसाठी १९ विहिरी, औसा तालुक्यात ३२ गावांसाठी ५१ विहिरी, रेणापूर तालुक्यात २१ गावांसाठी २८ विहिरी, उदगीर तालुक्यात ७ गावांसाठी ७ विहिरी, अहमदपूर तालुक्यात ३८ गावांसाठी ४१ विहिरी, चाकूर तालुक्यात १७ गावांसाठी १७ विहिरी, देवणी तालुक्यात ११ गावांसाठी २४ विहिरी, निलंगा तालुक्यात २५ गावांसाठी ४५ विहिरी आणि शिरूर अनंतपाळ तालुक्यात ९ गावांसाठी २४ विहिरींचा समावेश आहे.

जिल्ह्यातील एकूण १७३ गावे व वाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी २५६ विहिरी व विंधन विहिरी अधिग्रहित करून नागरिकांना पाणी पुरवठा केला जात आहे.

मुक्तांगण इंग्लिश स्कूल मध्ये विजयादशमी उत्साहात साजरी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ ऑक्टोबर : विशालनगर येथील साई मंदिर समोरील मुक्तांगण इंग्लिश स्कूल मध्ये विद्यार्थ्यांनीविजयादशमी उत्साहात साजरी केली. कार्यक्रमाच्या सुरवातीला दुर्गामातेचे पुजन शाळेच्या प्रभारी प्राचार्या माधुरी वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेच्या शिक्षिका सानिया अत्तर यांनी विजयादशमी या सणाविषयी सविस्तर माहिती देताना त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की या दिवशी वाईट विचार सोडून देवून चांगले विचार आचरणात आणावेत. दसरा हा सण साजरा करण्याची परंपरा खूप जुनी आहे. या दिवशी सोने लुटण्याची प्रथा आहे म्हणजेच आपट्याची पाने लुटण्यासाठी गावाची वेश ओलांडून जात असतात. शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांनी दुर्गामातेच्या फोटोला अभिवादन केले.

मराठवाड्यात सर्वाधिक ऊस दराची परंपरा कायम राखू : आ. अमित देशमुख

विलास सहकारी साखर कारखान्याचा २०२६ चा गळीत हंगाम व ऊस मोळी पूजन सोहळा साध्या पद्धतीने संपन्न

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ ऑक्टोबर : विक्रमी ऊस गाळप, उच्चांकी साखर उतारा आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सर्वाधिक दर देण्याचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून विलास सहकारी साखर कारखान्याची आजवरची वाटचाल राहिली आहे. यंदाही ही परंपरा कायम राखत शेतकऱ्यांच्या उसाला मराठवाड्यात सर्वाधिक दर मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष, आ. अमित देशमुख यांनी दिली.



विलास सहकारी साखर कारखाना, वैशालीनगर, निवळी येथील ऊस मोळी पूजन व २६ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ गुरूवार, दि.२२ ऑक्टोबर रोजी कारखान्याच्या अध्यक्षा वैशालीताई देशमुख, आमदार अमित देशमुख, लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, कारखान्याचे उपाध्यक्ष वैजनाथराव शिंदे आणि सर्व संचालक यांच्या उपस्थितीत दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर साध्या पद्धतीने पार पडला. ऊस उत्पादक शेतकरी सभासद, अधिकारी व कर्मचारी यांना गळीत हंगामाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी बोलताना माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले, सर्वत्र दुष्काळाचे सावट असताना शेतकरी, ऊसतोड मजूर व कामगारांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची बांधिलकी कारखाना जपेल. अत्यंत कमी पाण्यात कष्टाने जोपासलेल्या उसाची वेळेत तोडणी करण्याला प्राधान्य दिले जाईल.

मांजरा परिवारातील साखर कारखाने यंदाच्या गाळप हंगामात उसाला प्रति टन तीन हजार रुपये पहिली उचल देणार असल्याची घोषणा सहकार महर्षी, माजी मंत्री आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब यांनी केली आहे. या घोषणेला बांधील राहून अंतिम ऊसदर मराठवाड्यात सर्वाधिक राहील, यासाठी प्रयत्न केले जातील. विक्रमी ऊस गाळप साध्य करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अधिकाधिक दर देता यावा, यासाठी शेतकऱ्यांनी कारखान्याला जास्तीत जास्त ऊस पुरवठा करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

साखर उद्योगात मोठी गुंतवणूक करून इथेनॉल निर्मिती प्रकल्प उभारलेले असताना सरकारने अचानक घातलेल्या निर्बंधांमुळे उद्योगासमोर अडचणी निर्माण होत आहेत. हे निर्बंध उठवून इथेनॉल निर्मितीला चालना देणे गरजेचे आहे. शासनाकडून साखर कारखान्यांची वीज कमी दराने खरेदी करून अधिक दराने विकली जात असल्याने कारखान्यांना वीज विक्रीचा योग्य मोबदला मिळणे आवश्यक आहे. सर्वसामान्य ग्राहकांना साखर माफक दरात उपलब्ध व्हावी; मात्र व्यावसायिक वापरासाठी विकल्या जाणाऱ्या साखरेला योग्य व अधिक दर मिळावा, साखर उद्योगाच्या आर्थिक स्थैर्यासाठी कच्च्या साखरेपासून इथेनॉल निर्मिती करण्यास परवानगी देण्याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी जाहीर मागणीही त्यांनी यावेळी केली.

दुष्काळाच्या कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत, कारखान्याची कार्यक्षमता वाढवून विक्रमी गाळप आणि अधिकाधिक ऊसदर साध्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमास लातूर व परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी, ऊस उत्पादक शेतकरी, कारखान्याचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना खासदार डॉ. शिवाजी काळगे म्हणाले की, आव्हानात्मक परिस्थितीत यावर्षी कारखाना चालवावा लागणार आहे आणि योग्य भाव देणे हे अवघड काम एवरेस्ट चढण्यासारखं आहे अशा परिस्थितीत नेतृत्वाला आपण साथ देऊ. लातूर, बीड, धाराशिव भागात नदीजोड प्रकल्प बाबत मी केंद्रीय जलमंत्र्यांची भेट घेतली आहे, ते याबाबतीत पॉझिटिव्ह बोलले. यासाठी

महाराष्ट्र सरकारने पुढाकार घ्यायला पाहिजे असे सांगीतले. खासदार म्हणून मी कारखाना कामासाठी तुमच्या सोबत आहे शेतकऱ्यांनीही कारखाना व्यवस्थापनाला सहकार्य करावे असे सांगून त्यांनी सर्वांना दिवाळी व गळीत हंगामाच्या शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमायाचे सूत्रसंचालन राहुल इंगळे पाटील यांनी केले तर शेवटी आभार अनंत बारबोले यांनी मानले. प्रारंभी लोकनेते माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या पुतळ्यास व प्रतिमेस मान्यवरांनी पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

यावेळी संचालक सर्वश्री रवींद्र काळे, अमृत जाधव, सतिश शिंदे पाटील, अनंत बारबोले, नरसिंग बुलबुले, गोवर्धन मोरे, रंजीत पाटील, रसूल पटेल, तात्यासाहेब पालकर, हणमंत पवार, रामराव साळुंके, सुभाष माने, लताबाई देशमुख, दिपक बनसोडे, शाम बरुरे, कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील, लातूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष उमेश बेद्रे, विलास बँकेचे व्हा.चेअरमन समद पटेल, पंचायत समिती सभापती श्रीकांत बैले, दिपाली आदमाने, शरयु गायकवाड, उषा कदम, दत्ता टेकाळे, अक्षय देशमुख, राम स्वामी, बाळासाहेब दम, अमोल देडे, माने, नवनाथ काळे, विशाल पाटील, हणमंत जगदाळे आदीसह कारखाना परिसरातील सर्व जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, माजी संचालक शाहूराज पवार, नारायण पाटील, चंद्रकांत टेकाळे, बाळासाहेब बिडवे, राजेंद्र मस्के, भारत आदमाने, कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

औरंगाबाद पदवीधर मतदार संघ निवडणुकीसाठी चाकूर तालुक्यातून ७ मतदान केंद्रावर पथके रवाना

तभा वृत्तसेवा

चाकूर दि. २२ ऑक्टोबर : औरंगाबाद पदवीधर मतदार संघ महाराष्ट्र राज्य निवडणुकीसाठी चाकूर तालुक्यातून एकूण ७ मतदान केंद्रावर मतदान केंद्र पथके रवाना करण्यात आली.असून तहसील कार्यालयात आयोजित कार्यक्रमात तहसीलदार नरसिंग जाधव, पोलीस निरीक्षक बालाजी भंडे, उपविभागीय अभियंता सुरज गोंड, नायब तहसीलदार दिगंबर स्वामी, संतोष धाराशिवकर, शैलेश निकम, पंचायत समिती विस्तार अधिकारी महेश माने यांच्यासह केंद्रावरील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



चाकूर तालुक्यातील एकूण मतदान केंद्रांमध्ये पदवीधर मतदारांसाठी ७ केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. यात एकूण मतदार संख्या २४३२ असून, त्यामध्ये पुरुष १९०८ व स्त्री ५२४ मतदार आहेत.चाकूर शहर महसूल हॉल, तहसील कार्यालय, चाकूर एकूण ४४२ मतदार पैकी पुरुष ३२७, स्त्री ११५ , चाकूर नगरपरिषद हद्दीतील भाग चाकूर ग्रामीण जगतजागृती माध्यमिक शाळा, स्टाफ रूम, चाकूर एकूण ३२९ मतदार पुरुष २४८, स्त्री ८१, तसेच वडवळ नागनाथ जि.प. प्रशाला एकूण ४४० मतदार पुरुष ३४७, स्त्री ९३ नळेगाव जि.प. प्रशाला, नवीन इमारत खोली क्र. ६ एकूण ४२८ मतदार पुरुष ३५३, स्त्री ७५, झरी बु. जि.प. केंद्रीय शाळा,एकूण २२५ मतदार पुरुष १८३, स्त्री ४२, शेळगाव जि.प. केंद्रीय शाळा एकूण ३०६ मतदार पुरुष २४५, स्त्री ६१, आष्टा जि.प. केंद्रीय शाळा एकूण २६२ मतदार पुरुष २०५ स्त्री ५७ वरील सर्व ७ केंद्रे ही इतर कोणतेही मतदान केंद्रास अनुकूल नसल्याने योग्य खोलीची निवड करण्यात आली असल्याचे प्रशासनाने कळवले आहे. निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असल्याची माहिती देण्यात आली आहे.

आज आठवडी बाजार बंद

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ ऑक्टोबर : आज शुक्रवार, दिनांक २३ ऑक्टोबर २०२६ रोजी ०५- औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ साठी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर मतदारांना आपला मतदानाचा हक्क सुलभतेने बजावता यावा आणि संपूर्ण मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पडावी यासाठी लातूर जिल्ह्यातील शुक्रवारी भरणारे सर्व आठवडी बाजार बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य पणन संचालक संजय कदम यांनी मार्केट ॲण्ड फेअर ॲक्ट १८६२ च्या कलम ५ (अ) अन्वये मिळालेल्या अधिकाराचा वापर करत २३ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या मतदानाच्या दिवशी लातूर जिल्ह्यातील आठवडी बाजार बंद ठेवण्यास संमती दर्शवली आहे

खोपेगाव येथे १० एकर ऊस जळून खाक

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २२ ऑक्टोबर : दसऱ्याचा सण, सर्वत्र आनंदाचे वातावरण असताना लातूर तालुक्यातील खोपेगाव येथे दि. २० ऑक्टोबर रोजी दुपारी २.३० वाजता शेताच्या लगत असलेल्या महावितरणच्या डीपीमध्ये शॉर्टसर्किट होऊन ठिणगी थेट ऊसाच्या शेतात पडली. क्षणार्धात दोन शेतकऱ्यांचा १० एकर डोलदार ऊस जळून खाक झाला. त्यामुळे या शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले.



आधीच दुष्काळाने होरपळणारा शेतकरी, त्यात दसऱ्याच्या दिवशीच वर्षभर जपलेले पीक डोळ्यासमोर जळाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. सुदैवाने दसऱ्याची सुट्टी असल्याने गावातील सर्व युवक गावातच होते. आगीची माहिती मिळताच युवकांनी जीवाची पर्वा न करता शेतात धाव घेतली आणि आग पसरू न देता विझवली. जर सुट्टी नसती तर आजूबाजूचा अनेक एकर सोयाबीन व ऊसही जळाला असता. अग्निशामक गाडी येईपर्यंत युवकांनीच संपूर्ण आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले.

यावर्षी पावसाचे अत्यल्प प्रमाण राहिल्याने अशा परिस्थितीत जोपासलेल्या ऊसाचे पिक जळून खाक झाले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आगामी आर्थिक नियोजनावर परिणाम झाला आहे. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे.

पौष्टिक आहार घ्यावा व अन्नाचा योग्य वापर करावा : पृथ्वीराज पाटील निलंगेकर



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २२ ऑक्टोबर : स्थानिक पातळीवर जे घटक उपलब्ध आहेत त्याचा योग्य वापर करून आरोग्याला पोषक व माफक किमतीत खाद्यपदार्थ तयार करता येऊ शकतात असे पौष्टीक खाद्यपदार्थ तयार करावे व त्याचा योग्य वापर करावा. आजच्या दुष्काळी परिस्थितीत याचा योग्य उपयोग होऊ शकतो. असे मत पृथ्वीराज पाटील निलंगेकर यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र महाविद्यालयात जागतिक अन्न दिनानिमित्त अन्नप्रक्रिया संरक्षण व साठवण विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

विभागाच्या वतीने आज नाविन्यपूर्ण विचार करा व उद्याचे पोषण साधा या संकल्पनेवर आधारित विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आलेले होते. रागी कुकीज, मल्टीग्रेन क्रॅकर्स, पालक नमकपारे, बीटरूट क्रॅकर्स, ओट्स माफीन्स अशा विविध व नावीन्यपूर्ण खाद्यपदार्थांची निर्मिती विद्यार्थ्यांकडून केली व त्यांचे प्रदर्शन आणि विक्री यावेळी करण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम यांचीही उपस्थिती होती. त्यांनी संतुलित आहार, अन्नसुरक्षा, अन्नप्रक्रिया तसेच अन्न संरक्षण करून अन्नाची नासाडी रोखण्याचे महत्त्व अधोरेखित केले. या प्रदर्शनास महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी भेट देऊन तयार केलेल्या नाविन्यपूर्ण खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला व कौतुक केले.

अन्नपदार्थांची निर्मिती, उत्पादन, विकास आणि उद्योजकतेचे व्यावहारिक ज्ञान, पौष्टिक आहाराबाबत जनजागृती, अन्नाचा योग्य वापर हा संदेश या उपक्रमाच्या माध्यमातून देण्यात आला.

बी.व्होक विभागाच्या प्रा. सोनम पाटील , प्रा. मनीषा गायकवाड, प्रा. काकडे, प्रा. अभिमन्यू गंगाजी यांनी हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केलेत.

एमआयटी लातूर येथे २४ व २५ ऑक्टोबरला 'इलेक्ट्रोकॉन-२६' आंतरराष्ट्रीय फिजिओथेरपी परिषद

इलेक्ट्रोथेरपीतील आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि पुनर्वसनावर होणार मंथन; देश-विदेशातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. २२ ऑक्टोबर : माईर्स पुणे संचलित महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी, लातूर आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने तिसऱ्या आंतरराष्ट्रीय इलेक्ट्रोथेरपी परिषदेचे अर्थात 'इलेक्ट्रोकॉन-२६'चे आयोजन दि. २४ व २५ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात आले आहे. ही परिषद लातूर येथील एमआयटी कॅम्पस, विश्वनाथपुरम येथे होणार आहे.

या आंतरराष्ट्रीय परिषदेला थायलंडमधील माहिडोल विद्यापीठाचे डॉ. प्रासेर्ट सकुलश्रीप्रासेर्ट प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, संचालक प्रा. डॉ. तेजस हनुमंत कराड, परिषदेचे अध्यक्ष तथा एमआयपीटीचे प्राचार्य डॉ. सुभाष खत्री आणि परिषदेचे सचिव डॉ. विश्वनाथ पवारशेट्टी यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

'इनोव्हेशन, एव्हिडन्स अँड रिहॅबिलिटेशन' अर्थात 'नावीन्य, वैज्ञानिक पुरावे आणि पुनर्वसन' ही या परिषदेची मुख्य संकल्पना आहे. इलेक्ट्रोथेरपीतील आधुनिक उपचारतंत्रांचा प्रभावी वापर, वैज्ञानिक संशोधनाला चालना आणि रुग्णांच्या पुनर्वसन प्रक्रियेत प्रगत तंत्रज्ञानाचा समावेश यांवर परिषदेत विशेष भर दिला जाणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक वैद्यकीय उपकरणे आणि वैज्ञानिक पुराव्यांवर आधारित उपचारपद्धती यांच्या साहाय्याने फिजिओथेरपी क्षेत्रात निर्माण होणाऱ्या नव्या संधींवरही या परिषदेत चर्चा होणार आहे.

परिषदेच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून दि. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत विशेष प्रात्यक्षिक कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये लम्बर स्पाइनशी संबंधित हालचालींचे विकार व त्यावरील उपचार, इलेक्ट्रो डायग्नोसिस, कार्डियो पल्मोनरी फिजिओथेरपी मधील पुराव्यांवर आधारित तंत्रे, ड्राय नीडलींग, रिपिटेटिव्ह नर्व्ह स्टिम्युलेशन (ठ्छड), ब्लिंक रिफ्लेक्स तसेच पेल्विक फ्लोअर पुनर्वसनासाठी केगल चेअरचा वापर अशा विषयांचा समावेश आहे. स्पाइनल बायोमेकॅनिकल डिसफंक्शनचे मूल्यांकन आणि उपचार यांबाबतही प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या कार्यशाळांमुळे विद्यार्थी आणि व्यावसायिक फिजिओथेरपिस्ट यांना प्रत्यक्ष प्रशिक्षणाद्वारे आपली कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळणार आहे.

परिषदेच्या पहिल्या दिवशी, दि. २४ ऑक्टोबर रोजी इलेक्ट्रोथेरपीतील क्लिनिकल निर्णयप्रक्रिया, जागतिक उपचार मार्गदर्शक तत्त्वे, मस्क्युलोस्केलेटल विकारांवरील हाय इंटेन्सिटी लेझर थेरपी आणि इलेक्ट्रोथेरपी क्षेत्रातील भविष्यातील संशोधनाची प्राधान्ये या विषयांवर विविध सत्रे आयोजित करण्यात येणार आहेत. उद्घाटन समारंभ, मान्यवरांची भाषणे आणि पुरस्कार वितरण हे कार्यक्रमही होणार आहेत. यानंतर तज्ज्ञांच्या सहभागातून चर्चासत्रे, परिसंवाद आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी, दि. २५ ऑक्टोबर रोजी दीर्घकालीन वेदनांचे व्यवस्थापन, वेदनांविषयी न्यूरोसायन्सवर आधारित शिक्षण, मज्जासंस्थेच्या पुनर्वसनातील सुपर इंडक्टिव्ह थेरपीचा वापर, बालकांच्या पुनर्वसनातील इलेक्ट्रोथेरपीमधील प्रगती आणि एक्स्ट्राकॉर्पोरियल शॉक वेव्ह थेरपीतील आधुनिक तंत्रे या विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. बायोइलेक्ट्रिकल फिटनेस, उपचारांच्या नवीन पद्धती आणि त्यामागील वैज्ञानिक पुरावे यांचाही आढावा घेतला जाणार आहे.

या परिषदेत डॉ. प्रासेर्ट सकुलश्रीप्रासेर्ट, डॉ. आशिष कक्कड, डॉ. विनोता देशपांडे, डॉ. प्रशांत व्ही. मंगल आणि डॉ. दीपेन पटेल यांच्यासह विविध विषयांतील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ सहभागी होणार आहेत. तसेच डॉ. रिंकल मलानी, डॉ. सुरेशकुमार, डॉ. स्नेहा कटके, डॉ. सुरेंद्र वाणी, डॉ. ब्रिजेश आचार्य आणि अन्य तज्ज्ञांच्या सहभागातून विविध विषयांवरील सत्रे व चर्चासत्रे आयोजित करण्यात आली आहेत.

पदव्युत्तर विद्यार्थी, संशोधक आणि फिजिओथेरपिस्ट यांना वैज्ञानिक संशोधन सादर करण्याची संधीही या परिषदेत उपलब्ध करून देण्यात आली आहे. परिषदेदरम्यान प्रत्यक्ष उपस्थितीत वैज्ञानिक शोधनिबंधांचे सादरीकरण, संशोधनविषयक चर्चा आणि परिसंवाद आयोजित करण्यात येणार आहेत. उत्कृष्ट संशोधन आणि प्रभावी सादरीकरण करणाऱ्या सहभागींचा विविध पुरस्कारांनी गौरव करण्यात येणार असून, समारोप समारंभात सहभागींचे प्रमाणपत्र वितरण करण्यात येणार आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat
https://epaper.dainiktarunbharat.com/

शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६

१०

संक्षिप्त...

दुचाकी घसरून पडल्याने तरुणाचा मृत्यू



तभा वृत्तसेवा

जळकोट दि. २२ ऑक्टोबर : पाटोदा ते कोळनूर राष्ट्रीय महामार्गावर दुचाकी घसरून पडल्याने कोळनूर येथील २३ वर्षीय युवकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. गोविंद संभाजी पांचाळ (वय २३, रा. कोळनूर, ता. जळकोट, जि. लातूर) असे मृत युवकाचे नाव आहे.

पाटोदा ते कोळनूर दरम्यान आपल्या दुचाकीने प्रवास करीत असताना राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० वर दुचाकी स्लीप होऊन, सदरील युवक गंभीर जखमी झाला होता. त्यास उपचार करण्यासाठी उदगीर येथे घेऊन जात असताना वाटेतच त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी जळकोट पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यू क्रमांक ४१/२०२६ अन्वये भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९४ नुसार २१ ऑक्टोबर २०२६ रोजी नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक श्रीराम माचेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अंमलदार वाघमारे हे करीत आहेत.

औसा बाजार समितीत शेतमाल तारण योजनेचा शुभारंभ शेतकऱ्यांकडून उत्फुर्त प्रतिसाद

शेतमाल तारण योजनेचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा –सभापती चंद्रशेखर सोनवणे

शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळावे.यासाठी कमी व्याजदरात, कमी कागदपत्रांवर अल्पावधीत कर्ज मिळते. यामुळे शेतकऱ्यांना बाजारातील भावाचा चांगला फायदा होतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतमाल तारण योजनेचा लाभ घ्यावा.असे आवाहन सभापती चंद्रशेखर सोनवणे यांनी केले आहे.

तभा वृत्तसेवा

औसा दि.२२ ऑक्टोबर : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे व ओसा कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने शेतमाल तारण योजनेचा शुभारंभ करण्यात आला.या योजनेअंतर्गत कमी कालावधीत,कमी व्याजदरात आणि तात्काळ कर्ज उपलब्ध होत असल्याने शेतकऱ्यांकडून शेतमाल तारण योजनेला उत्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

शेतमाल बाजारपेठेतील दररोज होणाऱ्या दराच्या चढउतारात शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होवू नये. शेतकऱ्यांचा शेतीमाल चांगल्या भावात विकून शेतकऱ्यांच्या हातात अधिकचे चार पैसे यावेत. यासाठी औसा कृषी उत्पन्न बाजार समितीने पुढाकार घेऊन आ. अभिमन्यू पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शेतमाल तारण योजना सुरू केली आहे. या योजने अंतर्गत सुरू करण्यात आलेल्या शेतमाल तारण योजनेत सोयाबीन,तूर,मुग, उडीद ,करडी, सुर्यफुल, ज्वारी, बाजरी, मका, गहू, हरभरा, हळद या शेतमालाचा यावर्षी समावेश करण्यात आला आहे.या वर्षीच्या तारण कर्जासाठी चालू वर्षाचा सातबारा उतारा पीक पाहणी नोदीसह, आधार कार्ड व बँक पासबुक चे झेरॉक्स प्रतीची पुर्तता करावी लागणार आहे.



आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पूर्तता शेतकऱ्यांनी केल्यानंतर चालू बाजार भावाच्या ७० टक्के रक्कम सहा महिन्यांच्या मुदतीसाठी अत्यल्प दरात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून वखार पावतीवर तारण कर्ज तात्काळ उपलब्ध करून देण्यात येणार आहे.यापुर्वी या योजनेतून बाजार भावातील चढ्या दराचा फायदा अनेक शेतकऱ्यांना मिळाला आहे.त्यामुळे शेतकऱ्यांचा चांगला फायदा झाला होता.यावर्षीही या योजनेचा फायदा शेतकऱ्यांना मिळावा.यासाठी औसा बाजार समितीने पुढाकार घेऊन शेतमाल तारण योजनेचा शुभारंभ करण्यात आला. या योजनेतून १९ शेतकऱ्यांना ३२ लाख २८हजार८७३ रूपयांचे वाटप कागदपत्रांच्या पुर्ततेनंतर एक दिवसात करण्यात आले आहे.

यावेळी सभापती चंद्रशेखर सोनवणे, उपसभापती प्रा. भिमाशंकर राचट्टे, सचिव संतोष हुच्चे, संचालक प्रवीण कोपरकर, संदीपान लंगर, युवराज बिराजदार, प्रकाश काकडे, अजित धुमाळ,चंद्रकला झिरमिरे, संतोषी वीर, विकास नरहरे ,ईश्वर कुलकर्णी, राधाकृष्ण जाधव, रमाकांत वळके,मोहन कांबळे, गोविंद भोसले, सुरेश ओटी, धनराज जाधव, शंकर पुंड, संतोष सोमवंशी शेतकरी उपस्थित होते.

उदयगिरीत विद्यार्थी कल्याण मंडळ उद्घाटन व गुणवंतांचा सत्कार

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २२ ऑक्टोबर : तेभा वृत्तसेवा येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात विद्यार्थी कल्याण मंडळाचे उद्घाटन व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला, अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर होते तर उद्घाटक म्हणून उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे उपस्थित होते, मंचावर संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. प्रकाश तोंडारे, सहसचिव प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष माधवराव नोबदे, सदस्य इंजि. मन्मथ बिरादार, श्रीमती भाग्यश्री चाकूरकर, प्रा. आडेप्पा अंजुरे, शिवराज वल्लापुरे, भीमाशंकर मुद्दा, प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, उपप्राचार्य डॉ. एस.एन. हल्लाळे, उपप्राचार्य टी.एन. सगर, पर्यवेक्षक प्रा. एस. व्ही. मुडपे व विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रभारी प्रा. डॉ. एस. एन. लांडगे यांची उपस्थिती होती. विविध मान्यवरांनी ठेवलेल्या पारितोषिकांचे वितरण बारावी, पदवी व पदव्युत्तर गुणवंत विद्यार्थ्यांना करण्यात आले,

अन्वेषण संशोधन स्पर्धेत शिवलिंगेश्वर फार्मसीचे घवघवीत यश

तभा वृत्तसेवा

औसा दि.२२ ऑक्टोबर : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील स्कुल ऑफ फार्मसी येथे आयोजित अन्वेषण संशोधन स्पर्धेत औसा तालुक्यातील आलमला येथील शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत विविध विभागांमध्ये घवघवीत यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीला आणि मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाला मिळालेले यश महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे.

कृषी आणि संबंधित विज्ञान विशाल वाडेकर द्वितीय, व्ही. एम. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोटिक्स रुद्रेश धाराशिवे तृतीय, मार्गदर्शक एस. एस.वागदरे,सामाजिक शास्त्रे, मानविकी, वाणिज्य आणि कायदा शिवप्रसाद राजनाळे प्रथम उत्तेजनार्थ पारितोषिक, मार्गदर्शक: डॉ. व्ही. एम.धाराशिवे, आंतरविद्याशाखीय विज्ञान : गायत्री वाघमारे प्रथम मार्गदर्शक: डॉ. एस. एस.कुलकर्णी, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान : गौतम दुर्गम - द्वितीय, मार्गदर्शक: डॉ. ए. बी.गिरी



या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व विजेते विद्यार्थी, संशोधन मार्गदर्शक प्राध्यापकांचे संस्थेचे अध्यक्ष शिवचरण धाराशिवे, उपाध्यक्ष प्रभाकर कापसे, सचिव बसवेश्वर धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, प्राचार्य डॉ. विश्वेश्वर धाराशिवे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचायांनी अभिनंदन केले आहे.

लालबहादूर शास्त्री विद्यालयात दुर्गादेवी विसर्जनानिमित्त निर्माल्य संकलन उपक्रम



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २२ ऑक्टोबर : भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त येथील लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात शारदीय नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दुर्गादेवी विसर्जनानिमित्त निर्माल्य संकलन उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमाचा प्रारंभ मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे उपमुख्याध्यापक वसंत वाघमारे पर्यवेक्षक किरण नेमट कृष्णा मारावार तानाजी खोकले, माधव मठवाले, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख लक्ष्मी चव्हाण, सहप्रमुख निलेश मांडवकर, उपक्रमप्रमुख संदीप बोधनकर आणि सुरेखा शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी श्री दुर्गादेवीच्या पूजेसाठी वाहिलेली फुले, पाने, बेलपत्र, फुलांचे हार, रुईची पाने व फुले तसेच इतर पवित्र वनस्पतींचे निर्माल्य संकलित केले.निर्माल्याची योग्य विल्हेवाट लावून पर्यावरणाचे संरक्षण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश

या उपक्रमात शोभा नेत्रगावकर, अंबिका पारसेवार, सुप्रिया बुधे, छाया दिक्कतवार, पंकज देशमुख, सुहास कांबळे, अक्षय शिवशट्टे तसेच विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

साईं नंदनवनम् येथे विजयादशमी निमित्त ब्रम्होत्सव भक्तीमय वातावरणात साजरा!

तभा वृत्तसेवा

चाकूर दि. २२ ऑक्टोबर : चाकूर येथील सुप्रसिद्ध साईंनंदनवनम् येथे विजयादशमी व ब्रम्होत्सव निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम भक्तीमय वातावरणात संपन्न झाले.पहाटे येथील तिरुपति बालाजी मंदिरात यजमान सतीश मद्रेवार यांनी सहकुटुंब पहाटे पाच वाजता गणपति व अंबाबाईची पूजा व नवग्रह पूजा करण्यात आली.सकाळी सहा वाजता कुलदेवता व वास्तु कलश पूजा, महादेव पूजा व श्री.बालाजीचा अभिषेक व पूजा केली.



सकाळी नऊ वाजता महायज्ञ व महाआरती करण्यात आली. सायंकाळी साडे पाच वाजता ब्रम्हमुहूर्तावर तिरुपति बालाजी उत्सवमूर्तीची पालखी शोभा यात्रा काढण्यात आली यावेळी चाकूर परिसरातील हजारों भाविक पालिखी सोहळ्याला उपस्थित होते तसेच चापोली व चाकूर येथील महिला भजनी मंडळ व बाल वारकरी यांनी या शोभा यात्रेत भाग घेतला होता.अत्यंत उत्साहामधे संगीताच्या सानिध्यात, टाळाच्या गजरात ही लक्षवेधी पालखीयात्रा संपन्न झाली. यानंतर पालखीची आरती करण्यात आली व सर्व भावीकांना प्रसाद वाटप करण्यात आला. यानंतर विधिवत आपटा पूजन व सिमोल्लघन करण्यात आले यात शस्त्रपूजन व अश्वपूजन करुन भाविकानी एकमेकासोबत सोने लुटन्याचा कार्यक्रम पार पड़ला. सर्व मंदिरांमध्ये फुलांची सजावट करण्यात आली होती.

यावेळी संस्थानचे अध्यक्ष उत्तमराव जाधव, सचिव विशाल जाधव, सहसचिव अमोल जाधव ,उत्तमराव देशमुख, शिवाजीराव देशमुख,हंसराज जाधव, धनंजय शेळके, मधुकर जाधव, तातेराव शिंदे,अ. ना. शिंदे, बाळासाहेब पाटिल, दिलीप भदाडे, अमोल पवार, महेश चेऊलवार, राम जाधव सह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

थेरगावात भाजप कार्यकर्त्यांचा जल्लोष; महादेव मंदिर परिसरात फटाके फोडुन आनंदोत्सव



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि.२२ ऑक्टोबर : दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर निलंगा, शिरूर अनंतपाळ, देवणी विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी आपले बारा महिन्यांचे संपूर्ण मानधन दुष्काळ निवारणासाठी शासनाला देण्याचा मोठ्या मनाचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या या निर्णयाचे स्वागत करण्यासाठी शिरूर अनंतपाळ तालुक्यातील थेरगाव येथे भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.

थेरगाव येथील ग्रामदैवत श्री महादेव सिद्धेश्वर मंदिर परिसरात भाजप कार्यकर्त्यांनी एकत्र येत फटाके वाजवून आणि पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला.

यावेळी बोलताना कार्यकर्त्यांनी सांगितले की, आमदार संभाजी पाटील निलंगेकर हे नेहमीच संकट काळात जनतेच्या पाठीशी उभे राहिले आहेत. सध्या संपूर्ण मतदारसंघात भीषण दुष्काळ आहे. शेतकरी अडचणीत आहे. अशा वेळी स्वतःचे एक वर्षाचे मानधन शासनाला देऊन त्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी मदतीचा हात पुढे केला आहे. हा आदर्श सर्व लोकप्रतिनिधींनी घ्यावा.

आमदार निलंगेकर यांच्या या निर्णयामुळे संपूर्ण मतदारसंघात त्यांचे कौतुक होत आहे.

श्यामार्य कन्या विद्यालयात पाचवी व सहावीचा पालक मेळावा उत्साहात संपन्न

विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, पालकांचे अभिप्राय आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यांवर भर

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २२ ऑक्टोबर : श्यामार्य कन्या विद्यालय, उदगीर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ अंतर्गत इयत्ता पाचवी व सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी पालक मेळाव्याचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या मेळाव्यात विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, अध्ययनातील अडचणी, शाळेतील शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि पालक-शिक्षक समन्वय या महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यात आली.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ड. सुपोषपाणी आर्य होते. प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेच्या सहसचिव सौ. अंजुमणीताई आर्य व शालेय समिती सदस्या सौ. रेणुका चटनाळे उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या संयोजिका मुख्याध्यापिका सौ. संगीता देशमुख, पर्यवेक्षक लिमये तसेच पालक व शिक्षकवृंद उपस्थित होते.

पालक मेळाव्यात विद्यार्थ्यांना आपले विचार व्यक्त करण्याची संधी देण्यात आली. यावेळी प्राप्ती शिंदे, कार्तिकी बिरादार या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी शाळेतील शैक्षणिक वातावरण, शिक्षकांचे मार्गदर्शन, अभ्यासातील अनुभव आणि शालेय उपक्रमांविषयी आपले विचार मांडले. विद्यार्थ्यांच्या मनोगतातून त्यांचा आत्मविश्वास, शाळेविषयीची आत्मीयता आणि शिक्षणाविषयीची सकारात्मक भूमिका दिसून आली.

महादेव पाटील, आरिफ पटेल, प्रिया बावगे, स्वामी, नोबादे, लक्ष्मी शिंदे व बिरादार या पालकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबद्दल तसेच शाळेतील अध्यापन पद्धती, शिक्षकांचे मार्गदर्शन, शिस्त आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. पालकांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी शाळा आणि पालक यांच्यात सातत्यपूर्ण संवाद असणे आवश्यक असल्याचे मत मांडले. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शाळेकडून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांबद्दल समाधान व्यक्त केले.

श्रीमती संगीता सुतार यांनी शिक्षक मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी नियमित अभ्यास, गृहपाठाची पूर्तता, वाचनाची सवय, वेळेचे नियोजन आणि पालकांचे सहकार्य यांचे महत्त्व विशद केले. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शिक्षक व पालकांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

मुख्याध्यापिका सौ. संगीता देशमुख यांनी पालकांच्या विविध प्रश्नांचे निरसन करून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, अभ्यासातील अडचणी दूर करणे, नियमित उपस्थिती, अभ्यासाच्या सवयी विकसित करणे आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी पालकांनी घ्यावयाची काळजी याविषयी मार्गदर्शन केले.

स्पर्धेच्या युगात केवळ परीक्षेतील गुण मिळविणे पुरेसे नाही. विद्यार्थ्यांमध्ये वाचन, लेखन, गणितीय विचार, संभाषण कौशल्य, सर्जनशीलता आणि समस्या सोडविण्याची क्षमता विकसित होणे गरजेचे आहे.शाळा आणि घर हे विद्यार्थ्यांच्या जडणघडणीचे दोन महत्त्वाचे आधारस्तंभ असून, दोन्ही ठिकाणी विद्यार्थ्यांना योग्य वातावरण व प्रोत्साहन मिळाल्यास त्यांची प्रगती अधिक प्रभावीपणे होऊ शकते, पालकांनी विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे नियमित लक्ष देऊन शिक्षकांशी संपर्कात राहावे, असे आवाहन अध्यक्षीय समारोपात संस्था अध्यक्ष सुपोषपाणि आर्य यांनी मनोगत व्यक्त केले.

दर सोमवारी करणार मोफत रुग्ण तपासणी



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २२ ऑक्टोबर : तालुक्यात दुष्काळाची तीव्रता वाढत असताना सर्वसामान्य नागरिकांसह गोरगरीब कुटुंबांनाही आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत शिरूर अनंतपाळ येथील डॉक्टर दांपत्याने रुग्णसेवेचा संवेदनशील उपक्रम हाती घेतला आहे. डॉक्टर वैभव विलास हसबे आणि डॉक्टर विजया वैभव हसबे यांनी आपल्या सरस्वती हॉस्पिटलमध्ये दर सोमवारी रुग्णांची मोफत तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या या उपक्रमाचे शिरूर अनंतपाळ तालुक्यात कौतुक होत आहे

आंबेगाव (मसलगा) येथे सोयाबीनच्या गंजीला आग; ६० कट्टे जळून खाक

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २२ ऑक्टोबर : तालुक्यातील आंबेगाव (मसलगा) येथे शेतात साठवून ठेवलेल्या सोयाबीनच्या गंजीला अज्ञात व्यक्तीने आग लावल्याची घटना बुधवार, दि. २१ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास घडली. या आगीत शेतकऱ्यांचे अंदाजे ६० कट्टे सोयाबीन जळून खाक झाले असून, निलंगा नगरपालिकेच्या अग्निशमन दलाने वेळेवर घटनास्थळी धाव घेतल्याने आणखी २० कट्टे सोयाबीन वाचविण्यात यश आले.



मिळालेल्या माहितीनुसार, आंबेगाव (मसलगा) येथील गट क्रमांक २४ मध्ये बालाजी विनायक भालके आणि कमलाकर विनायक भालके यांची गावालगत शेती आहे. या शेतात काढणी केलेले सोयाबीन एका ठिकाणी ठेवले होते. बुधवारी रात्री सुमारे ९ वाजता या सोयाबीनच्या गंजीला अचानक आग लागली. अज्ञात व्यक्तीने आग लावल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केल्याने शेतातील सोयाबीन जळू लागले. ही घटना लक्षात येताच परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच निलंगा अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्परतेने घटनास्थळी पोहोचून आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे अंदाजे २० कट्टे सोयाबीन वाचविण्यात यश आले; मात्र अंदाजे ६० कट्टे सोयाबीन आगीत जळून नुकसान झाले.

आधीच विविध नैसर्गिक संकटांमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत असताना, अशा प्रकारे सोयाबीन जळून गेल्याने संबंधित शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या घटनेमागील नेमके कारण स्पष्ट झाले नसून, आग लावण्याचे कृत्य कोणी केले, याचा तपास करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी होत आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

CMYK

धाराशिव
जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

शेतीच्या वादातून धारदार शस्त्राने वार; नळवाडीत एकाचा खून

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -

उमरगा तालुक्यातील नळवाडी (दावलम लिकवाडी) येथे शेतीच्या वादातून भारत गजेंद्र कवठे (वय ४७) यांचा धारदार शस्त्राने वार करून खून केल्याची घटना घडली.

याप्रकरणी शंकर विलास कवठे (रा. नळवाडी) यांच्याविरुद्ध मुरूम पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. ही घटना २० ऑक्टोबर रोजी रात्री ८.३० ते ९.३० वाजण्याच्या दरम्यान नळवाडी गावातील सुपतगाव रस्त्यावर घडली.



शेतीच्या वादातून आरोपीने भारत कवठे यांच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

याप्रकरणी मयताची पत्नी सखुबाई भारत कवठे (वय ४०) यांनी २१ ऑक्टोबर रोजी दिलेल्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आक्याचा आशीर्वाद, बोक्याची साथ अन् वाघाची शिकार!

वाशीतील पवनचक्कीच्या कामांवरून राजकीय वर्तुळात चर्चा; स्थानिक ठेकेदारांच्या वाट्याला काय?



कामवाटपाचा तपशील जाहीर होणार का?

पवनचक्की प्रकल्पांची कामे कोणत्या प्रक्रियेद्वारे देण्यात आली, कोणत्या कंपनीला कोणती कामे मिळाली आणि स्थानिक ठेकेदारांना किती संधी उपलब्ध झाली, याची माहिती समोर आल्यास या चर्चेतील वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकते. संबंधित कंपनी आणि जबाबदार यंत्रणांकडून पारदर्शक माहिती मिळाल्यास स्थानिकांच्या प्रश्नांनाही उत्तरे मिळतील.

स्थानिकांना संधी की बाहेरील कंपन्यांना प्राधान्य?

पवनचक्की प्रकल्पांशी संबंधित कामांमधून वाहतूक, साहित्यपुरवठा, यंत्रसामग्री आणि अन्य पूरक व्यवसायांना चालना मिळू शकते. त्यामुळे स्थानिकांना किती कामे मिळाली, बाहेरील कंपन्यांना कामे देताना स्थानिक ठेकेदारांना सहभागी करून घेतले का आणि कामवाटपाचे निकष काय होते, याबाबत स्पष्टता येणे आवश्यक आहे.

सुधीर घोलप
वाशी, दि.२२ ऑक्टोबर -

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात पवनचक्की प्रकल्पांच्या कामांच्या वाटपावरून राजकीय वर्तुळासह ठेकेदारांमध्ये चर्चेला उधाण आले आहे. 'राजकीय आका', 'साताऱ्याचा वाघ', 'कंपनीचा बोका' आणि 'पवनचक्कीच्या कामांची शेळी' अशा उपरोधिक शब्दांत या प्रकरणाची चर्चा रंगत असून, या कथित राजकीय समीकरणाम ागील वास्तव काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

धाराशिव जिल्ह्यात पवनऊर्जा प्रकल्पांची कामे सुरू असताना, या प्रकल्पांमधून स्थानिक ठेकेदार, व्यावसायिक आणि तरुणांना रोजगाराच्या संधी मिळतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र, वाशी तालुक्यातील काही कामे सातारा जिल्ह्यातील कंपनीला मिळाल्याची चर्चा पुढे आल्याने स्थानिक ठेकेदारांमध्ये प्रश्न उपस्थित होत आहेत.

या प्रकरणाच्या चर्चेत राजकीय पाठबळ आणि कंपनीच्या भूमिकेबाबतही तर्कवितर्क लढवले जात आहेत. मात्र, संबंधित व्यक्ती किंवा कंपनीबाबत करण्यात येणाऱ्या दाव्यांना अधिकृत दुजोरा उपलब्ध नसल्याने त्यांची सत्यता पडताळणे महत्त्वाचे आहे. म ोठ्या आर्थिक व्यवहारांबाबतही चर्चा होत असली, तरी ठोस पुराव्यांशिवाय त्यावर निष्कर्ष काढता येणार नाही.

'आक्याचा आशीर्वाद, बोक्याची साथ अन् वाघाची शिकार' या उपरोधिक चर्चेत खरी 'शेळी' म्हणजे पवनचक्कीची कामे असल्याची टिप्पणी केली जात आहे. मात्र, या साऱ्या चर्चेत स्थानिक ठेकेदारांच्या वाट्याला नेमके काय आले आणि रोजगाराच्या अपेक्षेने पाहणाऱ्या तरुणांना किती संधी मिळाल्या, हा कळीचा मुद्दा आहे. त्यामुळे वाशी तालुक्यातील पवनचक्की प्रकल्पांच्या कामवाटपाचे वास्तव कधी समोर येणार, याकडे स्थानिक व्यावसायिक आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

मद्यधुंद अवस्थेत रिक्षा चालविणाऱ्यावर गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -

मद्यधुंद अवस्थेत रिक्षा चालवून मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी प्रदीप प्रभाकर भिसे (वय २७, रा. अण्णाभाऊ साठे नगर, काक्रंबा, ता. तुळजापूर) याच्याविरुद्ध तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास आरोपी इंजिनिअरिंग कॉलेज रोडवरील पार्किंग पॉइंटजवळ रिक्षा (क्र. एमएच २५ एके ०७५) मद्यधुंद अवस्थेत चालवत असल्याचे आढळले.

याप्रकरणी मोटार वाहन कायद्याच्या कलम १८५ नुसार पोलिसांनी सरकारतर्फे फिर्याद दाखल करून गुन्हा नोंदवला आहे. याप्रकरणी अधिकचा तपास पोलीस करीत आहेत.

नळदुर्गमध्ये सोमवारपासून अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.२२ ऑक्टोबर -

येथील व्यासनगरमध्ये वै. गुरुवर्य तात्यासाहेब वासकर म हाराज, श्री सद्गुरू शिवरामबुवा दिंडेगावकर आणि वै. हभप. म रुती महाराज कानेगावकर यांच्या कृपाशीर्वादाने २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत ४७ व्या श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यासह अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम, प्रवचन, कीर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताहादरम्यान दररोज पहाटे ४ ते ६ या वेळेत काकडा आरती, सकाळी ज्ञानेश्वरी वाचन, दुपारी गाथा भजन व महिला भजन, सायंकाळी प्रवचन, नामजप आणि हरिपाठ, रात्री कीर्तन तसेच म ध्यरात्रीपासून पहाटे ४ वाजेपर्यंत हरिजागर असे कार्यक्रम होणार आहेत. कै. सरडे गुरुजी यांच्या प्रेरणेने हभप. चंद्रकांत कदम यांचे ज्ञानेश्वरी अधिष्ठान राहणार आहे.

या सप्ताहात ह.भ.प. बली बागल महाराज, संजय पवार महाराज, तात्या महाराज सलगरा, कृष्णा जाधव आणि राजू पाटील वागदरी यांची प्रवचने होणार आहेत. तसेच हभप. महेश म हाराज माकणीकर, विश्वनाथ गर्जे महाराज, प्रल्हाद सरडे महाराज, लक्ष्मण महाराज, गुरुवर्य विठ्ठल वासकर महाराज आणि राम गायकवाड महाराज यांची कीर्तने होणार आहेत.

शनिवार, ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता दीपोत्सव होईल. रविवारी, १ नोव्हेंबर रोजी हभप. श्रीहरी ढेरे महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार असून, गुरुवर्य श्री अप्पासाहेब महाराज दिंडेगावकर यांच्या हस्ते कालावाटप करण्यात येणार आहे.

तुळजापूरच्या सिद्धार्थ शिंगाडेला राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय ललित कला पुरस्कार!

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.२२ ऑक्टोबर -

तुळजापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी कामगिरी माजी विद्यार्थी सिद्धार्थ शहाजीराव शिंगाडे याने केली आहे. भारत सरकारच्या ललित कला अकादमीच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा राष्ट्रीय ललित कला पुरस्कार त्याला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सिद्धार्थ याच्या 'वृक्ष' या कलाकृतीची या पुरस्कारासाठी निवड झाली असून, त्याच्या यशामुळे तुळजापूरच्या कलाक्षेत्राचा गौरव वाढला आहे.



दिल्ली येथील डॉ. आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्र, १५ जनपथ येथे पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. यावेळी केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्र सिंह शेखावत, सांस्कृतिक विभागाचे सचिव विवेक अग्रवाल आणि सहसचिव के. के. मिश्रा उपस्थित होते.

ललित कला अकादमीच्या ६५ व्या राष्ट्रीय कला प्रदर्शनासाठी देशभरातील २,४९५ कलाकारांकडून एकूण ६,१७५ कलाकृती प्राप्त झाल्या होत्या. त्यापैकी २७० कलाकृतींची प्रदर्शनासाठी निवड करण्यात आली, तर केवळ २० कलाकृतींना पुरस्कारासाठी निवडण्यात आले. या निवडक कलाकृतींमध्ये सिद्धार्थ शिंगाडे याच्या 'वृक्ष' या कलाकृतीचा समावेश झाला.

या राष्ट्रीय पुरस्काराचे स्वरूप दोन लाख रुपये रोख, मानचिन्ह आणि प्रम ाणपत्र असे आहे.

नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रमांक २ चा माजी विद्यार्थी असलेल्या सिद्धार्थने आपल्या कलाकृतीच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावर यश मिळवले आहे. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तुळजापूर परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, सर्व स्तरांतून त्याचे कौतुक केले जात आहे.

दुष्काळ निवारणासाठी गावागावांत नोडल अधिकारी; जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -

जिल्ह्यातील आठही तालुक्यांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने जिल्हा प्रशासनाने निवारणासाठी १८ कलमी कृती आराखडा तयार केला आहे. प्रत्येक गावात नोडल अधिकारी नियुक्त करून पाणीटंचाई, चाराटंचाई, पीक नुकसानीचे पंचनामे आणि रोजगाराच्या प्रश्नांवर लक्ष ठेवले जाणार आहे.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी २१ ऑक्टोबर रोजी यासंदर्भात सुधारित आदेश जारी केले.

दुष्काळ निवारणासाठी प्रशासन क्शन मोडवर

प्रत्येक तालुक्यात २४ तास कार्यरत दुष्काळ नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येणार असून, शेतकऱ्यांना अनुदान मिळण्यात विलंब होऊ नये, यासाठी संबंधित विभागांना निर्देश देण्यात आले आहेत. जम ीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, कृषिपंपांच्या वीजबिलात ३३.५ टक्क्यांपर्यंत सवलत आणि रोजगार हमीच्या कामांना प्राधान्य दिले जाणार आहे.

तालुकास्तरीय नोडल अधिकाऱ्यांनी दर सोमवारी आढावा बैठकीत उपस्थित राहून दर शुक्रवारी दुष्काळस्थितीचा अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. उपाययोजनांम ध्ये हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाच्या कारवाईचा इशाराही जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे.

स्केटिंग स्पर्धेत ओवी आणि रुद्राक्ष बडवे यांचे यश; विभागीय स्पर्धेसाठी निवड!



तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.२२ ऑक्टोबर -

स्वामी विवेकानंद प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनी ओवी अमोल बडवे (इयत्ता चौथी) आणि रुद्राक्ष अमोल बडवे (इयत्ता तिसरी) यांनी स्केटिंग स्पर्धेत जिल्हास्तरावर यश संपादन करत विभागीय स्पर्धेसाठी निवड होण्याचा मान मिळवला आहे. त्यांच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, दोन्ही बालखेळाडूंचे सर्वत्र कौतुक होत आहे.

जिल्हास्तरीय स्केटिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ओवी आणि रुद्राक्ष यांच्या यशाबद्दल स्वामी विवेकानंद प्राथमिक शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती लोहार, क्रीडाप्रमुख गोपाळ आष्टे तसेच सर्व शिक्षकांच्या उपस्थितीत या दोन्ही विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. लहान वयातच क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरणाऱ्या ओवी आणि रुद्राक्ष यांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर हे यश मि ळवले आहे. त्यांच्या या यशामुळे शाळेतील इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात प्रगती करण्याची प्रेरणा मिळणार आहे.

या यशाबद्दल शाळेतील शिक्षक, पालक आणि परिसरातील नागरिकांकडून दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, आगामी विभागीय स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत.

शेतातून १ लाख ५ हजारांचे सोयाबीन चोरीला

वाशी, दि.२२ ऑक्टोबर -

पारगाव शिवारातील शेतातून १५ क्विंटल सोयाबीन चोरीला गेल्याची घटना १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सातच्या सुम ारास घडली. चोरीला गेलेल्या सोयाबीनची किंमत १ लाख ५ हजार रुपये आहे.

याप्रकरणी सरिता सुनील आटुळे (वय ३२, रा. लांजेश्वर, ता. भूम, जि. धाराशिव) यांनी वाशी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या पारगाव शिवारातील गट क्रमांक १४२ मधील शेतातून प्रदीप नारायण कोकणे आणि प्रतीक प्रदीप कोकणे (रा. पारगाव, ता. वाशी) यांनी सोयाबीन चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. या फिर्यादीवरून वाशी पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास वाशी पोलीस करीत आहेत.

१३ कोटींची पाणीपुरवठा योजना रखडली; तेरखेडेकरांची तहान कधी भागणार?

पाण्याची टाकी उभी, पाइपलाइन अपूर्ण; प्रशासनाने कामपूर्तीची मुदत जाहीर करण्याची मागणी...

तभा वृत्तसेवा
तेरखेडा, दि.२२ ऑक्टोबर -

वाशी तालुक्यातील तेरखेडा गावासाठी राबविण्यात येत असलेल्या सुमारे १३ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेचे काम अपूर्ण असल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

पाण्याची टाकी उभी राहिली; मात्र पाइपलाइनची कामे अपूर्ण असल्याने घराघरांत नळाद्वारे पाणी पोहोचणार कधी, असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

गावाचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी मोठ्या निधीतून योजना हाती घेण्यात आली. मात्र, योजनेचे काम अद्याप पूर्ण झाले नसल्याने प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू होण्याची प्रतीक्षा कायम आहे. केवळ पाण्याची टाकी उभारून उपयोग नसून, पाइपलाइनसह संपूर्ण यंत्रणा कार्यान्वित होणे आवश्यक आहे. मग योजनेच्या कामाला विलंब का होत आहे, असा प्रश्न ग्राम स्थ विचारत आहेत. विद्यमान ठेकेदाराकडून निर्धारित वेळेत काम पूर्ण होणार नसेल, तर नियमानुसार पर्यायी व्यवस्था करून उर्वरित कामे तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणीही ग्रामस्थांकडून होत आहे.

कामपूर्तीची निश्चित मुदत जाहीर करा!

योजनेची सद्यस्थिती, आतापर्यंत झालेला खर्च, शिल्लक कामे आणि काम पूर्ण करण्याची निश्चित मुदत याबाबत संबंधित विभागाने अधिकृत माहिती द्यावी, अशी मागणी होत आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून कामातील अडथळे दूर करावेत आणि पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी ठोस कालमर्यादा निश्चित करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



सुमारे १३ कोटी रुपयांची योजना असूनही तेरखेडेकरांना पाण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत असेल, तर या विलंबाची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

आता प्रशासन या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन रखडलेली कामे पूर्ण करणार आणि तेरखेडेकरांना दिलासा देणार का, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.


तुळजाभवानीच्या पौर्णिमा यात्रेसाठी २३ ते २६ ऑक्टोबरदरम्यान वाहतूक मार्गांत बदल

धाराशिव-तुळजापूर, तुळजापूर-सोलापूरसह प्रमुख मार्गांवरील वाहनांना प्रवेशबंदी... पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन...

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -

श्री तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवातील कोजागिरी पौर्णिमा आणि मंदिर पौर्णिमेनिमित्त तुळजापूरकडे लाखो भाविक पायी येण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने वाहतूक मार्गांत बदल केले आहेत.

शुक्रवार, २३ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री १२.०१ वाजल्यापासून सोमवार, २६ ऑक्टोबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंत ठरावीक म ार्गांवर सर्व प्रकारच्या हलक्या व जड वाहनांना म नाई



अत्यावश्यक सेवांना सूट...

पोलीस, रुग्णवाहिका, अग्निशमन दल, अत्यावश्यक सेवांतील वाहने आणि एसटी बसेस यांना हे निर्बंध लागू राहणार नाहीत. पौर्णिमा यात्रेच्या काळात वाहनचालकांनी वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे आणि प्रवासाचे नियोजन करताना पर्यायी मार्गांचा विचार करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

करण्यात आली आहे जिल्हादंडाधिकारी कीर्ती किरण पुजार आणि पोलीस अधीक्षक रितू खोखर यांनी म हाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम ३३(१) (ब) अन्वये हे निर्देश जारी केले आहेत. भाविकांची सुरक्षितता, वाहतूक कोंडी टाळणे आणि अपघातांची शक्यता कमी करणे, हा या निर्णयामागील उद्देश आहे.



कोणत्या मार्गांवर निर्बंध?

धाराशिव-तुळजापूर-नळदुर्ग-उमरगा, धाराशिव-तुळजापूर-तामलवाडी-सोलापूर, औसा-तुळजापूर-तामलवाडी-सोलापूर तसेच तुळजापूर-ढेकरी-गौडगाव-बार्शी या मार्गांवरून जाणाऱ्या वाहतुकीला अधिसूचनेनुसार मनाई करण्यात आली आहे. हैदराबाद, छत्रपती संभाजीनगर, लातूर, सोलापूर, धाराशिव आणि बार्शी या शहरांदरम्यान प्रवास करणाऱ्या वाहनचालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा.

वाहनांसाठी पर्यायी मार्ग

- धाराशिव-हैदराबाद : धाराशिव-औसा-उमरगा-हैदराबाद.
- हैदराबाद-छत्रपती संभाजीनगर : उमरगा-औसा-लातूर-अंबाजोगाई-मांजरसुंबा-बीडमार्गे; पर्यायी मार्ग म्हणून मुरुड-ढोकी-येडशी-बीड.
- धाराशिव-सोलापूर : धाराशिव-वैराग-सोलापूर.
- लातूर-सोलापूर : मुरुड-ढोकी-येडशी-बार्शी-सोलापूर.
- छत्रपती संभाजीनगर-सोलापूर : येरमाळा-बार्शी-सोलापूर.
- तुळजापूर-सोलापूर : मंगरूळ पाटी-इटकळ-बोरामणी-सोलापूर.
- तुळजापूर-बार्शी : तुळजापूर-धाराशिव-बार्शी.

याच मार्गांचा उलट दिशेने प्रवास करणाऱ्या वाहनांसाठीही संबंधित पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे निर्देश आहेत.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

उसाला ५ हजार रुपये दर जाहीर केल्याशिवाय गाळप सुरू करू नका!



तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -

जिल्ह्यातील सर्व साखर व गूळ कारखान्यांनी चालू गळीत हंगामासाठी उसाचा दर प्रतिटन ५ हजार रुपये जाहीर केल्याशिवाय गाळप व ऊसतोड सुरू करू नये, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यापूर्वी संघटनेने आंदोलन केले होते. त्यानंतर प्रशासनाने कारखानदार व संघटनेची बैठक बोलावली; मात्र एकही कारखानदार उपस्थित राहिला नाही. या प्रकाराचा संघटनेने निषेध केला आहे. उसाचा दर जाहीर न करता गाळप सुरू करण्यास विरोध दर्शवत, मागणी मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष विष्णू काळे व मराठवाडा विभागाध्यक्ष रविंद्र इंगळे यांनी दिला.

निवेदनावर स्वाभिमानी पक्षाचे जिल्हाध्यक्ष तानाजी पाटील, धनाजी पेंदे, पंकेश पाटील, महादेव टेकाळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

संक्षिप्त वृत्त...



'अंकुर' दिवाळी अंकाचे डॉ. नयन राजमाने यांच्या हस्ते प्रकाशन

धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -

अक्षरवेल महिला साहित्य मंडळाच्या 'अंकुर' दिवाळी अंकाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. नयन राजमाने यांच्या हस्ते उत्साहात झाले. मंडळाच्या सातत्यपूर्ण साहित्यसेवेचे कौतुक करताना त्यांनी सलग २० वर्षे दिवाळी अंक प्रकाशित करणे ही उल्लेखनीय बाब असल्याचे सांगितले. यावेळी मंडळाच्या अध्यक्ष डॉ. सुलभाताई देशमुख, कार्यकारी संपादक कमलताई नलावडे, संस्थापक अध्यक्षा डॉ. रेखा ढगे, स्नेहलता अंदुरे, प्रेमाताई पाटील व कवयित्री सुनिता बोरगावकर उपस्थित होत्या. मान्यवरांनी मंडळाच्या साहित्यिक व सामाजिक उपक्रमांचा आढावा घेत तरुणींनीही साहित्य चळवळीत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. प्राची नाईकवाडी यांनी परिचय, शिवनंदा माळी यांनी आर्थिक अहवाल सादर केला. सूत्रसंचालन सुनीता गुंजाळ यांनी केले, तर जयश्री फुटाणे यांनी आभार मानले.



समाजकल्याण विभागातील कर्मचाऱ्यांना २५ हजार वेतन द्या!

धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -

धाराशिव जिल्ह्यातील समाजकल्याण विभागांतर्गत कार्यरत सफाईगार, शिपाई व माळी कर्मचाऱ्यांना किमान २५ हजार रुपये मासिक वेतन देण्यात यावे, अशी मागणी अखिल भारतीय श्रमिक महासंघाने केली आहे. महासंघाचे संस्थापक अध्यक्ष आनंद भालेराव यांच्या नेतृत्वाखाली समाजकल्याण अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. संबंधित कर्मचारी २०१३ पासून स्मार्ट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या माध्यमातून सेवा बजावत आहेत. सध्या मिळणारे सुमारे १२ हजार २०० रुपयांचे वेतन महागाईच्या तुलनेत अपुरे असल्याने कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. कोरोना काळातही कर्मचाऱ्यांनी सेवा बजावली असून, त्यांच्या योगदानाची दखल घेऊन वेतनवाढीचा प्रश्न तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर आनंद भालेराव, नंदकुमार मानाळे, पुष्पकांत माळाळे, हनुमंत तौर यांच्यासह अनेक कर्मचारी व पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त धाराशिवमध्ये भव्य धम्म रॅली

धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -

७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिन व सम्राट अशोक विजयादशमीनिमित्त धाराशिव शहरात भव्य धम्म रॅली काढण्यात आली. सजविलेल्या रथातून तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा ठेवून काढलेल्या या रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भीमनगर येथील क्रांती मोर्चा चौकातील क्रांती स्तंभ येथे प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आ. राणाजगजितसिंह पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, विविध पदाधिकारी, नगरसेवक उपस्थित होते. आयोजक नगरसेवक सिद्धार्थ बनसोडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी नियोजन केले. डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून रॅलीची सांगता झाली. रॅलीसाठी पोलीस निरीक्षक कुमार दराडे यांच्या नेतृत्वाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

मुदत संपूनही कारभार सुरू; माजी सैनिक संस्थेचे संचालक मंडळ बरखास्त

तुळजापूर, दि.२२ ऑक्टोबर -

माजी सैनिक गृहनिर्माण सहकारी संस्थेचे मुदत संपल्यानंतरही कामकाज सुरू असल्याने सहाय्यक निबंधक पूजा खडतरे यांनी संचालक मंडळ बरखास्त करण्याचे आदेश दिले आहेत. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७७ (अ) नुसार सहकार अधिकारी (श्रेणी-२) बी. व्ही. काकडे यांची सहा महिन्यांसाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संस्थेची निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी आवश्यक ठराव, मतदार यादी, लेखापरीक्षण अहवाल व अन्य कागदपत्रे सादर करण्यात संचालक मंडळाने कसूर केली. याप्रकरणी रामा दिगंबर धनके व इतर सभासदांनी तक्रार दाखल केली होती. सुनावणीच्या संधी देऊनही चेअरमन व संचालक मंडळाचे प्रतिनिधी अनुपस्थित राहिल्याने ही कारवाई करण्यात आली. नवनियुक्त प्राधिकृत अधिकाऱ्यांना संस्थेचा रेकॉर्ड ताब्यात घेऊन सहा महिन्यांत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पाणीपुरवठा पाइपलाइनमधून पाणीचोरी; महिलेविरुद्ध गुन्हा दाखल!

व्हॉल्व्हला हौद बांधून चार इंची पाइपद्वारे विहिरीत पाणी; शेतीसाठी वापर सुरू असल्याचे उघड

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.२२ ऑक्टोबर -

बोरी धरणातून तुळजापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीवरील वॉशआऊट व्हॉल्व्हमधून पाणी काढून ते विहिरीत साठवून शेतीसाठी वापरल्याचा प्रकार मानेवाडी शिवारात उघडकीस आला आहे. या प्रकरणी अणदूर येथील तयव्वा सुभाष गोवे या महिलेविरुद्ध नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तुळजापूर नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे अभियंता कमलेश किशोर रंगारी यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.

नळदुर्ग येथील बोरी धरणातून तुळजापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीवरील व्हॉल्व्हमधून पाण्याची गळती करून ते शेतीसाठी वापरले जात असल्याची तक्रार नळदुर्ग शहर सकल हिंदू समाजाचे अध्यक्ष गणेश मोरडे आणि विजय ठाकूर यांनी केली होती. त्यांनी जिल्हा प्रशासनाला निवेदन देऊन संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी केली होती. या तक्रारीची दखल घेत तुळजापूर नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांनी जलवाहिनीची पाहणी करण्याचे आदेश पाणीपुरवठा विभागाला दिले.

त्यानुसार १६ ऑक्टोबर रोजी अभियंता कमलेश रंगारी, जलशुद्धीकरण केंद्रप्रमुख प्रहर्ष बरूरकर आणि कर्मचारी अभिजित मोरे व सचिन कुंभार यांनी बोरी धरण ते तुळजापूरदरम्यानच्या जलवाहिनीची पाहणी केली. यावेळी मानेवाडी शिवारातील शेत गट क्रमांक ९४/२ मधील वॉशआऊट व्हॉल्व्हची तपासणी केली असता पाणीचोरीचा प्रकार निदर्शनास आला.

संबंधित व्हॉल्व्हच्या चेंबरवर सुमारे सहा फूट उंचीचा सिमेंट-काँक्रीटचा हौद बांधण्यात आल्याचे पथकाला आढळले. व्हॉल्व्ह उघडून जलवाहिनीतील पाणी या हौदात साठविले जात होते. त्यानंतर चार इंची पाइपलाइनद्वारे सुमारे एक हजार फूट अंतरावरील शेतातील विहिरीत हे पाणी नेऊन शेतीसाठी वापरले जात असल्याचे तपासणीत समोर आले.

पाणीपुरवठा विभागाच्या पथकाने घटनास्थळाचा अहवाल तयार करून मुख्याधिकाऱ्यांकडे सादर केला. त्यानंतर मुख्याधिकाऱ्यांच्या लेखी आदेशानुसार अभियंता कमलेश रंगारी यांनी नळदुर्ग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून १९ ऑक्टोबर २०२६ रोजी तयव्वा सुभाष गोवे (रा. अणदूर) यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम २१६ (१) (ब), (क), (ड) आणि २१६(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक रवींद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल श्रीकांत हजारे पुढील तपास करीत आहेत.

या पाणीचोरीच्या प्रकाराबाबत दैनिक तरुण भारतने १६ ऑक्टोबरच्या अंकात वृत्त प्रसिद्ध केले होते. सकल हिंदू समाजाचे अध्यक्ष गणेश मोरडे आणि विजय ठाकूर यांनी केलेल्या पाठपुराव्यानंतर या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्याने त्यांच्या मागणीला यश आले आहे.

> **धरणात केवळ आठ टक्के पाणीसाठा...**
> दरम्यान, बोरी धरणात सध्या अवघा आठ टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याने नळदुर्ग, तुळजापूर आणि अणदूर परिसरात आगामी काळात पाणीटंचाई तीव्र होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक असताना मुख्य जलवाहिनीतून पाणी वळविण्याचा प्रकार गंभीर मानला जात आहे. प्रशासनाने जलवाहिनीची नियमित पाहणी करून पाणीचोरी रोखण्यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

धाराशिव जिल्ह्यात ६५ टक्के पीक कापणी प्रयोग पूर्ण

१,४०९ प्रयोगांपैकी ९१९ पूर्ण; उर्वरित ४९० प्रयोग प्रलंबित

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -

खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये जिल्ह्यात विविध पिकांचे एकूण १ हजार ४०९ पीक कापणी प्रयोग नियोजित करण्यात आले आहेत. त्यापैकी १५ ऑक्टोबरपर्यंत ९१९ प्रयोग पूर्ण झाले असून, ६५.२ टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित ४९० प्रयोग पूर्ण करण्याचे काम सुरू आहे.



जिल्ह्यात बाजरी, मका, तूर, सोयाबीन, उडीद, मूग, कापूस आणि खरीप कांदा या पिकांचे प्रयोग नियोजित आहेत. याम ध्ये बाजरीचे दोन्ही प्रयोग पूर्ण झाले आहेत. उडीदचे ३१२ पैकी २८८, मूगचे २४८ पैकी २३७ आणि सोयाबीनचे ५०३ पैकी ३८७ प्रयोग पूर्ण झाल्याची माहिती देण्यात आली आहे. पीक कापणी प्रयोगांमधून प्रत्यक्ष उत्पादनाची नोंद घेऊन पिकांची उत्पादकता निश्चित केली जाते. नैसर्गिक आपत्तीमुळे उत्पादनात झालेली घट मोजण्यासाठी तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत नुकसानभरपाई निश्चित करण्यासाठी ही आकडेवारी महत्त्वाची ठरते.

त्यामुळे पीक कापणी प्रयोग अचूक, पारदर्शक आणि निर्धारित कार्यपद्धतीनुसार पूर्ण करणे आवश्यक आहे. उर्वरित प्रयोग वेळेत पूर्ण करून शेतकऱ्यांच्या उत्पादनाचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्यावर भर दिला जात आहे.

मतदार नोंदणीसाठी २४ व २५ ऑक्टोबरला विशेष शिबिरे

सर्व मतदान केंद्रांवर आयोजन; २६ ऑक्टोबरपर्यंत दावे-हरकतींची मुदत

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -

जिल्ह्यातील एकही पात्र नागरिक मतदार नोंदणीपासून वंचित राहू नये, यासाठी २४ व २५ ऑक्टोबर रोजी सर्व मतदान केंद्रांवर विशेष मतदार नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. नवमतदारांसह पात्र नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले आहे.

भारत निवडणूक आयोगाने विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले असून, मतदार यादीसंदर्भातील दावे व हरकती सादर करण्याची मुदत २६ ऑक्टोबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. अंतिम मतदार यादी १६ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध होणार आहे.

शिबिरांचे प्रभावी नियोजन करून मतदारांना नोंदणी प्रक्रियेत कोणतीही गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. विशेषतः नव्याने मतदानासाठी पात्र ठरलेल्या युवक-युवतींनी मतदार यादीत आपल्या नावाची नोंदणी करून घ्यावी. तसेच पात्र नागरिकांनी आपले नाव मतदार यादीत असल्याची खात्री करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

तुळजाभवानी मंदिर परिसरात मद्यप्राशन करून गोंधळ

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -

तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिरातील घाटशिळ परिसरात मद्यप्राशन करून मोठमोठ्याने आरडाओरड करणाऱ्या लक्ष्मण बापुराव भानवसे (वय ५२, रा. देवळाली, ता. जि. धाराशिव) यांच्याविरुद्ध तुळजापूर पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.



ही घटना २० ऑक्टोबर रोजी पहाटे २.३० वाजण्याच्या सुमारास घडली. पोलिसांनी सरकारतर्फे फिर्याद दाखल केली आहे.

ढोकीत दोन घरांची कुलपे तोडून चोरी; सोन्याचे दागिने आणि रोकड लंपास

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -

धाराशिव तालुक्यातील ढोकी येथे अज्ञात चोरट्यांनी दोन घरांची कुलपे तोडून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याची घटना २० ऑक्टोबर रोजी उघडकीस आली.

या चोरीत एकूण १ लाख ४४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याची नोंद ढोकी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पद्युम्न हनुमंत हाजगुडे (वय २९, रा. ढोकी) यांच्या घराचे कुलूप अज्ञात चोरट्यांनी २० ऑक्टोबर रोजी मध्यरात्री १२.३० ते पहाटे ५ वाजण्याच्या दरम्यान तोडले.



घरात प्रवेश करून सोन्याचे दागिने आणि २१ हजार रुपये रोख, असा एकूण ९९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. तसेच रजिंत शिवाजी शिंदे यांच्या घरातून पाच ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी आणि ३० हजार रुपये रोख रक्कम चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी पद्युम्न हाजगुडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ढोकी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस पुढील तपास करीत आहेत.

९३ कारवाया; ७२ हजारांचा दंड वसूल

धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर - शहर वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर २० ऑक्टोबर रोजी मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कारवाई केली. या मोहिमेत एकूण ९३ कारवाया करून ७२ हजार ७५० रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले.

शेकापूरमध्ये ३५ लिटर गावठी दारू जप्त

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -

शेकापूर येथे अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली ३५ लिटर गावठी दारू धाराशिव ग्रामीण पोलिसांनी जप्त केली.

ही कारवाई २० ऑक्टोबर रोजी सकाळी ११.१५ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली. जप्त दारूची किंमत अंदाजे ३ हजार ५०० रुपये आहे.

याप्रकरणी सावित्रीबाई विक्रम विधाते (वय ६०, रा. शेकापूर, ता. जि. धाराशिव) यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पवनचक्कीच्या वादातील मारहाण प्रकरणातील मुख्य आरोपी लोणावळ्यातून जेरबंद!

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -

पवनचक्कीच्या वादातून सुकटा शिवारात फिर्यादीला अडवून लोखंडी रॉडने बेदम मारहाण केल्याच्या प्रकरणातील गुन्हा घडल्यापासून फरार असलेल्या मुख्य आरोपीला भूम पोलिसांनी लोणावळा येथून शिताफीने अटक केली. सचिन उर्फ भैय्या बबन जानकर (वय ३१, रा. सुकटा, ता. भूम, जि. धाराशिव) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. वाढदिवस साजरा करण्यासाठी आणि पार्टी करण्यासाठी तो लोणावळ्यात येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून ही कारवाई केली.

या प्रकरणी भूम पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २०८/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमानुसार गुन्हा दाखल आहे. तत्कालीन तपास अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक बळीराम बंदखडके यांनी तपास पूर्ण करून निष्पन्न आरोपींविरुद्ध यापूर्वीच न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. मात्र, मुख्य आरोपी सचिन जानकर हा गुन्हा घडल्यापासून फरार होता. त्यामुळे पोलीस त्याचा शोध घेत होते. दरम्यान, आरोपी वाढदिवस साजरा करण्यासाठी लोणावळा येथे येणार असल्याची गोपनीय माहिती परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक तथा भूम पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अमोल मोहिते यांना मिळाली. त्यानुसार भूम पोलिसांच्या पथकाने लोणावळा ग्रामीण पोलिसांच्या मदतीने परिसरात सापळा रचला. रात्रीच्या सुमारास आरोपीला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या सचिन जानकर याच्याविरुद्ध धाराशिव आणि पुणे जिल्ह्यांतील विविध पोलीस ठाण्यांत यापूर्वीही गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. याम ध्ये वाकड, दिघी आणि हिंजवडी पोलीस ठाण्यांतील गुन्ह्यांसह भूम पोलीस ठाण्यातील गुन्ह्याचा समावेश आहे. त्याच्याविरुद्ध मारहाण, दुखापत, धमकी तसेच शस्त्र अधिनियम आणि मुंबई पोलीस कायद्यांतर्गत गुन्हे नोंद असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

ही कारवाई परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक अमोल मोहिते, पोउनि. बर्डे, पोअं. अमोल कवडे आणि जयराम क्षीरसागर यांच्या पथकाने लोणावळा ग्रामीण पोलिसांच्या सहकार्याने केली.

धाराशिव जिल्ह्यात २,५०७ कोटींचे पीक विमा संरक्षण; ४.७९ लाख अर्ज दाखल!



तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२२ ऑक्टोबर -

अतिवृष्टी, पावसाचा खंड आणि दुष्काळासारख्या नैसर्गिक संकटांपासून शेतीला आर्थिक संरक्षण मिळावे, यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी खरीप हंगाम २०२६ मध्ये मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविला आहे. जिल्ह्यातून एकूण ४ लाख ७९ हजार ३६६ विमा अर्ज दाखल झाले असून, ४ लाख ७ हजार २३०.५० हेक्टर क्षेत्राला विमा संरक्षण मिळाले आहे. या क्षेत्रासाठी एकूण २ हजार ५०७ कोटी ४० लाख रुपयांची विमा संरक्षित रक्कम निश्चित करण्यात आली आहे. यासाठी शेतकरी, राज्य शासन आणि केंद्र शासन यांच्या सहभागातून १७२ कोटी ४६ लाख रुपयांचा विमा हप्ता निश्चित झाला आहे.

जिल्ह्यातील शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून असल्याने अनियमित पावसाचा थेट परिणाम पिकांच्या उत्पादनावर होतो. पेरणीपासून काढणीपर्यंत शेतकऱ्यांना विविध नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागतो. त्यामुळे पीक विमा योजना शेतकऱ्यांसाठी आर्थिक संरक्षणाचे महत्त्वाचे साधन ठरत आहे.

धाराशिव तालुक्यात ८६ हजार १३१ अर्जांद्वारे ८२ हजार ८६१.०६ हेक्टर क्षेत्राला विमा संरक्षण मिळाले असून, संरक्षित रक्कम ५१६ कोटी १७ लाख रुपये आहे. कळंब तालुक्यात ७६ हजार ८७२ अर्ज आणि ५६ हजार ४८४.९७ हेक्टर क्षेत्राची नोंद आहे. या तालुक्यात ३५२ कोटी ३० लाख रुपयांचे विमा संरक्षण आहे. उमरगा तालुक्यात ६५ हजार ३८७ अर्जांद्वारे ६० हजार ८३४.५५ हेक्टर क्षेत्र विमा संरक्षणाखाली आले आहे.

येथे ३७२ कोटी ७६ लाख रुपयांची विमा संरक्षित रक्कम आहे. भूम तालुक्यात ६२ हजार ३२३ अर्ज आणि ४० हजार ८८४.३९ हेक्टर क्षेत्रासाठी २४९ कोटी ८० लाख रुपयांचे संरक्षण निश्चित झाले आहे. वाशी तालुक्यात ४२ हजार ३६७ अर्जांद्वारे २६ हजार ५९२.७२ हेक्टर क्षेत्राला १६४ कोटी ६२ लाख रुपयांचे संरक्षण मिळाले आहे.

लोहारा तालुक्यात ३१ हजार ५८१ अर्ज, ३० हजार १८२.६९ हेक्टर क्षेत्र आणि १८५ कोटी ७६ लाख रुपयांची विमा संरक्षित रक्कम नोंदविण्यात आली आहे.

परंडा तालुक्यात २८ हजार ३५ अर्ज दाखल झाले असून, १४ हजार ६४०.९८ हेक्टर क्षेत्राला ७७ कोटी ६७ लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळाले आहे. पीकनिहाय आकडेवारीत सोयाबीनचा मोठा वाटा आहे. जिल्ह्यातील प्रमुख खरीप पीक असलेल्या सोयाबीनसाठी शेतकऱ्यांचा हिस्सा ४८ कोटी ६४ लाख रुपये, राज्य शासनाचा हिस्सा ६० कोटी ८० लाख रुपये आणि केंद्र शासनाचा हिस्सा ६० कोटी ८० लाख रुपये असा एकूण १७० कोटी २४ लाख रुपयांचा विमा हप्ता नोंदविण्यात आला आहे.

सोयाबीनसह उडीद, कापूस, मूग, मका, कांदा, बाजरी आणि तूर या पिकांचाही विमा योजनेत समावेश आहे.

उडदासाठी १३ हजार ८२४, कापसासाठी २८८, मुगासाठी ४ हजार २५६, मक्यासाठी १ हजार ५२७, कांद्यासाठी ३ हजार ५४४, बाजरीसाठी ४६ आणि तुरीसाठी २० हजार ९४४ अर्ज दाखल झाल्याची नोंद आहे.

तूर पिकासाठी ९ हजार ४७०.६६ हेक्टर क्षेत्र नोंदविण्यात आले आहे. दरम्यान, विमा संरक्षण मिळणे आणि प्रत्यक्ष नुकसानभरपाई मंजूर होणे या दोन स्वतंत्र बाबी आहेत. विमा संरक्षित रक्कम म्हणजे शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणारी नुकसानभरपाई नव्हे. प्रत्यक्ष भरपाई योजनेतील तरतुदी, पात्रता निकष आणि पिकांच्या नुकसानीच्या मूल्यांकनानुसार निश्चित केली जाते.

नैसर्गिक संकटांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा, या उद्देशाने पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. मात्र, विमा अर्जांची संख्या आणि संरक्षित क्षेत्राबरोबरच पात्र नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रत्यक्ष किती भरपाई मिळते, हेही महत्त्वाचे ठरणार आहे.

तुळजापूर तालुका आघाडीवर; खरीप २०२६ साठी १७२.४६ कोटींचा विमा हप्ता निश्चित

> **विमा संरक्षण म्हणजे नुकसानभरपाई नव्हे**
> जिल्ह्यातील एकूण विमा हप्त्यात शेतकऱ्यांचा हिस्सा ५० कोटी १९ लाख रुपये, राज्य शासनाचा हिस्सा ६१ कोटी १३ लाख रुपये आणि केंद्र शासनाचा हिस्सा ६१ कोटी १३ लाख रुपये आहे. अशा प्रकारे एकूण १७२ कोटी ४६ लाख रुपयांचा विमा हप्ता निश्चित झाला आहे.

> **तुळजापूर तालुक्यात सर्वाधिक अर्ज**
> तालुकानिहाय आकडेवारीनुसार तुळजापूर तालुका विमा अर्जांच्या संख्येत आघाडीवर आहे. या तालुक्यात ८६ हजार ६७० अर्ज दाखल झाले असून, ९४ हजार ७४९.१० हेक्टर क्षेत्राला विमा संरक्षण मिळाले आहे. विमा संरक्षित रक्कम ५८८ कोटी ३४ लाख रुपये आहे.